विवेकानंदांचे सामाजिक-राजकीय विचार

ठा. ग्रं. सं. ठाणे
निबंध
३०५०

विनयकुमार रॉ

REFBK-0024288

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

10 OCT 1984

(कृ. मा. प.)
५०००-१२-८२

संदर्भ निबंध
३०५०
२४२८८
यवत्

विवेकानंदांचे सामाजिक-राजकीय विचार

लेखक : विनयकुमार रॉय
अनुवादक : चित्रा बेडेकर

REFBK-0024288

संग्रहालय शाखा
३०५०
दा. क्र. २४२८८
निबंध यवत
(स्थळ प्रत)

लोकवाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई ४०० ०२५.

म/३२४

पहिली आवृत्ती : जून १९८४

किंमत : चार रुपये.



प्रकाशक :

आर. व्ही. देवनाळकर,
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
लेनिनग्राड चौक, ८५, सयानी रोड,
मुंबई ४०० ०२५.

मुद्रक :

सुधीर बेडेकर
मागोवा मुद्रणालय,
पुणे ४.

अनुक्रम

प्रस्तावना	१
विवेकानंदांच्या विचारांच्या घडणीची पार्श्वभूमी	३
विवेकानंदांचा तात्त्विक दृष्टिकोन	८
परदेशातील प्रवास	१९
राष्ट्रीय पुनरुत्थानाचा कार्यक्रम	२३
निष्कर्ष	६०
टीपा	६६

प्रस्तावना

जग ज्यांना स्वामी विवेकानंद म्हणून ओळखते त्या नरेंद्रनाथ दत्त यांचे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात एक विशिष्ट स्थान आहे.

ते भगवी वस्त्रे धारण करणारे भिक्षू आणि धर्मोपदेशक होते, ज्याला वेदांत किंवा जास्त नेमकेपणाने बोलायचे तर नववेदांत म्हणतात त्या तात्विक-धार्मिक आंदोलनाचे संस्थापक व संघटक होते. 'रामकृष्ण मिशन' या लोककल्याण चळवळीचेसुद्धा ते पाईक होते; भारतात अनेक ठिकाणी तसेच इंग्लंड व अमेरिका या देशांमधे रामकृष्ण मिशनची केंद्रे आहेत. परंतु विवेकानंदांची मते आणि शिकवण यांचा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवर, मुख्यत्वे क्रांतिकारक चळवळीवर; तसेच आपल्या राष्ट्रीय व सांस्कृतिक जीवनाच्या अनेक पैलूंवर बराच प्रभाव पडला. स्वामी विवेकानंदांची आवेशपूर्ण भाषणे आणि लेखन यांवर विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतीय क्रांतिकारकांच्या अनेक पिढ्या पोसल्या गेल्या होत्या, स्फूर्ती घेत होत्या आणि त्या अधिक कणखर बनल्या होत्या. देशातल्या लाखो मूक दीनदुबळ्यांच्या प्रबोधनासाठी झगडण्याची युवकांना त्यांना दिलेली हाक, मालमत्तादार वर्गांचे विशेष अधिकार नष्ट करून कष्टकऱ्यांना राष्ट्रीय संपत्तीचा योग्य वाटा देण्याच्या प्रश्नासंबंधीचा त्यांचा क्रांतिकारक दृष्टिकोन; अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी केलेला विचारप्रसार, आणि या सगळ्याहून विशेष म्हणजे आत्म्याच्या शुद्धीकरणाची त्यांची शिकवण, या सर्व गोष्टींचा देशातल्या विविध राजकीय आणि सामाजिक संघटनांनी स्वीकार केला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही त्यांचा अंगिकार केला.

अठराशे सत्तावनच्या महान मुक्तिसंग्रामानंतर सहा वर्षांनी म्हणजे १८६३

साली नरेंद्रनाथांचा जन्म झाला. त्याच दशकात रवींद्रनाथ टागोर, गांधीजी यासारख्या देशाच्या अनेक महान सुपुत्रांचा जन्म झाला. भारत आणि जग ज्यावेळी एका महत्त्वाच्या ऐतिहासिक वळणावर येऊन ठेपले होते. अस्तित्वात असणाऱ्या साचेबंद जुन्या मूल्यांचे चिकित्सक पुनर्मूल्यांकन करण्याचा, जुन्या विचारातून बाहेर पडण्याच्या मार्गाचा शोध घेतला जात होता, अशा काळात त्यांचा जन्म झाला.

भारतासारख्या एका वैशिष्ट्यपूर्ण देशात काम करत असल्यामुळे विवेकानंदांना भारतीय तत्वज्ञानातील आध्यात्मिक विचारांचा वारसा लाभला होता. त्याचप्रमाणे रूढीबद्ध, अर्थशून्य धार्मिक कर्मकांडे आणि जुलमी जातिव्यवस्था, बहुसंख्य जनतेचे भयानक दारिद्र्य, लाखो लोक उपाशी असतानाही कोटयवधी रुपये उधळणाऱ्या मूठभर लोकांच्या हातात एकवटलेली अमाप संपत्ती याही सर्व गोष्टींचा वारसा त्यांना मिळाला होता.

विवेकानंदांचे जीवन आणि शिकवण यांच्या तात्विक, धार्मिक आणि गूढ-आध्यात्मिक स्वरूपाच्या पैलूंवर देशातल्या आणि जगातल्या अनेक सुप्रसिद्ध विद्वानांनी कित्येक पुस्तके लिहिलेली आहेत. विवेकानंदांचा संदेश आणि शिकवण यांच्या या पैलूंना वाहिलेल्या ग्रंथांच्या संख्येच्या तुलनेने त्यांच्या सामाजिक–राजकीय आणि सामाजिक–तात्विक दृष्टिकोनावर फारच थोडे लिहिले गेले आहे. या छोटयाशा पुस्तिकेत मी त्यांच्या या पैलूंबावतच्या दृष्टिकोनावर व शिकवणीवर प्रकाश टाकण्याचा नम्र प्रयत्न करणार आहे. कारण माझ्या मते विवेकानंदांची मते आणि शिकवण यांच्या ह्या पैलूंची प्रस्तुतता व अर्थपूर्णता आजही लोप पावलेली नाही.



विवेकानंदांच्या विचारांच्या घडणीची पार्श्वभूमी

ब्रिटिशांच्या वसाहतवादी पिळवणुकीसोबत भांडवलशाही भारताच्या खेडोपाडचात घुसली, जुन्या सरंजामशाहीचा बालेकिल्ला असणारी वर्षानुवर्षे अस्तित्वात असणारी खेडी, धार्मिक कर्मठपणा आणि जातिव्यवस्था या सर्वांचा तिने बिमोड केला. या घडामोडींमुळे शहरातल्या बुद्धिवंतांमध्ये अस्वस्थता व मंथन सुरू झाले. एकोणिसाव्या शतकात भारतातील सुशिक्षित लोकांनी युरोपीय विचारवंत, ग्रीक तत्त्वज्ञ, युरोपीय प्रबोधनयुगाचे थोर शिल्पकार, फ्रेंच ज्ञानकोशकार, इंग्लिश व जर्मन तत्त्वज्ञ यांचे असामान्य लिखाण वाचले. स्वातंत्र्य, बंधुभाव आणि समता यांच्या उल्हसित, मोकळचा वाऱ्यांनी ज्ञानाला वंचित असणाऱ्या आणि नव्या विचारांच्या शोधात असणाऱ्या त्यांच्या मनांवर उत्तेजक परिणाम झाला. भारत आणि युरोप यांच्यात एक वैचारिक व मानसिक नाते जोडले गेले.

कर्मठ धार्मिक रूढी आणि सामाजिक अन्याय यांच्या बेडचा शिथिल करण्याची उर्मी योग्य अभिव्यक्तीसाठी धडपडत होती. या उर्मीला मूर्त आकार देण्याच्या कामी पाश्चिमात्य प्रगतिशील कल्पनांची मदत झाली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या पंचवीस वर्षांत सामाजिक आणि धार्मिक सुधारणांसाठी एक सामर्थ्यशाली आंदोलन, भारतातील भांडवली विचारप्रणालीचे आद्य प्रणेते राजा राममोहन रॉय यांच्या नेतृत्वाखाली, बंगालमध्ये फोफावत होते. बंगाल हा ईस्ट इंडिया कंपनीने सर्वात प्रथम ताब्यात घेतलेला आणि त्यामुळे पद्धतशीर पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचा लाभ मिळालेला व पाश्चिमात्य कल्पनांशी परिचित झालेला प्रांत होता. कालबाह्य झालेल्या अनेक सामाजिक चालीरिती रद्द करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी लढा दिला आणि त्याच्या या प्रयत्नांना बरेचसे यशही

मिळाले. जुन्या हिंदू धर्मग्रंथांचा आधार घेऊन त्यांनी असे सिद्ध केले की त्या काळी प्रचलित असणारी हिंदू धर्मातील जटील कर्मकांडे ब्राह्मणांनी नंतर निर्माण केली आहेत आणि त्यांना शास्त्रांचा आधार नाही. राममोहन रॉय यांची ही हिंदू धर्माच्या कर्मठपणाविरुद्ध भूमिका व त्यांचे प्रयत्न यांच्या परिणामी एक नवा धर्मविचार उदयास आला; या नव्या धर्माच्या नव्या संस्थेचे नाव होते 'ब्राह्मो समाज.' ही संस्था कलकत्त्यातील भद्र समाजाच्या आध्यात्मिक चळवळीचे केंद्र बनली.

१८५७ चे राष्ट्रीय मुक्तियुद्ध निर्घृणपणे दडपले गेल्यावर वसाहतवादी पिळवणूक जास्त तीव्र झाली आणि त्या प्रमाणात लोकांचे दारिद्र्य व यातना यांच्यात वाढ झाली. शहरांमध्ये वर्गावर्गातील भेद अधिक तीव्र बनले. शहरी बुद्धिवंतांमध्ये ब्रिटिशविरोधी जाणिवा वाढीस लागल्या आणि त्या व्यक्त करण्यासाठी योग्य मार्गांची गरज भासू लागली. ब्राह्मो समाजासारख्या धार्मिक संस्थेवरही त्याचा परिणाम झाला. जुन्या ब्राह्मो समाजाचे नेतृत्व जमीनदार व उमराव मंडळींकडे होते. एक भारतीय धार्मिक संस्था वाटण्याऐवजी 'इंग्लिश युनिटरी चर्च'शी तिचे विधी व धार्मिक आशय यांचे अधिक साम्य होते. याला विरोध करण्यासाठी ब्राह्मो समाजाच्या तरुण सभासदांनी जुना ब्राह्मो समाज सोडला व 'साधारण ब्राह्मो समाज' स्थापन केला. संघटनात्मकदृष्ट्या आणि विधींच्या बाबतीत हा समाज अधिक लोकशाही स्वरूपाचा असूनही ईश्वराच्या अवतारासंबंधीची अमूर्त व चिंतनपर संकल्पना त्याने तशीच जपून ठेवली. त्यामुळे लोकशाही स्वरुपाची असूनसुद्धा ही संस्था आणि तिची विचारप्रणाली फक्त शहरी बुद्धिमंतांच्या मर्यादित वर्तुळापुरतीच राहिली. बाकीची बहुसंख्य जनता हिंदू धर्म आणि त्याचे विधी यांचेच आचरण करत राहिली.

ब्राह्मो समाजाच्या या नव्या धर्मविचाराला प्रतिक्रिया म्हणून आणि वसाहतवादाविरुद्ध वाढत जाणाऱ्या लोकांच्या जाणिवांची अभिव्यक्ती म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात 'आर्य समाज' ही हिंदू पुनरुज्जीवनाची नवी चळवळ अस्तित्वात आली. ब्राह्मो समाजाप्रमाणे ही नवी चळवळसुद्धा शहारातल्या बुद्धिमंतांनीच सुरू केली. कर्मठ ब्राह्मण आणि ईश्वरावर विश्वास असणाऱ्या इतर लोकांनी लवकरच त्यात प्रवेश केला. 'उदात्त अशा वैदिक काळाकडे परत चला' ही त्यांची घोषणा होती. या चळवळीला पाठिंबा देणाऱ्यांनी हिंदू धर्माच्या प्राचीन चालीरिती आणि विधी यांची जोरदारपणे पुनर्स्थापना केली, त्यांचे आचरण केले आणि हिंदू धार्मिक सणांकडे विशेष लक्ष पुरवले. 'प्राचीन भारताची संस्कृती आणि धर्म इतर कोणतीही संस्कृती आणि धर्म यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नाही, आपल्या वारशाचा आपण रास्त अभिमान बाळगू शकतो,' हे आपल्या भाषणांतून आणि गाण्यांमधून ठसवण्याचा प्रयत्न या चळवळीच्या अनुयायांनी केला.

अनेक शतकांपासून भारतामध्ये धर्म हेच विचारप्रणालीचे प्रमुख स्वरुप होते ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. तत्त्वज्ञानालासुद्धा धर्माची सेवा करावी लागत होती. म्हणूनच भारतात भांडवली राष्ट्रवाद जेव्हा आकार घेत होता आणि विकास पावत होता तेव्हाच्या सुरुवातीच्या काळात, विविध धार्मिक संकल्पनां-मार्फत आणि धार्मिक सुधारणांद्वारे तो व्यक्त होत गेला. १८७६ मध्ये पाश्चिमात्य राष्ट्रांमधून थिऑसॉफिस्ट मतांचा एक गट भारतात आला आणि त्यांनी भारतात थिऑसॉफिकल सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था स्थापन केली. हाच प्रवाह नंतर डॉ. ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली वाढला आणि धार्मिक पुनरुज्जीवनाच्या प्रवाहाला येऊन मिळाला.

अशा वातावरणात नरेंद्रनाथ जन्मले आणि वाढले. ते कलकत्त्यामधील उदारमतवादी, सुधारक आणि सुसंस्कृत कुटुंबातील होते. त्या काळी कलकत्त्यात जेवढे उत्तम पाश्चात्य शिक्षण मिळणे शक्य होते तेवढे नरेंद्रनाथांना मिळाले होते. विद्यार्थीदशेत त्यांचा तत्त्वज्ञानाकडे अत्यंत ओढा होता व लवकरच त्यांनी एका तत्त्वज्ञान मंडळात प्रवेश केला. डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत आणि हर्बर्ट स्पेन्सर यांनी धर्माच्या संदर्भात मांडलेली 'अज्ञात आणि अज्ञेय' ही संकल्पना यांना त्या काळी त्यांनी अतिशय उत्साहाने पाठिंबा दिला. स्पेन्सर यांच्या दृष्टिकोनाकडे ते इतके आकर्षित झाले होते की त्यांनी त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला. त्याच काळात जॉन स्टुअर्ट मिल यांनी मांडलेल्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेला त्यांच्या उत्सुक व ग्रहणशील बुद्धीकडून त्वरित प्रतिसाद मिळाला.

नरेंद्रनाथांनी 'साधारण ब्राह्मो समाजा'चे सदस्यत्व घेतले. परंतु या संप्रदायाच्या सुधारणावादी आणि अमूर्त प्रवचनांमुळे, त्यांची सत्याचा शोध घेण्याची व देशभक्तीची आच व आपल्या देशबांधवासाठी काही तरी प्रत्यक्ष करण्याची तळमळ यांचे समाधान होणे दुरापास्त होते. हे धार्मिक सुधारणा आंदोलन बहुतांशी कृत्रिम आणि चिंतनशील असल्यामुळे भारतातल्या लाखो लोकांना त्यातून मुक्ती मिळवता येणार नाही वा वर्षानुवर्षे मूर्तिपूजेवर असणाऱ्या त्यांच्या श्रद्धला धक्का लागणार नाही असे त्यांना तीव्रतेने जाणवले.

साधारण ब्राह्मो समाजाबद्दल नरेंद्रनाथांना असमाधान वाटू लागले. परंतु दुसरा समाधानकारक पर्यायही त्यांना सापडत नव्हता. अशा या कालखंडात नरेंद्रनाथ दक्षिणेश्वरच्या काळीच्या देवळातील धर्मोपदेशक रामकृष्ण परमहंस यांच्या सान्निध्यात आले. रामकृष्ण यांच्या धर्मासंबंधीच्या कल्पना आश्चर्य वाटावे इतक्या उदार प्रवृत्तीच्या व आमूलाग्र सुधारणांची गरज मांडणाऱ्या होत्या. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. केवलस्वरुप सत्य हे सर्वोच्च श्रेय आहे आणि त्याची प्राप्ती हेच सर्व धर्मांचे समान अंतिम उद्दिष्ट आहे; हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन यांपैकी कोणत्याही धर्माचे आचरण करून व सगुण किंवा निर्गुण

यापैकी कोणत्याही प्रकारची उपासना करून हे उद्दिष्ट प्राप्त करून घेता येते; या गोष्टी रामकृष्ण यांच्याकडून नरेंद्रनाथ शिकले. प्रत्येक आत्मा हे ईश्वराचे मंदिर असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती या परम सत्याचा, या अंतिम श्रेयाचा थोडा तरी भाग दुसऱ्यापर्यंत पोचवू शकते असे मानणारे रामकृष्ण हे सांप्रदायिकता, पुरोहितशाही आणि संकुचित शास्त्रप्रामाण्यवादी धार्मिक विचार यांच्याविरुद्ध होते.

तरुण आणि अस्वस्थ अशा नरेंद्रनाथांची सत्याविषयीची तृष्णा रामकृष्ण भागवू शकले हे उघडच आहे. ते त्यांचे शिष्य बनले आणि रामकृष्णांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इतर शिष्यांसमवेत नरेंद्रनाथांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. रामकृष्णांनी प्रतिपादन केलेला नवा धर्म लोकप्रिय करणे, त्याचा प्रसार करणे आणि तो प्रत्यक्ष आचरणात आणणे ह रामकृष्ण मिशनचे उद्दिष्ट होते. यावेळेपर्यंत नरेंद्रनाथांनी भिक्षूची भगवी वस्त्रे धारण केली आणि विवेकानंद हे नाव घेतले.

विवेकानंद हे रामकृष्णांचे केवळ शिष्य होते आणि रामकृष्णांची शिकवण त्यांनी तशीच चालू ठेवली असे आपण मानले तर ती मोठी चूक होईल हे येथे लक्षात घ्यावे लागेल. सर्वात पहिली गोष्ट म्हणजे विवेकानंद हे देशभक्त होते. एखाद्या निद्रिस्त महाकाय शक्तीप्रमाणे असणाऱ्या भारतातील लाखो लोकांना जागृत करणे, इतिहासाचा रथ पुढे नेण्याच्या त्यांच्यातल्या सामर्थ्याची व बळाची त्यांना जाणीव करून देणे, यासाठी धर्म हा केवळ एक साधन आहे, वाहन आहे अशी त्यांची धारणा होती. यामुळे रामकृष्णांच्या शिकवणातील सारभूत तत्वांवर आधारलेली एक नवी धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक आणि सामाजिक विचारसरणी त्यांनी तयार केली.

रामकृष्णांच्या मृत्यूनंतर हातात भिक्षेचा वाडगा घेऊन विवेकानंदांनी भारताच्या कानाकोपऱ्यात प्रवास केला.भिक्षू तसेच समाजाचे गरीब थर यांच्यामधे ते राहिले. आपल्या देशबांधवांपैकी बहुसंख्य मोठा भाग निर्घृण पिळवणूक आणि उपासमार, अवहेलना आणि यातना यांनी काठोकाठ भरलेले जीवन कसे जगत आहे हे त्यांनी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले. कोणत्याही अंशत: सुधारणा करून भारताचे राष्ट्रीय प्रश्न सुटणार नाहीत हे त्यांना स्पष्टपणे जाणवले. त्यासाठी संपूर्ण परिवर्तनाची, एका नव्या कार्यक्रमाची गरज होती. हा नवा कार्यक्रम आखण्याचे काम विवेकानंदांनी स्वत:च्या अंगावर घेतले. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी त्यांना जी पद्धत अमलात आणायची होती ती अशी–' ... त्या भारताच्या (प्राचीन भारताच्या) सामर्थ्यस्थळांना आजच्या काळातल्या सामर्थ्यस्थळांमुळे स्वाभाविकरित्याच बळकटी कशी येईल हे पहायचे आहे; नवी अवस्था अंतर्गत विकासातूनच स्वाभाविकपणे आली पाहिजे.' [१]

प्राचीन भारताचो 'सामर्थ्यस्थळे' म्हणजे वेदांत तत्त्वज्ञान हेच त्यांना मुख्यत: अभिप्रेत होते. त्यांच्या मते मानवजातीने तत्त्वज्ञानविषयक जे ज्ञान आता-

पर्यंत मिळवले आहे त्याचा तो सर्वोच्च आविष्कार आहे. आजच्या काळाची सामर्थ्य-स्थळे म्हणजे त्या काळी लागलेले वैज्ञानिक शोध असे त्यांना अभिप्रेत होते. विवेकानंदांच्या मते 'अंतर्गत विकास' याचा मुख्य अर्थ आध्यात्मिक विकास, माणसाच्या गाभ्यात नांदणारे सारतत्त्व जो आत्मा त्याची सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्तता करणे आणि त्याच्या विकासाला संपूर्ण वाव देणे. येथे एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे; विवेकानंदांच्या पद्धतीतल्या या शेवटच्या तत्त्वाचा–यातना सहन करण्यातून आणि जीवनाच्या आंतरिक सारतत्त्वांच्या ज्ञानामधून आत्म्याची शुद्धी करण्याचा-प्रभावी उपदेश आणखी एका थोर व्यक्तीकडून त्याच काळात केला जात होता. ती व्यक्ती म्हणजे महान रशियन लेखक लिओ टॉलस्टॉय. 'रिसरेक्शन' ही त्यांची कादंबरी याच काळातली.

तत्वज्ञानातला मूळ प्रश्न विवेकानंदांनी त्यांच्या चिद्वादी अंतःप्रेरणेनुसार सोडवला. त्यांच्या मते, भारतीयांनी गमावलेली श्रद्धा, त्यांचे स्वतःचे आध्यात्मिक सामर्थ्य त्यांना पुन्हा प्राप्त होण्यातच भारताच्या मुक्तीची गुरुकिल्ली आहे. भारतीय जनता इतरांच्या तुलनेने यत्किंचितही उणी नाही, कोणत्याही इतर राष्ट्रांपेक्षा कमी दर्जाची नाही याची तिला खात्री पटवणे आवश्यक होते. चिद्वादी आणि धार्मिक भूमिकेवरूनच स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या संकल्पनाचा विवेकानंदानी उद्घोष केला.

पुढे जाण्यापूर्वी, विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानात्मक विचारव्यूहाचा थोडक्यात अभ्यास केल्यास त्यांच्या सामाजिक–राजकीय मतांचा व उपदेशाची, तसेच त्यांच्या साकल्याने सर्व जगाकडे पहाण्याच्या विश्वदृष्टिकोनाची योग्य तऱ्हेने समज येण्यास मदत होईल.

विवेकानंदांचा तात्विक दृष्टिकोन

हे वास्तविक, जड जगत् व त्यातले पिळवणुकीचे सर्व नियम हाच भारतीय लोकांच्या दास्याचा स्त्रोत आहे, लोकांच्या स्वातंत्र्याकांक्षेवरचे बंधन आहे. जड-वस्तुमय जग म्हणजे नियम, नियम म्हणजे गुलामी, आणि या गुलामीच्या तावडी-तून निसटणे अशक्य आहे, असे विवेकानंदांना वाटत होते. यावरून विवेकानंदांनी असा निष्कर्ष काढला की माणसाचे शरीर म्हणजे जड अस्तित्व हे निसर्गाच्या नियमांनी बद्ध असते; आणि आत्मा म्हणजे आध्यात्मिक अस्तित्व हा या शरीराच्या कैदेत पडलेला असतो. पण मूळात आत्मा हा स्वतः जडवस्तुमय जगाच्या नियमांच्या पलिकडे, स्वतंत्र असतो. त्याला नेहमी मुक्ती मिळवण्याची आकांक्षा असते आणि निसर्गाच्या नियमांविरुद्ध तो सतत बंड करून उठतो. विवेकानंद लिहितात :

'माणसामध्ये निसर्गाच्या नियमांविरुद्ध बंड करण्याची सहजप्रेरणा असते. ...आपण जन्मताच बंडखोर असतो...आपल्यासाठी कोणतेही नियम नाहीत... जोपर्यंत आपण नियम पाळतो तोपर्यंत आपण यंत्रांसारखेच असतो, विश्व तसेच चालू राहते आणि आपण हे चक्र कुठे तोडू शकत नाही... स्वातंत्र्य हे आत्म्याचे गीत आहे. पण निसर्गात जखडून रहाणे, दास्यत्व हे त्याचे दुर्दैव नशीब दिसते...'[२]

विवेकानंदांच्या मते आत्म्याच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेतून ईश्वराची संकल्पना जन्मते. ते लिहितात :

'परिपूर्णतया मुक्त असे जे काय आहे तो ईश्वर. ईश्वराच्या या संकल्पनेमुळे माणूस चिरंतन काळ दास्यात राहूच शकणार नाही...दास्याची कल्पना हा मानवी मनाचा जितका आवश्यक आणि मूलभूत भाग आहे तितकीच ईश्वर ही संकल्पना मनाचा आवश्यक आणि मूलभूत भाग आहे. ह्या दोन्ही गोष्टी स्वातंत्र्य या कल्पने-तून निर्माण झाल्या आहेत...'[१]

जगात युगप्रवर्तक बदल घडवून आणणारे विज्ञानाचे शोध आणि एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील विज्ञानाचा एकंदर विकास याबद्दल विवेकानंदांचे निरीक्षण असे आहे :

'एका शब्दात सांगायचे तर, वस्तूंचे स्पष्टीकरण त्यांच्या स्वत:च्या स्वभावात आहे आणि विश्वात काय चालते याचे स्पष्टीकरण देण्याकरता कोणत्याही विश्वाबाहेर नांदणाऱ्या गोष्टीची वा अस्तित्वाची आवश्यकता नाही, ही विज्ञानाची मूळ धारणा आहे. रासायनिक घडामोडींचे स्पष्टीकरण करण्यासाठी रसायनशास्त्रज्ञाला दैवते किंवा भुतेखेते यासारख्यांची गरज कधीही नसते. पदार्थविज्ञान शास्त्रज्ञालाही समोरच्या गोष्टींचे स्पष्टीकरण करण्यासाठी अशा समंधांची वा भुतांची गरज नसते. इतर कोणत्याही शास्त्रज्ञाला तशी गरज नसते. आणि विज्ञानांच्या वैशिष्ट्यांपैकी हे एक वैशिष्ट्य धर्मालाही लागू करावे असे माझे म्हणणे आहे. धर्मामध्ये ही एक उणीव आढळते आणि म्हणूनच आज त्यांचे विघटन होऊन शकले होत आहेत. कोणतेही विज्ञान वस्तूंच्या अंतर्गत कारणपरंपरेच्या, वस्तूंच्या मूळ स्वभावधर्माच्या आधारे स्पष्टीकरणं मिळवू बघते; आणि धर्म ही स्पष्टीकरणे पुरवू शकत नाहीत.'[४]

सर्वसाधारणत: धर्माला आणि विशेषत: स्वत:च्या नववेदांती धर्माला अशा स्वरूपाची वैठक प्राप्त करून देण्याचे कार्य विवेकानंद स्वत:वर घेतात.

सुरुवातीला ते जडवस्तूंबद्दल सर्वसामान्य पातळीवर विचार करतात आणि जडद्रव्य (तत्वज्ञानातील 'जडद्रव्य'–विनय रॉय) या अमूर्त संकल्पनेपर्यंत पोचतात. ते लिहितात : 'चर्चेपुरते आपण जडवस्तुवादी आहोत असे मानले तरी सबंध विश्व म्हणजे जडद्रव्याचा एक महासागर आहे आणि तुम्ही–आम्ही जणू काय त्यातील छोटे भोवरे आहोत असे मानावे लागेल. जडद्रव्याचा काहीएक ओघ प्रत्येक भोवऱ्यामध्ये प्रवेश करतो, त्या भोवऱ्याचा आकार घेतो व पुन्हा जडद्रव्य म्हणून त्यातून बाहेर येत असतो. माझ्या शरीरात आज जी जडवस्तू आहे ती काही वर्षांपूर्वी कदाचित तुमच्या शरीरात होती, किंवा सूर्यामध्ये वा एखाद्या वनस्पतीमध्ये होती. आणि अशा प्रकारे जडवस्तू सतत एका प्रवाहाच्या स्थितीत होती. 'माझे' शरीर आणि 'तुमचे' शरीर याचा अर्थ काय ? शरीर एकच आहे हाच त्याचा अर्थ...'[५] त्यानंतर याच प्रकारे सर्व विचारांसंबंधी सामान्यीकरण करत करत ते 'विचार' या अमूर्त संकल्पनेपर्यंत पोचतात. 'विचाराचा एक महासागर आहे, एकच अमर्याद संचय आहे, आणि तुमचे मन, माझे मन ही त्यातील भोवऱ्यांप्रमाणे आहेत ...'[६] हे दोन्ही एकत्र घेऊन विवेकानंद म्हणतात : 'आपले सर्वांचे संपूर्ण जीवन एक आहे, आपले विचारसुद्धा एक आहेत...त्याला आणखी सामान्य रूप द्यायचे तर जडवस्तू आणि विचार यांना सारभूत असे तत्व (इसेन्स) काय आहे? ते आहे त्याच्यातील आत्म्याची क्षमता (पोटेन्शिॲलिटी ऑफ स्पिरिट्). ह्या आत्म्याच्या शक्तीतूनच,

ह्या परम एकतेतूनच, आपण सर्वजण निर्माण झालो आहोत, आणि मूलभूतरित्या एकच आहोत.. हे एक असणे दररोज आधुनिक विज्ञानाद्वारे सिद्ध होते आहे.'[७]

नव-कांटवाद्यांची 'जाणिवेतील काही प्राथमिक निरीक्षित तथ्ये' ('प्रायमरी डेटा ऑफ कॉन्शस्नेस'), प्रत्यक्षप्रमाणवाद्यांचे 'मुख्य सुसूत्रीकरण' ('द प्रिन्सिपल कोऑर्डिनेशन') आणि विवेकानंदांची 'आत्म्याची क्षमता' या मूलतः एकच संकल्पना आहेत. आणि एकच हेतू साध्य करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. वर उल्लेखलेल्यांपैकी पहिले दोन प्रवाह त्यांची ही मूळ तत्वे उघडपणे मांडायला काहीसे कचरतात, लाजतात. पण लेनिन यांनी आपल्या 'मटिरिॲलिझम ॲंड एम्पिरिओ–क्रिटिसिझम्' या सुप्रसिद्ध ग्रंथात त्यांची ही भूमिका उत्कृष्टपणे उघड करून दाखवली आहे. विवेकानंद स्वतः मात्र अगदी स्पष्टवक्ते आहेत : '...सत्य स्वतः अधिकाधिक प्रगट होऊ लागले आहे आणि धर्माला हा मोठाच लाभ आहे. अद्वैताची अगदी हीच शिकवण आहे...परम-आत्मा (सेल्फ) हा या विश्वाचे सारतत्व आहे, सर्व आत्म्यांचे (सोल्स्) सारतत्व आहे. तुम्ही व हे विश्व एकरूप आहात...अशा प्रकारे जास्तीतजास्त सर्वसाधारण पातळीवरील विचाररूपे आणि उत्क्रांतीचे नियम यांचा संदर्भ वेदांतधर्म विज्ञानाला प्राप्त करून देतो व वैज्ञानिक विचाराच्या अटीही पुऱ्या करू शकतो असे आपणास दिसते. वेदांतातील ब्रह्माच्या किंवा ईश्वराच्या बाहेर, त्याच्या पलिकडे, काहीसुद्धा नसते...तो विश्वातच असतो, तो स्वतःच विश्व असतो.'[८] यावरून विवेकानंद असा निष्कर्ष काढतात की वेदांतमत हा जागतिक धर्माचा पाया होऊ शकतो; वेगवेगळ्या राष्ट्रीय धर्मांना जन्माला घालणाऱ्या व जोपासणाऱ्या मातृ-धर्मासारखा तो एक धर्म असेल. कारण विवेकानंदांचा असा विश्वास आहे की कोणत्याही स्वरूपातली सगुण वा निर्गुण प्रकारची ईश्वरोपासना भक्ताला त्याच व एकाच केवल सत्याकडे घेऊन जाते.

माणसाने आतापर्यंत जे तत्वज्ञानात्मक ज्ञान मिळवले आहे त्याचे सर्वात वरचे शिखर म्हणजे वेदांत असा निष्कर्ष विवेकानंद काढतात. तत्वज्ञान आणि ज्ञान यांच्या क्षेत्रातला वेदांत हा अंतिम शब्द आहे, ते विज्ञानांचे विज्ञान आहे.

विवेकानंद वेदांतवादी भूमिकेतून ठामपणे म्हणतात : 'जर ईश्वर स्वतःच विश्व आहे आणि जर माझ्यातला 'मी' हा विश्वाशी एकरूप आहे तर : 'जर मी बदललो तर बाहेरचे जग बदलेल.'[९] दुसऱ्या शब्दात सांगायचे तर विकासाचे मूळ कारण विश्वात न शोधता 'मी' मध्ये शोधले पाहिजे, माणसाच्या आत्म्यामध्ये शोधले पाहिजे. अधिक खोलात ही संकल्पना मांडताना ते म्हणतात : '...तुम्ही, मी आणि विश्वातली प्रत्येक गोष्ट म्हणजे ते केवल सत्य आहे; अंशतः नव्हे तर संपूर्णतया ते सत्य आहे. म्हणजेच तुम्हीच ते केवल सत्य आहात, ते संपूर्ण केवल सत्य आहात, इतर सर्वांचेही असेच आहे.'[१०]

थोडक्यात म्हणजे, मनुष्य हा ब्रह्माचाच आविष्कार आहे, विश्वाचा निर्माता आहे, विश्वाचा स्वामी आहे. तो देवासारखाच आहे. तो देव आहे. असे जर असेल, प्रत्येक आत्म्यामध्ये ईश्वराचा वास असेल तर मग कुणीही उच्च किंवा नीच असू शकत नाही, उच्च किंवा नीच जाती असू शकत नाहीत, कुणी मालक नाही व कुणी गुलाम नाही. सर्व माणसे समान आहेत, सर्व राष्ट्रे समान आहेत.

विवेकानंद म्हणतात, 'प्रत्येक माणसात सारखेच सामर्थ्य असते. फक्त ते कमी वा जास्त प्रमाणात व्यक्त होते. विशेष अधिकारांचा दावा होऊच कसा शकतो ? प्रत्येक आत्म्यामध्ये सर्व ज्ञान असते, सगळ्यात अज्ञानी माणसामध्येही असते, फक्त त्याने ते व्यक्त केलेले नसते. कदाचित त्याला ते आविष्कृत करण्याची संधी मिळालेली नसेल, कदाचित त्याला अनुकूल परिस्थिती लाभलेली नसेल. जेव्हा त्याला अशी संधी मिळेल तेव्हा तो तशी अभिव्यक्ती करेल. एक माणूस दुसऱ्यापेक्षा जन्मतःच अधिक श्रेष्ठ असतो याला वेदांतात काहीच अर्थ नाही; एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रापेक्षा अधिक श्रेष्ठ असते याला काहीएक अर्थ नाही.' [११]

पण ही समता प्रस्थापित करणे, प्रत्यक्ष आविष्कार बदलण्यासाठी तशी 'परिस्थिती' आणि 'संधी' निर्माण करणे ही काही सोपी गोष्ट नाही. विवेकानंदांच्या तत्त्वनिष्ठ दृष्टिकोनाला निसर्ग आणि मानवसमाज यांच्यातल्या अंतर्गत विरोधाचे मर्म समजले आहे. लंडनमधल्या सिसाम क्लब येथे 'विशेष अधिकारां'वर भाषण देताना स्वामीजी म्हणतात : 'निसर्गात सर्व ठिकाणी दोन प्रेरणा कार्य करतात असे दिसून येते. त्यातील एक प्रेरणा सातत्याने भेद पाडत असते आणि दुसरी सातत्याने एकात्मता घडवत असते ... निसर्गाच्या आणि मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या दोन्ही प्रेरणांची क्रिया प्रवेश करते असे दिसून येते....सबंध जगच या दोन प्रेरणांचे रणक्षेत्र भासते.' [१२]

प्रतिगामी आणि कालबाह्य प्रेरणा नेहमीच सध्याची व्यवस्था आहे तशीच ठेवण्याचा, भेदभाव टिकवून धरण्याचा प्रयत्न करतात. तर जुलुमाखाली भरडले व दबले गेलेले आणि सर्व विशेषाधिकारांपासून वंचित केले गेलेले लोक, नव्या पुरोगामी प्रेरणा, या नेहमी हे भेद नष्ट करण्याचा आणि सर्वांना समान पातळीवर आणण्याचा प्रयत्न करतात. ही गोष्ट विवेकानंदांच्या नजरेतून सुटलेली नाही. विश्वामधील सतत एकमेकांना विरोध करणाऱ्या या प्रेरणांच्या कार्यांचा अभ्यास हा विचारांचा पाया मानून विवेकानंद विकासाची द्वंद्वात्मक प्रक्रिया समजून घेण्याच्या अगदी जवळ येऊन पोचतात. 'सर्व विश्व म्हणजे विभाजन आणि एकता यांचा खेळ आहे. एक गोष्ट कबूल केल्याशिवाय दुसरीचा आपण स्वीकार करू शकत नाही,' [१३] असेही विधान विवेकानंद करतात.

पण स्वतःचा हा सिद्धांत ते आणखी पुढे नेत नाहीत. अंतर्विरोधातून विकास होतो आणि विरोधी घटकांचे एकत्व हा सर्जनशील विकासाची एक अवस्था असते

या द्वंद्वपद्धतीच्या मर्मापर्यंत ते पोचत नाहीत. अगदी पुढच्याच वाक्यात ते लिहितात : 'पण या दोन्ही गोष्टी म्हणजे एकाच पातळीवरच्या आकलनातली तथ्ये आहेत, एकाच अनुभवाचे दोन खरोखरीचे पैलू आहेत, असे आपण मानू शकणार नाही. तरीही हे नेहमी याच पद्धतीने चालू राहील...'[१४]

विवेकानंदांच्या मते विविधता ही नेहमी बाह्य जगताशी, प्रत्ययाला येणाऱ्या पृष्ठभागीय जगाशी निगडित असते; आणि एकता ही आध्यात्मिक, आंतरिक जगताशी, मूलतः शुद्ध आणि दैवी असणाऱ्या आत्म्याशी निगडित असते. बाह्य जग, घडामोडींचे जग यांच्या विरोधात ते आत्म्याला अग्रस्थान देतात; आणि त्यांच्या या मतानुसार, या दृष्टीचा परिणाम म्हणून, आत्मा आणि बाहेरचे दृश्य जग या दोन्ही गोष्टी एकाच पातळीवरची किंवा एकाच अनुभवाची वास्तविकता आहे असे समजता येणार नाही. या दोन गोष्टी वेगवेगळ्या क्षेत्रांशी संबंधित आहेत, त्यांच्यात परस्परात क्रियाप्रतिक्रिया शक्य नाही, असे विवेकानंदांना वाटते. त्यांच्या मते ईश्वर हाच एकत्वाचा स्त्रोत आहे. विविधता आणि एकता या बाह्य अंतर्विरोधाचे निरसन आत्म्याची शुद्धी करून व त्याला परिपूर्ण करून होते. त्यांच्या नीतिशास्त्राचा हा मूलभूत सिद्धांत आहे. विशेषाधिकारावरच्या त्याच भाषणात विवेकानंद पुढे म्हणतात : 'नीतिशास्त्र म्हणजेच एकत्व ... माणसाने आतापर्यंत ज्या नैतिक कायद्यांच्या संहिता बनवल्या आहेत, त्यातल्या सर्वश्रेष्ठ संहितेलासुद्धा बदलाची जाणीव नाही. त्यात लक्ष घालण्यासाठी थांबायला त्यांना वेळ नाही; ते निर्द्वंद्व एकत्व प्राप्त करून घेणे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे.'[१५]

'बाह्य जगतातील विविधतेचा नाश करणे आणि एकत्वाची स्थापना करणे हे नीतिशास्त्राने आतापर्यंत कधीही केले नाही व यापुढेही ते करणार नाही...उलट अशी सर्व प्रकारची विविधता असूनही तिच्यात नांदणाऱ्या एकत्वाला ओळखणे, अंतस्थ ईश्वराला ओळखणे हे नीतिशास्त्राचे काम आहे. पृष्ठभागावर, वरवर बघता जे काही दिसते त्या सर्वांच्या विरोधात आत्म्याची चिरंतन, अनंत, सारभूत अशी शुद्धता आकळणे हेच नीतिशास्त्राचे काम होते आणि आहे.'[१६]

विवेकानंदांच्या मते हे शाश्वत आणि नैतिकदृष्टया सर्वोच्च असे नीतिनियम कोणते ? ते लिहितात : 'जन्मतःच माणसामाणसात भेद असणार; काहींना इतरांपेक्षा अधिक सामर्थ्य असणार. आपण ते थांबवू शकत नाही. पण संपत्ती मिळवण्याच्या या अधिक अंगभूत सामर्थ्याच्या जोरावर, ज्यांना हे सामर्थ्य मिळू शकत नाही अशांवर जुलूम करणे, त्यांना भरडून काढणे हा कायद्याचा भाग नाही; आणि याच्याविरुद्ध संघर्षही चालत आला आहे. दुसऱ्यापेक्षा आपल्याकडे जास्त शक्ती आहे तिचा फायदा करून घेणे म्हणजे विशेषाधिकार गाजवणे आणि अशा विशेषाधिकारांचा नाश करणे हा युगानुयुगे नीतीचा उद्देश राहिला आहे.'[१७]

अशा प्रकारे विवेकानंदांच्या मते लोकांना प्रस्थापित नीतितत्त्वे शिकवणे; इतर लोकांच्या सुखाला बाधा आणून स्वतः समाधान, श्रेष्ठत्व आणि विशेषाधिकारांचे सुख भोगणे अनैतिक आहे हे शिकवणे, हे नीतिशास्त्राचे कार्य आहे. म्हणून त्यांचे ब्रीदवाक्य असे होते : माणसाला, कर्त्याला बदलणे, नैतिक आणि आध्यात्मिक-दृष्ट्या त्याला सुधारणे. म्हणजे मग तो सर्व विशेषाधिकारांचा त्याग करेल, आणि त्याच वेळी इतरांना नैतिक बळ आणून देईल. असे झाले तर विषमता, अन्याय आणि मूठभर लोकांचे विशेषाधिकार यांविरुद्ध लढण्यासाठी त्या सर्वांना सज्ज करता येईल. ही पद्धत सातत्याने अवलंबल्याने अखेरीस तुम्ही जगसुद्धा (बाह्य जडवस्तुमय जगसुद्धा) बदलू शकता.

विवेकानंदांच्या नीतिशास्त्रात आत्म्याला फार मोठी भूमिका आहे. 'आत्मा ज्या गोष्टींनी वेढलेला असतो त्यांच्यापेक्षा तो अनंतपटीने श्रेष्ठ असतो.'

विवेकानंदांचा सर्व उपदेश, शिकवण, संकल्पना व त्यांचे कार्य यांचा पाया असणारे हे मूलभूत प्रमेय समजण्यासाठी विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाच्या मूलतत्त्वांमध्ये जरा खोलवर गेले तर ते आपल्या फायद्याचे ठरेल. धर्माची मूलतत्त्वे या विषयावरील एका अपूर्ण लेखामध्ये विवेकानंद लिहितात :

'बाह्यरूप आंतररूपानुसार ठरते की आंतररूप बाह्यरूपानुसार, जडवस्तू चिद्तत्त्वाने नियत होते की चिद्तत्त्वामुळे जडवस्तू, भोवतालच्या गोष्टींनी मन घडते की मन परिस्थिती घडवते, हा सर्वात जुना प्रश्न आहे आणि आजही तो तितकाच नवा आणि वादग्रस्त आहे. आद्य काय किंवा कारण कोणते व कार्य कोणते हा प्रश्न बाजूला ठेवला, मन हे जडवस्तूचे कारण आहे की जडवस्तू ही मनाचे कारण आहे हा प्रश्न न सोडवला, तरी एक उघड आहे : आंतरिक तत्त्वामुळे बाह्य वास्तवता प्रत्यक्षात घडवली आहे किंवा नाही याचे उत्तर काही असो, पण आपल्याला बाह्य वास्तव ज्ञात होण्यासाठी मात्र त्याला **आंतरिक वास्तवतेनुसार ठरणारे रूप** प्राप्त झालेच पाहिजे. असे समजू की बाह्य विश्व हे अंतर्विश्वाचे कारण आहे; पण तरीही आपल्या मनाचे मूलकारण या स्वतंत्र स्वरूपात हे बाह्य विश्व आपल्याला नेहमीच **अज्ञात व अज्ञेय** रहाणार. याचे कारण बाह्य विश्वाचा जो भाग किंवा जो पैलू आपल्या मनोव्यापारांशी जुळते घेतो, या मनोव्यापारांचेच प्रतिबिंब असतो, तोच फक्त आपल्या मनोव्यापारांच्या कक्षेत येऊ शकतो. बाह्य विश्वाच्या फक्त याच भागाचे तितकेच ज्ञान आपल्या मनाला होऊ शकते. पण जे **खुद्द मनाचेच प्रतिबिंब आहे** ते मनाच्या अस्तित्वाचे मूलकारण असूच शकत नाही. म्हणजेच, संपूर्ण अस्तित्वाच्या पसाऱ्याचा जो भाग मन तोडून अलग करते व त्याचे ज्ञान प्राप्त करून घेते, तो भाग मनाचे मूलकारण असूच शकत नाही. कारण मुळात त्याचे अस्तित्व हेच **मनामध्ये व मनाच्या मार्फतच** ज्ञात होऊ शकते.'[१८]

एकोणिसाव्या शतकातल्या युरोपमधील आत्मनिष्ठ चिद्वाद्यांचा ही प्रख्यात

भूमिका आहे. त्यांनी अशी शिकवण दिली की आपल्या जाणिवेबाहेर जे वस्तुनिष्ठ जगाचे अस्तित्व आहे ते अज्ञात आणि अज्ञेय आहे; कारण ज्या साधनाद्वारे आपण त्या जगाचे ज्ञान करून घ्यायचे असते त्या साधनाच्या, म्हणजे मनाच्या, स्वत:च्याच अशा मर्यादा आहेत. यावरून ते असा निष्कर्ष काढतात की मन, मानसिक व्यापारांचे आंतरिक जग, आत्मा, हा बाहेरच्या जगावर अवलंबून नसतो. तो स्वतंत्रपणे अस्तित्वात असतो. म्हणून, त्याच लेखात विवेकानंद स्पष्टपणे मांडतात त्यानुसार :

'अशा प्रकारे जडवस्तूच्या अस्तित्वावरून मनाच्या अस्तित्वाच्या निष्कर्षापर्यंत येणे तर्कदृष्ट्या अशक्य आहे. कारण अगदी उघड आहे. विचार आणि जीवन या गुणधर्मांपासून वंचित असलेला आणि बाह्यत्वाचा गुण लाभलेला असा अस्तित्वाचा भाग म्हणजे जडवस्तू; आणि बाह्यत्वाचा गुणधर्म न लाभलेला आणि विचार व जीवन या गुणधर्मांची देणगी लाभलेला असा अस्तित्वाचा भाग म्हणजे मन. आता, मनाच्या आधारे जड वस्तूचे अस्तित्व किंवा जडवस्तूच्या आधारे मनाचे अस्तित्व सिद्ध करू जाणे म्हणजे **प्रत्येकातले जे गुणधर्म आपण आधीच काढून घेतले** त्यांचेच अस्तित्व प्रत्येकात आहे असे सिद्ध करणे आहे; आणि म्हणूनच मन किंवा जडवस्तू यातल्या कार्यकारणभावासंबंधीचा वाद म्हणजे केवळ शब्दकोडे आहे; त्याहून अधिक काही नाही.' [१९]

या प्रकारे जडवस्तू आणि मन या दोहोंना दोन स्वतंत्र, हवाबंद कप्प्यांमध्ये विवेकानंद विभागून टाकतात. अर्थातच त्या दोहोंतला कार्यकारणात्मक अन्योन्य संबंध ते पहात नाहीत. जडवस्तुवादी आणि चिद्वादी या दोहोंच्या विरुद्ध युक्तिवाद करताना ते म्हणतात :

'मनाच्या अस्तित्वाचे मूळ प्रयोगशाळेतील भौतिक मूलतत्वांमध्ये (एलेमेंट्स्) आहे हे सिद्ध करण्याचा दावा करून जडवस्तूवादी चिद्वाद्याला घाबरवतो. परंतु वस्तुत: तो अशा एका तत्वाचे वर्णन करू बघत असतो की जें मूलतत्वे आणि अणू यांच्या पलीकडे आहे, ज्याच्यातून बाह्य व आंतरिक असे सर्व व्यापार निष्पन्न होतात; याच सर्वश्रेष्ठ गोष्टीला तो जडवस्तू असे (तत्वज्ञानातील 'जडवस्तू'– विनय रॉय.) संबोधतो. दुसरीकडे जडवस्तुवाद्याच्या या अणूंचा व मूलतत्वांचा उगम त्याच्या स्वत:च्या विचारातूनच झाला आहे असे सिद्ध करण्याची चिद्वादी धडपड करत असतो, आणि तसे करत असताना त्यालाही अशा कशाचेतरी अधूनमधून दर्शन होत असते की जे जड व चिद् या दोहोंचे स्त्रोत आहे, ज्याला तो बऱ्याचदा ईश्वर म्हणून संबोधतो. याचा अर्थ, एक पक्ष या संपूर्ण विश्वाचे स्पष्टीकरण विश्वाच्या अशा एका अंशाच्या आधारे देऊ बघतो की जो अंश **बाह्य** आहे, तर दुसरा पक्ष विश्वाच्या **आंतरिक** असणाऱ्या अंशाच्या आधारे हे करू बघत असतो. पण हे दोन्ही प्रयत्न अशक्य कोटीतले आहेत. **जड व चिद् हे परस्परांचे**

स्पष्टीकरण करतात. सर्वंध विश्वाचे स्पष्टीकरण आपण अशा कोणत्यातरी गोष्टीच्या आधारे द्यायला हवे की ज्यात **जड व चिद् या दोहोंचा अंतर्भाव आहे.**

'मन असल्याशिवाय विचार अस्तित्वातच असू शकणार नाही असा युक्तिवाद करता येईल. पण, जेव्हा विचारच नव्हता असा काळ होता असे मानले तरी, **आपल्याला ज्या स्वरुपात ज्ञात आहे ती जडवस्तू** खचितच अस्तित्वात येऊ शकली नसती. उलटपक्षी, असेही म्हणता येईल की अनुभवाशिवाय ज्ञान अशक्य असल्यामुळे आणि अनुभव हे बाह्य जगाच्या आधारेच येणे शक्य असल्यामुळे, जडवस्तूच्या अस्तित्वाशिवाय आपल्याला ज्ञात आहे त्या स्वरुपाच्या मनाचे अस्तित्व अशक्यच आहे.

'तसेच त्या दोहोंपैकी कोणत्याही एकाला आरंभबिंदू असणेही शक्य नाही... **या दोहोंना** (जडवस्तू आणि मन–रॉय) **आरंभबिंदू असा नाहीच.**'[२०]

म्हणजे विवेकानंदांच्या मते, प्रत्ययाला येणारे जड जग आणि विचार, चिद्व्यापार यांचे जग ही दोन्ही चिरंतनपणे, एकमेकापासून स्वतंत्ररित्या पण एकाच वेळी बाजूबाजूला अस्तित्वात असतात; आणि मनापासून जडवस्तू निष्पन्न होत नाही किंवा जडवस्तूपासून मन निष्पन्न होत नाही. पण मग प्रत्ययाला येणारे बाह्य जग आणि चिद्व्यापारांचे विश्व या दोहोंचा आपल्या ज्ञानाशी संबंध कसा लावायचा? विवेकानंद म्हणतात की ते स्पष्टीकरण या दोहोंच्या बाहेर आणि दोहोंच्यावर **अवलंबून नसलेल्या** 'कशात तरी' शोधले पाहिजे. ह्या तिसऱ्या 'कशाची तरी' गरज अनिवार्य का ? कारण :

'ज्याप्रमाणे चित्राला पटाची वा कॅनव्हासची आवश्यकता असते त्याप्रमाणे, जगाची संकल्पना तयार करण्यासाठी, बाह्य जगाच्या आकलनांचा जमा केलेला सगळा संचय एकत्र संघटित करण्यासाठी आधार म्हणून 'कशाची तरी' गरज आहे. जर बाह्य जगाचे ज्ञान असे संपादित करण्यासाठी आधार म्हणून विचार किंवा मन हा कॅनव्हास मानला तर विचारांना किंवा मनालासुद्धा तशाच आणखी एका कॅनव्हासची गरज आहे. मन हे विविध भावभावना आणि इच्छा यांची मालिका असेल, ते एकच एक नसेल, तर त्याच्या एकत्रीकरणाला वा एकत्वाला पार्श्वभूमी म्हणून खुद्द: **मनाव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीतरी** आवश्यकता आहे. येथे सर्व विश्लेषण थांबून जाते, कारण खरेखुरे एकत्व सापडले आहे.

'पलिकडे असणारे हे 'काहीतरी' इंद्रियसंवेदनांच्या पलिकडचे असते. ती **एक तार्किक** आवश्यकता आहे. आणि त्याच्या अनिर्वचनीय अस्तित्वाची अनुभूती आपल्या सर्व इंद्रियज्ञानामधून सतत वाहत असते. आपल्याला असेही दिसते की **आपल्या विवेकबुद्धीशी** आपल्याला **प्रामाणिक रहायचे** असेल, आपल्या सर्वसामान्यीकरण करणाऱ्या **बुद्धीशी एकनिष्ठ रहायचे असेल,** तर केवळ याच कारणाने अनिवार्यपणे आपण ह्या 'काहीतरी' कडे ओढले जातो.'[२१]

हे अगदी स्पष्ट विधान आहे. म्हणजे, केवळ आपल्या बुद्धीच्या तर्कसुसंगत रहाण्याच्या आवश्यकतेपोटी हे 'पलिकडे असणारे काहीतरी' निष्पन्न झालेले आहे. ही गरज निर्माण झाली आहे याचे कारण काय आहे ? मन, विचार वगैरे गोष्टी एका अतिशय विकसित रूपातील जडवस्तू असणाऱ्या मेंदूची निर्मिती आहे, मेंदूचे कार्य आहे, आणि बाह्य जगाचे आपले ज्ञान व मेंदूच्या सामर्थ्याद्वारे काढलेली सर्वसामान्य प्रमेये ही पुरेशी विश्वसनीय असतात, या संकल्पनेशी विवेकानंद सहमत होऊ शकत नाहीत. आज जे 'अज्ञात' आहे ते उद्या 'ज्ञात' होईल. कांटप्रणित 'स्वमात्र वस्तू' (थिंग इन इटसेल्फ) ही 'आपल्यासाठी वस्तू' (थिंग फॉर अवरसेल्व्हज) बनेल. आणि पूर्वीचे ज्ञान आणि बाह्य जग, मानवी समाज व मानवी मन यांच्या नियमांचे नव्याने शोधलेले ज्ञान यांचा एकत्रितपणे आपण आधार घेतला, तर जडवस्तू आणि मन या दोन्हीविषयीचे आपले ज्ञान पायरीपायरीने वाढेल. ही कधीच न संपणारी प्रक्रिया आहे. सतत बदलणाऱ्या प्रक्रियेचे आकलन करून घेतल्याने मनामध्येही परिवर्तन घडते आणि त्याचा विकास होतो. पण हे गृहिततत्व विवेकानंदांना मान्य नाही. ते म्हणतात :

'अपरिवर्तनीय अशा 'काहीतरी'च्या कल्पनेशिवाय परिवर्तनीय असे 'काहीतरी' कधीच समजून घेता येणार नाही. अपरिवर्तनीयाशिवाय परिवर्तनीय समजून घेण्यामधे आपण असमर्थ ठरतो ही वस्तुस्थितीच आपल्याला सर्व परिवर्तनीयांची एक पार्श्वभूमी म्हणून अपरिवर्तनीय असे काहीतरी गृहित धरायला भाग पाडते.' [२२]

म्हणजे, परिवर्तनशील गोष्टींचे आकलन करून घेण्यासाठी देखील काहीतरी अपरिवर्तनीय, काहीतरी पलीकडचे, जडवस्तू आणि मन यांच्या बाहेर नांदणारे असे काहीतरी, पार्श्वभूमी म्हणून असण्याची गरज आहे. जिच्या बाहेर काहीही नाही, अशा या शक्तीला विवेकानंद ब्रह्म, वेदांतातील ईश्वर म्हणतात हे आपण आधीच पाहिले आहे. हा ईश्वर स्वतःच विश्व असतो. तो परमश्रेष्ठ, केवलस्वरूप, चिरंतन व अपरिवर्तनीय, अचल असा असतो. या जगातल्या घडामोडी, कल्पना व विचार बदलतात, पण ब्रह्म बदलत नसते. आणि निसर्गात, मानवाच्या आत्म्यात, सर्व ठिकाणी हे केवल सत्य नांदत असते.

हे अचल केवलस्वरूप ब्रह्म हाच प्रत्येक स्त्री-पुरुषाने हृदयात जोपासलेल्या स्वातंत्र्याच्या कल्पनेचा उगम आहे. ते कोणतेही कायदे, कसलीही बंधने जाणत नाही.

'प्रत्येक क्षणी मनुष्य आपले स्वातंत्र्य व्यक्त करत असतो ... श्रेष्ठ विचारवंतापासून अत्यंत अज्ञानी माणसापर्यंत प्रत्येकाला आपण स्वतंत्र आहोत हे ठाऊक असते. त्याच वेळी थोड्याशा विचाराने प्रत्येक माणसाला हेही कळते की त्याच्या

त्येक कृतीला काही उद्दिष्टे व अटी असतात, आणि ती उद्दिष्टे व अटी लक्षात घेता त्याची ती विशिष्ट कृती कार्यकारणभावाने निश्चित होणाऱ्या एखाद्या सत्या-इतकीच काटेकोरपणे निश्चित करता येऊ शकते.

'येथेसुद्धा पुन्हा तीच अडचण येते. एखाद्या छोट्या रोपट्याच्या वाढीला किंवा दगड खाली पडण्याला कार्यकारणभावाचे नियम जसे लागू असतात, तसेच माणसाची इच्छाशक्तीसुद्धा कार्यकारणभावाच्या नियमांनी जखडलेली असते; आणि तरीही, या सर्व बंधनांमध्येच अविनाशी अशी स्वातंत्र्याची कल्पना नांदत असते. येथेदेखील सर्वंकषतेची बाजू घेणारा पक्ष (म्हणजे जडवस्तुवादी–रॉय) म्हणेल की स्वातंत्र्याची कल्पना केवळ एक मृगजळ आहे आणि माणूस हा संपूर्णपणे नियत झालेला, आवश्यकतांचा गुलाम असलेला प्राणी आहे.

'आता, एकतर स्वातंत्र्याला भ्रम म्हणून नाकारणे हे काही खरे स्पष्टीकरण नव्हे; दुसरे, अनिवार्यता किंवा कार्यकारणभाव ही कल्पना म्हणजे अज्ञानातून येणारा भ्रम आहे असे का म्हणू नये...म्हणूनच आपल्यासमोर एवढा एकच मार्ग उरतो की शरीर स्वतंत्र नाही किंवा इच्छाशक्तीसुद्धा स्वतंत्र नाही, पण मन आणि शरीर यांच्या पलिकडे असे काहीतरी असलेच पाहिजे की जे स्वतंत्र आहे, असे मान्य करणे.' [२१]

विवेकानंदांची स्वातंत्र्याची संकल्पना ही होती. शरीर आणि इच्छाशक्ती या दोन्ही गोष्टी बाह्य जगाच्या नियमांनी आणि कार्यकारणभावाच्या नियमांनी बांधलेल्या असतात हे ते स्वीकारतात. पण त्यांची स्वातंत्र्याची संकल्पना ही सर्वोच्च, केवल आणि अचल व अपरिवर्तनीय असे जे आहे ते प्राप्त करण्याची आकांक्षा बाळगते. म्हणूनच स्वातंत्र्याचा वा मुक्तीचा लढासुद्धा एक न संपणारी प्रक्रिया आहे. तिच्याद्वारे मानव अधिकाधिक परिपूर्णता प्राप्त करून घेतो.

स्वातंत्र्याची ही संकल्पना समता (इक्वालिटी) आणि अभिन्नता (सेमनेस) या संकल्पनांशी जोडलेली आहे, आणि त्या दोन्ही अपरिवर्तनीय, चिरंतन, केवल, परमोच्च आत्म्याशी जोडलेल्या आहेत. म्हणून विवेकानंद शेवटी सांगतात :

'म्हणून येथे किंवा अन्यत्र कल्याणकारी काम करण्यास वेदांतामध्ये फार मोठा वाव आहे. येथे किंवा अन्यत्र मानववंशाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी, तिच्या उन्नतीसाठी ही अभिन्नतेची आणि सर्वव्यापी परमात्म्याच्या कल्पनेची ही थोर शिकवण लोकांपर्यंत पोचवली पाहिजे. अनुभवावरून मला असे आढळले आहे की जेथे जेथे पाप असते, अडाणीपणा आणि ज्ञानाचा अभाव असतो, तेथे आपल्या पवित्र धर्मग्रंथांत सांगितल्याप्रमाणे,भेदांवर व भिन्नत्वावर अवलंबून रहाण्यातून पाप निर्माण होते. आणि जे काही चांगले घडते ते सर्व अभिन्नत्वावरील, सर्व गोष्टींच्या एकत्वावरील विश्वासामुळे घडते. वेदांताचा महान आदर्श हा आहे...वेदांतामधले

विश्वात्म्याच्या अभिन्नत्वाचे आणि सर्वव्यापी अस्तित्वाचे महान सत्य हा माझ्या शिकवणीचा आधार आहे.' [२४]

या दृष्टिकोनाने शस्त्रसज्ज होऊन, आणि त्यांना वेदांताचा हा जो अर्थ प्रतीत झाला होता तो या भंगलेल्या, कलहग्रस्त जगात ऐक्य घडवू शकेल, सर्व धर्मांची जननी होऊ शकेल अशी पक्की खात्री बाळगून, विवेकानंद अमेरिकेतल्या शिकागो येथे भरणाऱ्या जागतिक धर्मपरिषदेला उपस्थित रहाण्यासाठी निघाले.



परदेशातील प्रवास

१८९३ साली शिकागोमध्ये सर्वधर्मपरिषद भरली. जगातल्या जवळजवळ सर्व धर्मांच्या प्रतिनिधींना या परिषदेसाठी आमंत्रण दिले होते. जगातल्या राज्यकर्त्या राष्ट्रांतील धर्मांना या परिषदेत विशेष स्थान दिले गेले होते आणि पारतंत्र्यातील राष्ट्रांच्या धर्मांना मागे टाकण्यात आले होते. जगातल्या अतिप्राचीन धर्मांपैकी एक आणि भारतातले कोटचवधी लोक जो आजही पाळतात अशा हिंदू धर्माला त्या परिषदेत प्रतिनिधित्व मिळालेले नव्हते. हिंदू धर्माकडे असे दुर्लक्ष केल्याबद्दल भारतात तीव्र संताप व्यक्त केला गेला. देशातल्या बऱ्याचशा राजे-रजवाडचांच्या आणि धनिक मित्रांच्या उदार मदतीने विवेकानंद आमंत्रण नसतानाही शिकागोला निघाले. आपल्या धर्माचे आणि देशाचे तेथे प्रतिनिधित्व करावे आणि या तऱ्हेने त्यांचा नैतिक अधिकार प्रस्थापित करावा याच एका हेतूने ते गेले होते.

पाश्चिमात्य लोकांशी व तेथल्या विद्वानांशी संबंध जोडायचे, विचारांची देवाणघेवाण करायची हाच विवेकानंदांच्या मते त्यांच्या परदेशातील प्रवासाचा मुख्य हेतू होता.

सर्व धर्मांचा भ्रातृभाव, सर्व माणसांमधील आणि राष्ट्रांमधील समता यांचा उपदेश करण्यासाठी विवेकानंद शिकागोला गेले. परंतु सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात जी विषमता, अन्याय, उच्चस्थाने व विशेषाधिकार, आणि मालक-गुलामाचे नाते आढळते तसे ते सर्व धार्मिक क्षेत्रातही अस्तित्वात असलेले पाहून त्यांचा घोर अपेक्षाभंग झाला. एका वासाहतिक देशातल्या धर्माचे ते प्रतिनिधी होते आणि प्रचलित व्यवस्थेनुसार साम्राज्यवाद गाजवणाऱ्या, प्रमुख राष्ट्रांच्या

धर्मापेक्षा आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा किंवा त्या सर्व धर्मांची ती जननी आहे असा दावा सांगण्याचा त्यांना अधिकार नव्हता हे कटू सत्य त्यांना पचवावे लागले.

११ सप्टेंबर १९८३ रोजी परिषदेत दिलेल्या पहिल्या भाषणात विवेकानंदांनी घोषित केले :

'माझ्या अमेरिकन बंधु-भगिनींनो,

तुम्ही ज्या जिव्हाळ्याने व प्रेमाने आमचे स्वागत केले त्यामुळे माझे हृदय अवर्णनीय आनंदाने भरून गेले आहे. या जगातल्या यतिवर्गाच्या सर्वात प्राचीन परंपरेच्या वतीने मी तुमचे आभार मानतो; सर्व धर्मांची जननी अशा आमच्या हिंदू धर्माच्या वतीने मी तुमचे आभार मानतो...'[२५]

या घटनेनंतर केवळ नऊच दिवसांनी विवेकानंदांनी कडवटपणे परिषदेत म्हटले :

'पाखंडी माणसांचा आत्मा वाचवण्यासाठी धर्मप्रसारक पाठवण्याची तुम्हा ख्रिस्त्यांना फार हौस आहे. भुकेने तडफडणारी त्यांची शरीरे तुम्ही का वाचवत नाही ? दुष्काळात भारतामध्ये हजारो लोक भुकेने मेले तरी तुम्ही ख्रिस्ती लोकांनी काही केले नाही. भारतभर तुम्ही अनेक चर्चे उभारलीत. पण पूर्वेकडचे आक्रंदन धर्मासाठी नाही; त्यांच्याकडे धर्म पुरेसा आहे. होरपळून निघणाऱ्या भारतवर्षात हालअपेष्टा भोगणारे लाखो लोक सुकलेल्या घशाने भाकरीसाठी आक्रोश करत आहेत. भुकेने तडफडणाऱ्या लोकांसमोर धर्म पुढे करणे हा त्यांचा अपमान आहे...माझ्या दरिद्री देशबांधवांसाठी मदत मागण्याकरता मी येथे आलो, परंतु या ख्रिस्ती भूमीत ख्रिस्ती लोकांकडून पाखंड्यांसाठी मदत मिळणे ही किती कठीण गोष्ट आहे हे मला आता पूर्णपणे समजले.'[२६]

जणू त्यांचा हा दृष्टिकोन अधिक साक्षेपी व व्यापक बनवण्यासाठीच अमेरिकेतील निग्रोंची भयावह समस्या अगदी नागडया स्वरुपात त्यांच्यासमोर उभी राहिली. भारतातल्या काळचा, वासाहतिक गुलामांचा संघर्ष करणारा प्रतिनिधी या नात्याने त्यांना निग्रो लोकांबद्दल केवळ सहानुभूतीच वाटत नव्हती, तर त्या समस्येच्या तीव्रतेमुळे व गंभीरतेने त्या समस्येचा विचार करणे व त्यामागील सामाजिक-आर्थिक कारणांचा शोध घेणे त्यांना भाग पडले.

स्वामी विवेकानंदांनी लिहिले, 'अमेरिकेतील गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जे युद्ध झाले, त्यासारखी मानवी हक्क आणि स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी प्रचंड उलथापालथ दुसऱ्या कोठे झाल्याची कल्पनाही करणे शक्य नाही. तुम्ही सर्वजण हे जाणता. पण त्यातून काय निष्पन्न झाले ? गुलामगिरी नष्ट होण्यापूर्वी गुलाम जसे होते त्यापेक्षा शेकडो पटींनी आज गुलामांची अवस्था अधिक वाईट आहे. गुलामगिरी नष्ट होण्यापूर्वी हे गरीब निग्रो कुणाची तरी मालमत्ता होते;

मालमत्ता असल्यामुळे त्यांची स्थिती अधिक खालावू नये म्हणून तरी त्यांची काळजी घेणे भाग पडत होते. पण आज ते कुणाचीही मालमत्ता उरलेले नाहीत. त्यांच्या जीवनाला काही किंमत उरली नाही; खोट्या सबबींवर त्यांना जिवंत जाळले जाते, गोळचा झाडून त्यांना मारले जाते. आणि त्यांच्या मारेकऱ्यांना कोणताही कायदा लागत नाही, कारण ते 'निगर' आहेत, ती माणसे नाहीत, ती जनावरेसुद्धा नाहीत'...[२७]

हे खरे की गुलामगिरीची प्रथा बंद पाडण्यासाठी ज्या हिंसक पद्धती वापरल्या गेल्या त्याच्याशी विवेकानंद याचा संबंध जोडतात व तसेच ते सर्व माथेफिरू (फॅनॅटिक) चळवळींचा धिक्कार करतात. ते पुढे म्हणतात, 'कोणतीही दुष्ट गोष्ट कायद्याने किंवा माथेफिरूपणे हिंसक पद्धतीने नष्ट करण्याचा परिणाम हाच होतो. कोणतीही चांगली गोष्टसुद्धा करू बघणाऱ्या प्रत्येक माथेफिरू चळवळीविरुद्ध इतिहासाची हीच साक्ष आहे. मी ते पाहिले आहे. माझ्या स्वतःच्या अनुभवाने मला ते शिकवले आहे...'[२८]

थिऑसॉफिस्ट पंथीय आणि ख्रिस्ती धर्मप्रसारक यांच्याकडून होणाऱ्या ज्या माथेफिरू विरोधाला विवेकानंदांना परदेशात तोंड द्यावे लागले त्या संदर्भात हा माथेफिरूपणाचा उल्लेख आला आहे. 'या लोकांनी माझ्याविरुद्ध वापरले नाही असे एकही काळेकुट्ट घाणेरडे असत्य उरले नसेल. एका परक्या देशात मी होतो, गरीब आणि एकाकी होतो. तरीही प्रत्येक शहराशहरात यांनी माझ्या चारित्र्याला काळिमा फासला. त्यांनी मला प्रत्येक घरातून हाकलून लावण्याचा प्रयत्न केला. जो माझा मित्र होईल त्या प्रत्येक माणसाला माझा शत्रू करण्याचा प्रयत्न केला, त्यांनी मला भुके मारण्याचा प्रयत्न केला आणि माझ्याविरुद्धच्या या कृत्यात माझ्या एका देशबांधवानेही भाग घेतला होता. हे सांगताना मला वाईट वाटते... आणि या सद्गृहस्थाशी माझी लहानपणापासून ओळख होती; तो माझ्या चांगल्या मित्रांपैकी एक होता...'[२९]

पहिल्या परदेश प्रवासाहून परत आल्यानंतर मद्रास येथील एका सभेत या घटनांचा वृत्तांत सांगताना विवेकानंद निष्कर्ष काढतात,

'स्वतःच्या आयुष्याची चौदा वर्षे ज्या माणसाने उपासमारीत काढली आहेत, उद्या जेवण कुठे मिळेल आणि कुठे झोपायला मिळेल हे ज्याला ठाऊक नाही, अशा माणसाला इतक्या सहजपणे घाबरवणे शक्य नाही. जेथे तपमापक शून्याखाली तीस डिग्री तपमान दर्शवतो अशा ठिकाणी जवळजवळ वस्त्रहीन स्थितीत जगण्याचे धाडस जो दाखवतो, आपल्याला पुढचे जेवण कोठून मिळणार याचा ज्याला पत्ता नसतो अशा माणसाला सहजपणे घाबरवणे शक्य नाही... माझ्यापाशी थोडीफार इच्छाशक्ती आहे. मला स्वतःला अल्पसा अनुभवही आहे;

आणि सबंध जगाला देण्यासाठी माझ्याकडे एक संदेश आहे. कसलीही भीती न बाळगता आणि भविष्याची पर्वा न करता मी तो संदेश देणार आहे.'[१०]

विवेकानंदांनी पाश्चिमात्य राष्ट्रात ही जी प्रचारमोहीम काढली आणि अविश्रांत मेहनत घेतली त्याचा फार मोठा परिणाम झाला. पाश्चिमात्य धर्मप्रसारक, थिऑसॉफिस्ट लोक आणि इतर पक्षपाती निरीक्षक यांनी खोडसाळपणे प्रचार करून भारत म्हणजे चमत्कार, गूढ रहस्ये, हातचलाखी यांनी भरलेला एक अर्ध-रानटी देश अशी जी प्रतिमा तयार केली होती तिला चांगलाच हादरा बसला. पाश्चिमात्य जगातल्या धार्मिक आणि राजकीय नेत्यांशी तसेच थोर विचारवंतांशी विवेकानंद फार व्यापक प्रमाणावर संबंध जोडू शकले. त्यांच्या स्वतःच्या निरीक्षणावरून पश्चिमेकडच्या सामान्य लोकांच्या जीवनाविषयी त्यांना काही प्रमाणात आकलन झाले. अमेरिकेत आणि इंग्लंडमध्ये रामकृष्ण मिशनच्या शाखा ते प्रस्थापित करू शकले. भारतातून नियमितपणे आपले शिष्य या केंद्रांमध्ये पाठवण्याची त्यांनी व्यवस्था केली. विवेकानंद ज्या काळात इंग्लंडमध्ये होते त्याच काळात आशिया खंडाचा आणखी एक थोर पुत्र– डॉ. सन यत् सेन हेसुद्धा तेथे होते. विवेकानंद स्वतः डॉ. सन यत् सेनना भेटू शकले नाहीत, पण त्यांचा धाकटा बंधू महेंद्रनाथ दत्त यांनी या चिनी नेत्याशी घनिष्ट संबंध ठेवला.

लंडनमध्ये विवेकानंद क्रोपोट्किन या रशियन अराज्यवाद्याच्या संपर्कात आले. रशियाला भेट देण्याची त्यांची तीव्र इच्छा होती, पण अनेक कारणांमुळे ती पूर्ण होऊ शकली नाही.

राष्ट्रीय पुनरुत्थानाचा कार्यक्रम

अमेरिका आणि इंग्लंडचा यशस्वी दौरा करून परतल्यावर विवेकानंदांनी सबंध भारताचा दौरा केला. प्रत्येक ठिकाणी त्यांचे एखाद्या विजयी वीरासारखें स्वागत झाले. प्रचंड सभा भरवल्या गेल्या आणि प्रत्येक सभेत लोकांनी त्यांचे म्हणणे अत्यंत लक्षपूर्वकरित्या ऐकले. ह्या काळात त्यांनी अगणित भाषणे दिली आणि अनेक पुस्तिका लिहिल्या. फक्त धर्मावर नव्हे तर समाजशास्त्राच्या विविध पैलूंवर, आपल्या मातृभूमीच्या भविष्यावर आणि एकूण मानवतेच्या भवितव्यावर त्या पुस्तिका होत्या. त्यांच्या दृष्टिकोनाला अधिकाधिक राजकीय रंग येऊ लागला होता. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांमध्ये त्यांची दृष्टी मूलतः आदर्शवादी स्वरुपाची होती, पण त्यासंबंधीची त्यांची मते अधिकाधिक जहाल होत गेली.

भारताच्या राष्ट्रीय पुनरूत्थानाबद्दल विवेकानंदांनी जो कार्यक्रम पुढें मांडला तो त्यांनी काही एकदम आखलेला नव्हता, एकाच भाषणात किंवा एकाच लेखात तो त्यांनी मांडला नाही. पण त्यांच्या जाहीर भाषणांतून, अनौपचारिक भाषणांतून, लेखांमधून तो हळूहळू आकार घेत गेला. त्याच्या मूळ गाभ्यात, भविष्यातील जग व भविष्यातील भारत यांचे चित्रण करण्याच्या ध्येयवादी प्रयत्नांमधून आलेले विचार होते. त्या नव्या जगात तळागाळाची कष्टकरी जनता किंवा 'शूद्र' हे समाजाचे नेते आणि राज्यकर्ते असतील असे विवेकानंदांचे मत होते. मूलतः तो एक भांडवली–लोकशाही कार्यक्रम होता.

मी वर उल्लेख केल्याप्रमाणे मद्रास येथील भाषणात विवेकानंद म्हणाले : 'जगाला देण्यासाठी माझ्याजवळ एक संदेश आहे. कसलीही भीती न बाळगता, भविष्याविषयी पर्वा न करता मी तो संदेश देणार आहे. सुधारणा मागणाऱ्यांना

मी दाखवून देणार आहे की त्यांच्यातल्या कोणाहीपेक्षा मी जास्त श्रेष्ठ सुधारणावादी आहे. त्यांना अगदी फुटकळ सुधारणा करायची आहे, मला अगदी मुळांपासून शेंड्यापर्यंत सुधारणा हवी आहे. फरक आहे तो आमच्या पद्धतीत आहे... सुधारणेवर माझा विश्वास नाही, विकासावर माझा विश्वास आहे... हे विलक्षण राष्ट्ररूपी यंत्र वर्षानुवर्षे चालले आहे, आपल्या डोळ्यांसमोर ही राष्ट्रजीवनाची सुंदर गंगा वाहात आली आहे...तिच्याभोवती परिस्थितीचे अनेक ढग गर्दी करतात, तिला विशिष्ट प्रकारचा रेटा देतात, त्यामुळ कधी तिची गती मंद होते तर कधी जलद होते...राष्ट्रीय जीवनाला आवश्यक ते इंधन जरूर पुरवा, पण त्याची वाढ मात्र खास त्याची स्वत:ची असेल; ती कशी असेल हे दुसरे कोणी ठरवू शकणार नाही.' [११]

भारतीयांनी स्वत:च भारताला वाचवले पाहिजे अशा मताचे विवेकानंद होते. पण त्यांची सुरुवातीला जी भूमिका होती त्यालाच धरून रहाण्याचे त्यांनी आता नाकारले, हा या संकल्पनातला नवा घटक होता. बाकीच्या जगापासून अलिप्त राहून, फक्त आपल्या प्राचीन वैभवाची आणि प्राचीन भारताच्या आध्यात्मिक वारशाची पुन्हा स्थापना करून भारत आपल्या विकासाचा मार्ग अनुसरेल अशी त्यांची सुरुवातीची भूमिका होती, ती आता बदलली.

'आपण दुसऱ्या राष्ट्रांशी मिसळत नाही ही माझ्या मते आपल्या राष्ट्रीय अध:पतनातली कळीची बाब आहे, हेच एकमेव कारण आहे. आपल्या परिस्थितीची इतरांशी तुलना करून पहाण्याची आपल्याला कधी संधीच मिळाली नाही. आपण कूपमंडूक होतो.' [१२]

कलकत्त्यामध्ये राजा राधाकांत देव बहादूर यांच्या सोभा बाजारमधील निवासस्थानी, विवेकानंदांच्या सन्मानार्थ नागरिकांतर्फे एक स्वागत–समारंभ झाला होता. तेथे विवेकानंदांच्या मित्रांनी आणि चाहत्यांनी जी भाषणे केली त्यांना उत्तर देताना ते म्हणाले :

'भारताने स्वत:ला संकुचित बनवून घेतले; कालव जसे स्वत:ला शिंपल्यात ओढून घेते त्याप्रमाणे भारत स्वत:च्या कोशात जाऊन बसला; स्वत:कडची रत्ने आणि खजिना मानवाच्या इतर वंशांना देण्याचे त्याने नाकारले; आर्यवंशाव्यतिरिक्त बाहेरच्या तहानलेल्या राष्ट्रांना स्वत:जवळचे जीवनदायी सत्य देण्याचे त्याने नाकारले. भारताच्या यातनांच्या आणि अधोगतीच्या महत्त्वाच्या कारणांपकी हे एक आहे. आपण देशाबाहेर गेलो नाही, इतर राष्ट्रांशी आपण संवाद केला नाही, तुलना करून पाहिले नाही, हे आपल्या अध:पतनाचे एक फार मोठे कारण आहे. भारतात जी काही थोडीशी जागृती दिसते, जी काही थोडीशी जीवनाची धुगधुगी आढळते ती केव्हा सुरू झाली हे तुमच्यापैकी प्रत्येकाला ठाऊक आहे. अलिप्ततेच्या या भिंती राजा राममोहन रॉय यांनी ज्या दिवशी फोडल्या

त्याच दिवशी हे सुरू झाले. त्या दिवसापासून भारताच्या इतिहासाने एक वेगळेच वळण घेतले आहे आणि तो आता अधिकाधिक वेगाने विकसित होत आहे. आतापर्यंतच्या काळात आपण अशा प्रकारचे लहानसे ओहोळ पाहिले आहेत, पण आता महाप्रलय येणार आहेत आणि त्यांना थोपवून धरणे कोणालाही शक्य नाही. म्हणून आपण बहिर्मुख झाले पाहिजे. देवाणघेवाण करणे हेच जीवनाचे रहस्य आहे. आपण नेहमीच फक्त घेणार आहोत का? प्रत्येक गोष्ट शिकण्यासाठी, अगदी धर्मसुद्धा शिकण्यासाठी आपण नेहमी पाश्चात्यांच्या चरणाशीच बसणार आहोत का? आपण त्यांच्याकडून यंत्ररचना शिकू शकतो. आपण त्यांच्याकडून इतर अनेक गोष्टी शिकू शकतो.परंतु आपण त्यांना काहीतरी शिकवलेही पाहिजे... म्हणून आपण देशाबाहेर गेले पाहिजे. आपल्याला देण्यासारखे जे काही त्यांच्याकडे आहे ते घेतले पाहिजे व त्याच्या बदल्यात आपली आध्यात्मिकता त्यांना दिली पाहिजे; आपली आध्यात्मिक क्षेत्रातली संपत्ती त्यांना देऊन त्याच्या बदल्यात ऐहिक क्षेत्रातली नवनवी संपत्ती आपण घेतली पाहिजे...समानतेशिवाय मैत्री असूच शकत नाही आणि जेव्हा एकजण सदैव दुसऱ्याच्या पायाशी बसतो आणि दुसरा नेहमी त्याला शिकवतो तेव्हा मैत्री असूच शकत नाही....इंग्रज किंवा अमेरिकनांची बरोबरी जर तुम्हाला करायची असेल तर त्यांना तुम्ही काही शिकवले पाहिजे व काही शिकले पाहिजे. आणि येती अनेक शतके पुरेल इतके जगाला शिकवण्यासारखे तुमच्याकडे भरपूर आहे.'[३३]

विवेकानंदांच्या म्हणण्यानुसार भारत आणि पाश्चिमात्य जग यांच्यातल्या देवाणघेवाणीचा पाया असा होता : भारतातली आध्यात्मिकता आणि पाश्चिमात्य जगातले ऐहिक फायदे. अर्थातच या विचारात एकांगीपणा आहे, इतिहासाच्या मूलभूत गतिप्रेरणांचे संपूर्ण आकलन त्यात नाही. भारतीय इतिहासाबद्दलच्या त्यांच्या चिद्वादी संकल्पनेनुसार, भारतासारख्या देशात राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी धर्म हाच एकमेव आधार आहे असे विवेकानंदांना वाटत होते. इस्लामची सूफी आवृत्ती आणि वेदांत यांचा संयोग करून जर एकच एकात्म, संयुक्त धर्म–जो सर्व धर्मांची जननी असेल– आपल्याला निर्माण करता आला, आणि त्याचबरोबर भारतात आज अस्तित्वात असणाऱ्या धर्मांची मूलभूत वैशिष्ट्ये कायम राखता आली, जर सर्व धर्मपंथ मुक्तपणे कार्यान्वित राहू शकले (व त्या सर्वांना हा मातृधर्म एकत्र बांधून ठेवीलच) तर भारताच्या एकात्मतेचा भक्कम पाया आपण घालू शकू.

बहुधा विवेकानंदांच्या मनात येथे आध्यात्मिक एकात्मता होती, सामाजिक ऐक्य नव्हते असे म्हणावे लागेल. आपण जेव्हा धर्म विरुद्ध सामाजिक कायदेकानू आणि सामाजिक सुधारणा याविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोनाकडे वळतो तेव्हा हे स्पष्ट होते. आत्म्याला लिंग, पंथ वा जात नसते या वेदांताच्या संकल्पनेपासून सुरुवात

करून ते लिहितात : ' सामाजिक सुधारणांशी धर्माचा काय संबंध आहे ? असे जे म्हणतात त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत. परंतु सामाजिक कायदेकानू तयार करण्याचे काम धर्माचे नाही असे जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा त्यांनीसुद्धा आमच्याशी सहमत व्हायला पाहिजे... धर्माच्या संमतीने पण आर्थिक परिस्थितीतून सामाजिक कायदे निर्माण झाले. सामाजिक कारभारात हस्तक्षेप करणे ही धर्माची भयानक घोडचूक होती...सामाजिक सुधारणा करण्याची भूमिका धर्माने घेऊ नये अशी आमची इच्छा आहे हे खरे आहे, पण त्याचवेळी आम्ही असाही आग्रह धरतो की सामाजिक कायदेकानू ठरवण्याचाही धर्माला काहीएक अधिकार नाही. हात लावू नका ! तुम्ही तुमच्या मर्यादेत रहा आणि सर्व काही सुरळीत होईल. '[३४]

चर्च आणि राज्यकारभार यांना एकमेकापासून अलग करायला हवे आणि चर्चने राज्याच्या कारभारात ढवळाढवळ करू नये, या मताला पाठिंबा देण्यासाठीच हा जोरदार युक्तिवाद आहे.

विवेकानंदांच्या मते, भारतातल्या विविध लोकांना एकत्र आणण्यासाठी ' समाईक धर्म ' शिवाय ' समाईक भाषा ' सुद्धा असली पाहिजे. ही समाईक भाषा लोकांवर वरून लादली जाऊ शकणार नाही. ही समाईक भाषा सर्व भाषांची जननी अशा स्वरूपाची असावी आणि भारतातल्या सर्व भाषांमध्ये तिची मुळे रुजलेली असावीत. आणि मग स्वत:च्या अंगभूत श्रेष्ठत्वामुळे आणि सोयीस्करपणामुळे ती अखिल भारताची भाषा होईल. असे त्यांचे याबद्दलचे विचार होते आणि ते योग्यच होते. या दृष्टीने संस्कृत ही सर्वात अधिक योग्य भाषा आहे असे त्यांना वाटत होते.

याबाबतीतही आणखी एक गोष्ट आपल्या लक्षात येते. विवेकानंदांची ही मांडणी अनैतिहासिक आणि चिद्‌वादी प्रकारची असल्यामुळे वास्तवाशी तिचा नाममात्र संबंध नव्हता. एकेकाळी संस्कृत ही उत्तर भारताची राज्यभाषा होती. ती एक समृद्ध, दीर्घ परंपरा असणारी अशी महान भाषा असूनही राज्यभाषा म्हणून असलेले तिचे स्थान नष्ट झाले आणि हळूहळू ती एक अशी भाषा बनली की दैनंदिन संभाषणासाठी कोणतेच लोकसमूह ती भाषा वापरत नव्हते. सबंध भारताची एक भाषा किंवा राजभाषा असण्याचा प्रश्न अगदी खरा, बरोबर आणि अगदी समयोचित होता. परंतु एक ' आदर्श ' उपाय निश्चित करण्याच्या दृष्टिकोनातून तो प्रश्न हाती घेतल्यामुळे, त्याचा त्या काळी जे वास्तव होते त्याच्याशी फारसा संबंध नव्हता. या प्रश्नाबाबतची आजची परिस्थिती लक्षात घेता, त्यावर ' आदर्श ' उपाय शोधण्याचा दृष्टिकोन किती धोक्याचा आहे हे आपल्याला कळून येते. तरीही आपण निर्धोकपणे असा निष्कर्ष काढू शकतो की भारतातले आर्थिक;

राजकीय आणि सामाजिक जीवन जसे विकसित झाले, सबंध भारतातल्या वेगवेगळचा भाषिक जमातींमधले बंध जसे दृढ झाले, तसे समाईक दुव्याच्या प्रश्नाने, दुसऱ्या शब्दात सांगायचे तर राजभाषेच्या प्रश्नाने, लाखो भारतीयांच्या मनाचा तावा घेतला आहे व त्यांच्या मनात खळबळ माजवली आहे. ती भाषा आजची हिंदी असावी की अनेक भाषांच्या संयोगापासून विकसित झालेली एखादी भाषा असावी, हा संबंध देशाच्या भवितव्याशी घनिष्टपणे बांधलेला प्रश्न आहे. परंतु काही झाले तरी विवेकानंदांच्या कल्पनेप्रमाणे ती संस्कृत भाषा असू शकणार नाही. मला वाटते की त्याबद्दल कोणाच्याही मनात शंका नसेल.

विवेकानंद भारतीय समाजाचा आणि सामाजिक वर्तनाचा बारकाईने अभ्यास करणारे असल्यामुळे त्यांना एक गोष्ट ठाऊक होती. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या स्वरूपात जे सरंजामी प्रतिगामित्व सतत घोर सामाजिक अन्यायाला कारणीभूत ठरत आहे त्याच्या मुळावर आपण घाव घालू शकलो नाही तर खरीखुरी इष्ट सामाजिक प्रगती होणे शक्य नाही. अमेरिकेत असताना निग्रोंचा प्रश्न, कू क्लक्स क्लॅन या पंथाच्या माथेफिरूंनी निग्रोंचा केलेला छळ, निर्लज्जपणे त्यांच्या श्रमाचा केलेली पिळवणूक आणि कायद्याच्या बडग्याने हिरावून घेतलेले त्यांचे नागरी हक्क, या सर्वांमुळे स्वामीजींना निग्रोंबद्दल सहानुभूती वाटली, या सर्वाचा संताप आला. एवढेच नव्हे तर आपल्या स्वतःच्या देशातील खालच्या जातीच्या व अस्पृश्य लोकांच्या स्थितीची आणि निग्रोंच्या स्थितीची तुलना तात्काळ त्यांच्या मनात झाली.

पाश्चिमात्य देशातला आपला अल्पकाळाचा मुक्काम संपवून विवेकानंद परत आल्यावर शिवगंगा आणि मानमदुरा येथल्या जमिनदारांनी आणि नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. त्यांच्या स्वागतपर भाषणात ते म्हणाले :

'भारतातल्या धार्मिक श्रद्धांवर पाश्चात्यांच्या पोटभरू जडवस्तुवादाच्या जोरदार धाडी पडत होत्या, आपल्या महर्षींच्या उक्तींची आणि ग्रंथांची घसरण व्हायला सुरुवात झाली होती. अशा वेळी तुमच्यासारख्या नव्या गुरूंच्या आगमनाने धार्मिक पुनरुत्थानाच्या इतिहासात एक नवे युग सुरू झाले आहे. भारतीय अध्यात्म – ज्ञानरूपी अस्सल सुवर्णावर जी अशुद्धतेची पुटे तात्पुरती साठली आहेत ती दूर करण्यात तुम्ही यथावकाश यशस्वी व्हाल आणि तुमच्या बुद्धि-सामर्थ्याच्या शक्तिशाली टाकसाळीत हे सुवर्ण ओतून सबंध पृथ्वीवरचे ते एक चलनी नाणे बनवाल अशी आम्ही आशा करतो.' [३५]

विवेकानंदांनी याला दिलेले उत्तर चोख होते व त्यात विवेकानंदांची खरी अंतःवृत्ती उफाळून वर आली होती. ते म्हणाले :

'... युरोपियन जडवस्तुवादाने आपल्याला जवळजवळ दडपून टाकले आहे अशी तक्रार आताच केली गेली आहे. यात सर्व दोष युरोपियन लोकांचा नाही,

आपला स्वत:चा त्यात अधिक गुन्हा आहे ..ज्या गोष्टी अर्थहीन आहेत, स्वभावत:च मूर्खपणाच्या आहेत अशा गोष्टींविषयी वितंडवाद घालणे, ह्या सर्व जुन्या चर्चा करत बसणे सोडून द्या. गेल्या सहासात शतकांतल्या आपल्या अधोगतीचा विचार करा; पाण्याचा पेला उजव्या हातात धरून पाणी प्यावे की डाव्या हातात धरून, हात तीन वेळा धुवावा की चार वेळा, पाच वेळा गुळण्या कराव्या की सहा वेळा याच्या चर्चा हजारो चांगली प्रौढ माणसे याच काळात करत होती. इतक्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आणि त्या विषयांवर विद्वत्ताप्रचुर तत्त्वज्ञान लिहिण्यात आयुष्य घालवणाऱ्या माणसांकडून तुम्ही आणखी कसली अपेक्षा करू शकता ? आपला धर्म स्वयंपाकघरात जाऊन बसण्याचा धोका आहे. आपला धर्म स्वयंपाकघरातच बंदिस्त झाला आहे. अन्न शिजवण्याचे पातेले हा आपला ईश्वर आहे आणि 'मला शिवू नकोस, मी शुद्ध आहे' हा आपला धर्म बनला आहे. आणखी शंभर वर्षे हे जर चालू राहिले तर आपल्यापैकी प्रत्येकजण वेडयाच्या इस्पितळात असेल. बुद्धी जेव्हा जीवनातल्या अधिक महत्त्वाच्या प्रश्नांची पकड घेऊ शकत नाही तेव्हा मेंदू कसा लिबलिबीत होतो याचे हे एक खात्रीलायक लक्षण आहे. सर्व स्वतंत्र विचार करण्याची शक्ती नष्ट झाली आहे, मनाचे सर्व सामर्थ्य, क्रियाशीलता, त्याची विचारशक्ती हरवलेली आहे, जी छोटीशी चाकोरी सापडेल तिच्याभोवती फक्त वारंवार प्रदक्षिणा घालण्यात ते मग्न झाले आहे, याचेच हे लक्षण आहे. ही परिस्थिती प्रथम दूर भिरकावली पाहिजे आणि मग आपण ताठ उभे राहिले पाहिजे, सक्रीय व समर्थ व्हायला पाहिज...आपण सर्वजण जर असे शूर झालो आणि धैर्याने, खऱ्याखुऱ्या तळमळीने चक्राला गती देण्यासाठी खांदा भिडवू लागलो तर पंचवीस वर्षांत सर्व प्रश्न सुटेल.'[३६]

अस्पृश्यतेविषयीचे विवेकानंदांचे हे विचार सुप्रसिद्ध आहेत. विवेकानंदांना पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाचे भय वाटत नव्हते हे वरील उताऱ्यावरून स्पष्ट होते. उलट व्यापक अर्थाने त्यांनी त्याचे स्वागतच केले. जातीयतेची समस्या ही राष्ट्रीय समस्येचा एक भाग आहे असे त्यांना वाटत होते. या विशिष्ट समस्येवर उपाय म्हणून लोकांमध्ये आध्यात्मिक तसेच धर्मनिरपेक्ष ज्ञान प्रसृत करावे अशी त्यांची धारणा होती. यामुळे लोकांना जातिव्यवस्थेतील दुष्टता दिसून येईल आणि जातीयतेमुळे येणारी अवहेलना व पिळवणूक यांचा धैर्याने आणि दृढ विश्वासाने ते प्रतिकार करतील असे त्यांचे मत होते.

व्यापक राष्ट्रीय समस्येचा एक भाग म्हणून नंतरच्या काळात गांधीजींनी अस्पृश्यतेचा प्रश्न हाती घेतला याची आपण नोंद घेतली पाहिजे. विवेकानंदांच्या विचारधनाच्या या पैलूचा मी येथे समावेश केला आहे, कारण अधिक व्यापक सामाजिक अन्यायाचा एक भाग म्हणून हा प्रश्न आजही या देशातली एक तीव्र समस्या आहे. आजसुद्धा एखादा दलित मुलगा जिवंत जाळला जातो किंवा एखादी निष्पाप

मुलगी ठार मारली जाते याचे कारण ते हरिजन आहेत, खालच्या जातीचे आहेत, पददलित आहेत, शोषित आहेत; अगदी त्यांच्या निग्रो बांधवांसारखेच. आणि गुन्हेगार नेहमीच उच्च आणि सधन जातींचे असतात व देशातल्या सर्वोच्च राज्यकर्त्या वर्तुळांमध्ये याबद्दल कितीही गप्पा मारल्या गेल्या तरी त्यांना शिक्षा होत नाही.

सधन उच्चवर्गांकडून, सरंजामदारांकडून गरीब जनतेचे जे शोषण होते त्याचा संबंध स्वामीजींनी जातिव्यवस्थेच्या प्रश्नाशी जोडला आणि जमेल तितक्या कडक शब्दात या गोष्टीचा निषेध व्यक्त केला, हे आपण विशेष लक्षात ठेवले तर चांगले होईल. 'वेदांताचे मिशन' या त्यांच्या लेखात त्यांनी लिहिले आहे: 'एखाद्या क्षणभंगुर सामाजिक सुधारणेचा उपदेश करणाऱ्यांपैकी मी नाही. दुष्ट सामाजिक चालींवर उपाय सांगण्याचा माझा प्रयत्न नाही. मी तुम्हाला फक्त 'पुढे व्हा व मानवाच्या प्रगतीची जी योजना आहे ती प्रत्यक्षामध्ये आणा' असे सांगतो. मानवी एकात्मतेविषयी आणि मानवाच्या आंतरिक स्वभावाविषयी वेदांताचा जो आदर्श आहे तो जास्तीत जास्त प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करा असे मी तुम्हाला सांगतो.' [३७]

त्याच लेखात आधी ते म्हणतात :

'आपले उच्चभ्रू पूर्वज आपल्या देशातल्या सामान्य जनतेला ती अगदी असहाय्य होईपर्यंत पायदळी तुडवत राहिले; या यातनांमुळे गरीब लोक आपण माणसे आहोत हे जवळजवळ विसरून जाईपर्यंत तुडवत राहिले. शतकानुशके त्यांना फक्त लाकडे तोडायला आणि पाणी आणायला भाग पाडले गेले. इतके की आपण जन्मतःच गुलाम आहोत, आपण जन्मतःच लाकडे तोडणारे आणि पाणी आणणारे आहोत, यावर विश्वास ठेवणे त्यांना भाग पडले. आधुनिक युगातल्या शिक्षणाबद्दल आपण कितीही बढाया मारल्या तरी भला नेहमी असे आढळते की या लोकांबद्दल जर कोणी दयेचा एखादा शब्द काढला तर या गरीब, पददलित लोकांची उन्नती करण्याच्या कर्तव्यापासून आपले लोक त्वरित माघार घेतात ! एवढेच नव्हे तर मला असेही आढळले आहे की आनुवंशिकतेतून गुण ठरण्याबाबतच्या मूर्ख कल्पनांवर आधारलेल्या अत्यंत राक्षसी आणि निर्घृण प्रकारचे युक्तिवाद आणि तशीच आणखी निरर्थक बडबड पाश्चात्य देशांमधून आयात केली जाते व गरीब लोकांवर जास्त पाशवी अत्याचार आणि जुलूम करण्यासाठी पुढे केली जाते.' [३८]

त्यांच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या कार्यक्रमात शिक्षण कोणती भूमिका घेऊ शकेल, त्याने कोणती भूमिका घ्यायला हवी, या गोष्टीला विवेकानंदांनी खूपच महत्व दिले. त्यांच्या काळी जे धार्मिक आणि धर्मनिरपेक्ष शिक्षण दिले जात होते ते गुलाम तयार करण्यचे एक साधन आहे असे ते मानत व हे अगदी योग्य होते. या क्षेत्रातला त्यांचा कार्यक्रम हा अनेक अंगे असणारा होता. पहिली गोष्ट म्हणजे नव्या पिढीला शिक्षण देण्याचे कार्य परकीय राज्यकर्त्यांच्या आणि सनातनी धर्म-

संस्थांच्या हातून काढून घेऊन समग्र समाजावर ती जबाबदारी टाकली पाहिजे; दुसरी गोष्ट, शिक्षण देशभक्तिपर आणि उपयुक्त असले पाहिजे, जगामधल्या विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे अद्ययावत ज्ञान आपल्या तरुणांनी मिळवले पाहिजे, हे अत्यंत जरूरीचे आहे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते शिक्षणामध्ये शारिरिक आणि नैतिक प्रशिक्षण समाविष्ट करायला हवे. तिसरे म्हणजे व्यवसाय आणि धंदे यांच्या प्रशिक्षणाला त्यांनी अतिशय महत्त्व दिले. भौतिकदृष्टचा आणि आध्यात्मिकदृष्टचा दमदार असे बलवान आधुनिक राष्ट्र निर्माण करण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते; असे राष्ट्रच यथावकाश बौद्धिक आणि तांत्रिक प्रगती करून ब्रिटन-सहित इतर सर्व राष्ट्रांशी स्पर्धा करायला समर्थ होईल असे त्यांचे मत होते.

त्यांच्या वैशिष्टचपूर्ण पद्धतीने जोर देऊन त्यांनी आणखी एका कल्पनेचा प्रसार करायला सुरुवात केली होती : 'जन्म हा नगण्य आहे, भोवतालची परिस्थितीच सर्वकाही असते.' हर्बर्ट स्पेन्सर यांच्याकडून त्यांनी ही उत्क्रांतिवादी कल्पना घेतली आणि सर्व राष्ट्रांची आणि लोकांची समानता या त्यांच्या वेदांतातील विचाराशी तिची सांगड घातली. विशेषाधिकार असलेला कोणताही वर्ग, राष्ट्रे किंवा व्यक्ती असू नयेत अशी शिकवण त्यांनी दिली. उच्च किंवा नीच दर्जा हा माणसाच्या जन्मावरून नव्हे तर त्याची क्षमता आणि तो करत असलेले कार्य यावरून ठरला पाहिजे; आणि म्हणूनच व्यवसाय आणि कामाचा प्रकार निवडण्याचे स्वातंत्र्य सर्वांना असायला हवे, त्याचप्रमाणे भिन्नभिन्न श्रद्धा बाळगण्याचे स्वातंत्र्य असायला हवे, असे ते म्हणतात.

याच भूमिकेतून विवेकानंद स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे बघतात. १८९८ मध्ये एका बंगाली महिलेला उत्तर देताना विवेकानंद विचारतात : 'पण स्वातंत्र्याचा अर्थ काय होतो ? संपत्तीची अफरातफर करण्यात तुमच्या आणि माझ्या मार्गात अडथळे नसणे असा स्वातंत्र्याचा अर्थ नक्कीच नाही ! उलट स्वत:चे शरीर, बुद्धी किंवा संपत्ती यांच्यापासून दुसऱ्याला कसलीही इजा न पोहोचवता त्यांचा आपल्या इच्छेप्रमाणे वापर करता येणे हा आपला नैसर्गिक हक्क आहे. तसेच समाजातल्या सर्वांना संपत्ती, शिक्षण किंवा ज्ञान प्राप्त करण्याची समान संधी मिळाली पाहिजे. दुसरा प्रश्न असा : अज्ञानी आणि गरीब लोकांना जर स्वातंत्र्य दिले, म्हणजेच त्यांचे शरीर, संपत्ती वगैरेचे संपूर्ण हक्क दिले, आणि जर त्यांच्या मुलांना स्वत:ची स्थिती सुधारण्यासाठी आणि ज्ञान मिळवण्यासाठी श्रीमंत आणि उच्चवर्गीयांइतकीच संधी मिळाली तर ते डोईजड बनतील असे काहीजण म्हणतात. समाजाच्या भल्यासाठी ते असे म्हणतात का आप्पलपोटेपणाने आंधळे झाल्यामुळे ते असे म्हणतात ? इंग्लंडमध्येसुद्धा मी ऐकले आहे, 'खालच्या वर्गांना जर शिक्षण मिळाले तर आमची चाकरी कोण करेल ?'

'मूठभर श्रीमंतांच्या चैनीसाठी लाखो स्त्री-पुरुष दारिद्र्याच्या नरकात

आणि अज्ञानाच्या खोल गर्तेत बुडून राहिले तरी चालेल. कारण त्यांना जर संपत्ती आणि शिक्षण मिळाले तर समाजाचे स्वास्थ्य बिघडेल...'[३९]

याबद्दल ते आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने पुढे म्हणतात :

'हे स्वातंत्र्य विकसित होण्याच्या मार्गात जे सामाजिक कायदे आड येतात ते हानिकारक आहेत आणि त्यांचा त्वरित नायनाट करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. ज्या संस्थांमुळे सर्व माणसांना स्वातंत्र्याच्या मार्गावर आगेकूच करता यईल अशा संस्थांना प्रोत्साहन दिले पाहिजे.'[४०]

स्वामी विवेकानंदांची राष्ट्रीय पुनरुत्थानाची शिकवण व त्यांचे समाज-विषयक विचार यांचा गाभा आपल्याला येथे सापडतो. स्वातंत्र्य, मुक्ती, समाजातल्या सर्व माणसांना विकासाची संधी; फक्त निवडक, मूठभर, विशेष स्थानांवरच्यांना नव्हे.

'समाज कोणामुळे बनतो ? तुमच्या व माझ्यासारख्या अल्पसंख्य उच्चवर्गीयांमुळे की लाखो सामान्य लोकांमुळे ?'[४१]

विसाव्या शतकाच्या मध्यावरच्या एखाद्या राजकीय प्रचारकाच्या तोंडचे हे शब्द नाहीत. भगवी वस्त्रे धारण केलेल्या एका संन्याशाने एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काढलेले हे शब्द आहेत. ज्या काळात देशातली सर्वात जहाल राजकीय चळवळ इंग्रजी भाषेत दिली जाणारी शैलीदार भाषणे ऐकण्यासाठी वार्षिक बैठका भरवण्यात आणि ब्रिटिश वसाहतवादी राज्यकर्त्यांकडून सवलती आणि सुधारणा यांचे तुकडे मागणारे ठराव संमत करण्यात गुंतून पडली होती, अशा काळातले हे विचार आहेत.

'भारताच्या पुनरुत्थानासाठी काय करण्याचा तुमचा इरादा आहे ?' असा प्रश्न 'मद्रास टाइम्स'च्या वार्ताहराने १८९७ च्या फेब्रुवारीत विवेकानंदांना विचारला. त्याला त्यांनी उत्तर दिले :

'बहुसंख्य जनतेकडे दुर्लक्ष करणे हे सर्वात मोठे राष्ट्रीय पाप आहे असे मी मानतो आणि आपल्या अधःपाताच्या अनेक कारणांपैकी ते एक कारण आहे. भारतातल्या बहुसंख्य जनतेला जोपर्यंत चांगले शिक्षण, चांगले अन्न मिळत नाही आणि त्यांची चांगल्या प्रकारे काळजी घेतली जात नाही तोपर्यंत कितीही राजकारण केले तरी त्याचा उपयोग होणार नाही. आमच्या शिक्षणासाठी ते झळ सोसतात, आमची देवळे ते बांधून देतात, पण याच्या बदल्यात त्यांना लाथा मिळतात. ते प्रत्यक्षात आपले गुलाम असतात. जर आपल्याला भारताचे पुनरुत्थान घडवून आणायचे असेल तर आपण त्यांच्यासाठी कार्य केले पाहिजे.'[४२]

१८९४ मध्ये शिकागोत असतानाच त्यांनी एका मित्राला लिहिले : 'जोपर्यंत लाखो लोक भुकेले आणि अज्ञानात रहातात तोपर्यंत त्यांच्या जिवावर शिक्षण

घतलेला आणि त्यांच्याकडे यत्किंचितही लक्ष न देणारा प्रत्येक माणूस राष्ट्रद्रोही आहे असे मी समजतो. गरीबांना भरडून काढून पैसा मिळवलेले लोक जेव्हा त्यांच्या भपकेबाज पोशाखात डौलात वावरतात आणि भुकेल्या रानटी माणसांपेक्षा ज्यांची स्थिती आज फारशी वेगळी नाही अशा वीस कोटी लोकांसाठी जोपर्यंत ते काहीही करत नाहीत, तोपर्यंत मी त्या लोकांना अधःपतितच समजतो.'[१२]

श्रीमंत लोक श्रीमंत आहेत कारण ते गरीबांची पिळवणूक करतात; त्यांना तुच्छ लेखले पाहिजे. परंतु गरीबांना शिक्षण घेण्याच्या संधीपासून वंचित केल्यामुळेच ज्यांना शिक्षण घेण्याचा विशेषाधिकार मिळाला आहे अशा सुशिक्षित उच्चवर्गीयांचे काय ? गरीबांसाठी त्यांचे काही कर्तव्य नाही का ? अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांनी वारंवार हाच प्रश्न उपस्थित केला आहे : 'तुम्ही कोणाचे बाजूचे आहात ? पददलित, शोषित, अशिक्षित, धर्मभोळ्या अज्ञानी अशा लाखो लोकांच्या बाजूचे की शोषण करणाऱ्या मूठभर लोकांच्या बाजूचे ?'

विवेकानंदांनी त्यांच्या नेहमीच्या सुस्पष्ट पद्धतीने अगदी निःसंदिग्धपणे लाखो दीनदुबळ्या बहुसंख्य जनतेची बाजू घेतली. त्यांच्या मते ह्याच लोकांनी समाज बनलेला आहे. या जनतेचा पक्ष घेऊन शोषण करणाऱ्या वर्गाकडे बोट रोखून विवेकानंद उपहासाने म्हणतात : "आर्य पूर्वजांचे वंशज म्हणून तुम्ही कितीही मिरवलात आणि प्राचीन भारताच्या उदात्ततेची अहोरात्र गाणी गायलीत, स्वतःच्या उच्च जन्माच्या दिमाखात तुम्ही कितीही ऐटीत चालत असलात, तरी तुम्ही जिवंत आहात असे तुम्हा उच्चवर्गीयांना वाटते का ? तुम्ही दहा हजार वर्षांपूर्वीच्या फक्त 'ममीज' आहात. भारतात अजूनही जो काही जिवंतपणा आढळतो तो 'चालतीबोलती कुजकी प्रते' म्हणून तुमच्या पूर्वजांनी ज्यांना तुच्छ लेखले त्या लोकांमध्येच आढळतो; आणि खरी 'चालती बोलती मढी' तुम्ही आहात. तुमची घरे, तुमचे सामानसुमान वस्तुसंग्रहालयातल्या वस्तूंप्रमाणे दिसते; इतके निर्जीव आणि जुनाट आहे ते सगळे ... भारतातल्या उच्चवर्गीयांनो, या मायारुपी जगात खरे तर तुम्हीच आभासमय आहात, वाळवंटातले मृगजळ आहात. ज्याची सगळी रुपे एकमेकात गुंतली आहेत अशा भूतकाळाचे तुम्ही प्रतिनिधित्व करता आहात...तुम्हीच पोकळी आहात, भविष्यातली पोकळ, क्षुद्र माणसे आहात. स्वप्नांच्या खोट्या जगातल्या रहिवाशांनो, तुम्ही अजून येथे का रेंगाळत आहात ? गतकालीन भारताच्या मृतदेहाचे तुम्ही रक्तमांसहीन सांगाडे आहात – तुम्ही त्वरेने मातीत का मिसळून जात नाहीत, हवेत विरून का जात नाही ?... तुम्ही पोकळीत विरून जा, नाहीसे व्हा, आणि तुमच्या जागी नवा भारत उदयाला येऊ दे.'

सरंजामी व्यवस्थेचा पोकळपणा, कालबाह्यता जोरदारपणे उघड करून विवेकानंद तीच कल्पना आणखी पुढे नेत म्हणतात '... श्रीमंत माणसे ही देशाचे केवळ अलंकार आहेत, देशाची शोभा आहेत. खालच्या वर्गांचे जे लाखो गरीब लोक आहेत ते देशाचे प्राण आहेत.' [४४] 'ही बहुसंख्य जनताच भारताची आशा आहे. शारिरिक आणि नैतिकदृष्टया हे मूठभर उच्चवर्गीय मृत आहेत.' [४५] म्हणून सर्व सोयी गरीबांना द्याव्यात अशा मताचे ते आहेत.

'जर आनुवंशिकतेच्या आधारावर ब्राह्मणांमध्ये शिक्षण घेण्याची क्षमता अस्पृश्यांपेक्षा जास्त आहे, तर ब्राह्मणांना शिक्षण देण्यासाठी आता अधिक पैसा खर्च करायला नको. सर्व पैसा अस्पृश्यांवर खर्च करा. दुर्बलांना द्या, कारण दानाची तिथेच गरज आहे...'

'म्हणूनच आपण खरे कोण आहोत हे भारतातल्या गरीब पददलित जनतेने जाणून घेण्याची, ऐकण्याची आवश्यकता आहे. जाती किंवा जन्मस्थान, दौर्बल्य किंवा सामर्थ्य असा भेदभाव न ठेवता प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मूल यांना ऐकू द्या आणि समजू द्या की बलवान आणि दुर्बळ, उच्च आणि नीच, प्रत्येकामागे तो परम आत्मा असतो, आणि सर्वांना थोर आणि चांगले होता येण्याची अमर्याद शक्यता आणि अमर्याद क्षमता आहे याची तो हमी देतो. प्रत्येक आत्म्याला आपण सांगितले पाहिजे -- 'जोपर्यंत ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत जागृत हो. जागा हो. थांबू नकोस.' जागृत हो! जागा हो! दौर्बल्याच्या या गुंगीतून जागा हो. कुणीच खरा दुर्बळ नाही. आत्मा अमर आहे, सर्वशक्तिमान आहे आणि सर्वज्ञ आहे. उभे रहा. स्वतःला ठामपणे व्यक्त करा. तुमच्या आत जो देव आहे त्याला बोलता करा. त्याला नाकारू नका! प्रचंड आळशीपणा, अत्यंत दुर्बळपणा, बरीचशी गुंगी आजपर्यंत भारतीय जनतेवर आरूढ होती आणि आजही आहे .. सामर्थ्य येईल, गौरव मिळेल, चांगुलपणा येईल, शुद्धता येईल जे जे श्रेष्ठ आहे ते सर्व काही आपल्यात येईल; पण त्यासाठी या निद्रिस्त आत्म्याला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होऊन तो क्रियाशील झाला पाहिजे.' [४६]

गरीब, काबाडकष्ट करणाऱ्या लाखो लोकांवर विवेकानंद त्यांच्या आशा केंद्रित का करतात? राष्ट्राची सर्वाधिक लोकसंख्या अशा लोकांची आहे म्हणून? तेवढेच एक कारण नाही. ते श्रमिक आहेत, समाजाची संपत्ती ते निर्माण करतात. ते स्वतः जे निर्माण करतात त्यापासून शतकानुशतके त्यांना वंचित केले गेले आहे. परंतु हा परात्मभाव जेव्हा शिगेस पोचेल तेव्हा समाजाच्या विकासाच्या नियमानुसार, ज्यांना वंचित केले आहे तेच लोक वंचित करणाऱ्यांना वंचित करतील. हिरावून घेणाऱ्यांकडूनच हिरावून घेतले जाईल. या निष्कर्षाप्रत जाणीवपूर्वक विवेकानंद कितपत आले होते हे आपल्याला ठाऊक नाही. भारतातल्या शोषित जनतेच्या परिस्थितीविषयी प्रत्यक्ष निरीक्षणांतून त्यांनी मिळवलेले ज्ञान, देशातल्या

राजेरजवाडयांची अधोगती, प्रगत पाश्चिमात्य समाज आणि सामाजिक चिंतन यांच्याशी असलेला विवेकानंदांचा संपर्क, यांवरून तर्कशुद्धपणे त्यांना कदाचित ह्या निष्कर्षांपर्यंत आणले असेल. परंतु त्यांचा दृढ विश्वास आणि त्यांचे सहज उद्‌गार एखाद्या प्रेषितासारखे वाटतात.

आपल्या 'विदेश प्रवासाच्या स्मृती' या पुस्तकात सरंजामदारांवर उपहासगर्भ, निर्दय हल्ला चढवताना ते नव्या भारताच्या आगमनाची प्रार्थना करतात नांगर धरणाऱ्या शेतकऱ्यांच्या झोपडीतून, कोळी, चांभार, झाडूवाले यांच्या झोपडयांतून नव्या भारताचा उदय होऊ दे. वाण्याच्या दुकानातून, रस्त्यावरच्या शेंगदाणे विकणाऱ्याच्या भट्टीजवळून तो बहरू दे. कारखाने, दुकाने, बाजार यांमधून नव्या भारताचे उत्थापन होऊ दे. या सामान्य लोकांनी हजारो वर्षे जुलूम सहन केला आहे आणि याचा परिणाम म्हणून त्यांच्यात आश्चर्यकारक अशी सहनशक्ती आली आहे. त्यांनी चिरंतन दुःख भोगले आहे त्यामुळे त्यांच्यात निग्रही जीवनशक्ती आली आहे. मूठभर धान्यावर जगून ते जगाला हादरे देऊ शकतात. त्यांना भाकरीचा फक्त अर्धा तुकडा द्या–आणि मग त्यांची शक्ती सामावून घ्यायला संबंध जगदेखील पुरेसे मोठे वाटणार नाही; रक्तबीजाच्या* कधीही न संपणाऱ्या जीवनशक्तीची त्यांना कायमची देणगी मिळाली आहे. तुम्ही (उच्चवर्गीय) भूतकाळाचे अवशेषरूप सांगाडे आहात. तुमच्यासमोर उभ्या असलेल्या या तुमच्या वारसदारांकडे पहा, भविष्यातला भारत असेल तो हा.'[४७]

वर उद्‌धृत केलेली स्वामी विवेकानंदांची ही अत्यंत अर्थपूर्ण वक्तव्ये सहजपणे किंवा उथळपणे केलेली नसून दीर्घकाळ भारतात आणि परदेशात निरीक्षण व सखोल, चिंतन करून केलेली आहेत हे लक्षात घेण्याजोगे आहे. भारताचा देशभक्त सुपुत्र या नात्याने देशातील पराकोटीचे दारिद्र्य आणि सर्वसामान्य श्रमिक जनतेच्या हालअपेष्टा यामुळे त्यांना तीव्र मानसिक क्लेश होत असत.

या क्लेशातून मुक्ती कशी मिळेल या प्रश्नाचा शोध त्यांना रामकृष्ण आणि धर्म यांच्यापाशी घेऊन आला होता. पण विवेकानंदांच्या बाबतीत धर्म हे काही अखेरचे साध्य नव्हते. ते जेव्हा परदेशात गेले ते केवळ हिंदू धर्माचे धर्मोपदेशक म्हणून नव्हे; भारतीय जनतेच्या सन्मानाने जगण्याच्या हक्काचे समर्थन करणारे ते तिचे अनधिकृत राजदूत होते. त्यांच्या मोहिमेच्या या पैलूने त्यांना पाश्चात्य देशात हालअपेष्टात जगणाऱ्या पददलितांच्या अधिक जवळ आणले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत पाश्चात्य देशातले हे पददलित लोक केवळ चांगली आणि न्यायाची वागणूक मिळण्याचा हक्क मागत नव्हते,तर समाजाचे नेतृत्व मिळण्याच्या त्यांच्या हक्कांविषयी त्यांनी आधीच ठामपणे बोलायला सुरुवात केली होती.

---

* रक्तबीज–दुर्गा सप्तशतीमधला एक असूर. त्याच्या सांडलेल्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून त्याच्यासारखाच एक असूर पुन्हा निर्माण होत असे.

स्वदेशी परतल्यावर, दारिद्र्यात खितपत पडलेल्या आणि झोपडचात रहाणाऱ्या लाखो भारतीयांकडे त्यांनी केवळ मूर्तिमंत यातना म्हणून पाहिले नाही, तर आज निद्रिस्त असलेले समाजाचे भावी नेते म्हणून पाहिले. त्यांनी गोवळकोंडा जहाजाने जेव्हा दुसऱ्यांदा युरोपचा प्रवास केला तेव्हा भारतीय खलाशांचे आयुष्य आणि त्यांचे काम यांचे जवळून निरीक्षण केले. त्यावेळी त्यांनी जे लिहिले त्यातूनच वर दिलेले प्रदीर्घ अवतरण घेतले होते. ते लिहितात : 'या बंगाली खलाशांना, कोळसा टाकणाऱ्यांना, नोकरांना आणि पोऱ्यांना काप करताना पाहून माझ्या देशबांधवांबद्दल माझ्या मनात जी निराशेची भावना होती तो बरीचशी कमी झाली. बलवान शरीराबरोबरच त्यांचा मर्दपणा हळूहळू कसा विकसित होतो ! किती निर्भय अन् तरीही आज्ञाधारक !'[८८]

भारतीय जनसमुदायांशी ते मनाने एकरूप झाले होते. इतके की तेच देशाचे स्वामी आहेत या कल्पनेचा केवळ उद्घोष करून ते थांबले नाहीत तर ते आणखी पुढे गेले. स्वतःच्या शहाणपणाबद्दल आणि विद्वत्तेबद्दल बढाया मारणाऱ्या आणि समाजातले गरीब लोक केवळ अशिक्षित आहेत म्हणून त्यांचा तिरस्कार करणाऱ्या मालमत्तादार वर्गांच्या लोकांशी वाद करताना ते म्हणाले; 'भारतातले शेतकरी, चांभार, झाडूवाले आणि इतर खालचे वर्ग यांच्यात काम करण्याची कुवत आणि स्वावलंबन तुमच्यापेक्षा जास्त आहे. दीर्घकाळ ते मूकपणे श्रम करत आले आहेत; कसलीही तक्रार न करता ते या भूमीवरची सर्व संपत्ती निर्माण करत आले आहेत. लवकरच ते तुमच्या वरचे स्थान पटकावतील. या सहनशील जनसमुदायांवर तुम्ही दीर्घकाळ जुलूम केला आहेत; याचा बदला त्यांनी घेण्याची वेळ आता आली आहे...

'शिष्य : स्वामीजी नवीन विचार उपजण्याची शक्ती इतर देशांपेक्षा आपल्या देशात कमी आहे. तरीही आपल्या देशातल्या खालच्या वर्गांना आपलेच विचारवंत मार्गदर्शन करतात. तेव्हा वरच्या वर्गांवर मात करण्यासाठी सामर्थ्य आणि संस्कृती त्यांना कोठून मिळणार ?

'स्वामीजी : त्यांनी तुमच्यासारखी पुस्तके वाचलेली नसतील. तुमच्यासारखा अगोदरच तयार असलेला सुसंस्कृतपणा त्यांनी आत्मसात केला नसेल. यामुळे काय फरक पडणार आहे ? तरीही जगामधल्या सगळ्या राष्ट्रांचा तेच कणा आहेत. या खालच्या वर्गाच्या लोकांनी जर काम करणे बंद केले तर अन्न आणि वस्त्र तुम्हाला कोठून मिळणार आहे ? कलकत्त्यातल्या झाडूवाल्यांनी एक दिवस काम बंद केले तर धडकी भरते, आणि त्यांनी जर तीन दिवस संप केला तर साथीचे रोग उद्भवल्याने संबंध शहराची लोकसंख्या कमी होते. मजुरांनी जर काम बंद केले तर तुमचा अन्नाचा आणि वस्त्रांचा पुरवठासुद्धा बंद होईल. आणि तुम्ही त्यांना खालच्या वर्गाचे मानता व स्वतःच्या संस्कृतीची शेखी मिरवता ?'

' अस्तित्व टिकवण्याच्या संघर्षात व्यग्र झाल्यामुळे ज्ञानाचा उदय होण्याची संधी त्यांना मिळालेली नाही. मानवी बुद्धीने मार्गदर्शन केलेल्या यंत्रांप्रमाणे अनेक वर्षे त्यांनी सतत काम केले आहे, आणि त्यांच्या श्रमाच्या फळातला मुख्य वाटा चतुर सुशिक्षित लोकांनी लुबाडला आहे. प्रत्येक देशात असेच घडले आहे. पण आता काळ बदलला आहे. खालच्या वर्गांना या सत्याची हळूहळू जाणीव झाली आहे आणि त्यांचा न्याय्य वाटा मिळवण्याच्या निश्चयाने ते याविरुद्ध ऐक्याची आघाडी उभारत आहेत. सर्वांत आधी युरोप आणि अमेरिकेतील जनता जागृत झाली आहे आणि त्यांनी लढ्याला सुरुवात केली आहे. ही जागृती झाल्याच्या खुणा भारतातसुद्धा दिसू लागल्या आहेत. खालच्या वर्गांकडून अलीकडे होणारे अनेक संप हे याचेच लक्षण आहे. कितीही प्रयत्न केला तरी यापुढे खालच्या वर्गांना दडपून टाकणे वरिष्ठ वर्गांना शक्य होणार नाही.' [४९]

गेले शतक उलटण्याच्या काळात विवेकानंदांचा सामाजिक दृष्टिकोन एक विशिष्ट आकार घेत होता. तो काय होता याबद्दल शंका घेण्यास वरील प्रदीर्घ उताऱ्यामुळे जागा उरत नाही. विवेकानंदाच्या काळात जे प्रगत आर्थिक आणि राजकीय सिद्धांत होते त्यांच्याशी ओळख होण्याची संधी त्यांना मिळाली होती किंवा नाही याबद्दल खात्री नाही; परंतु समस्येच्या गाभ्याचे त्यांना नेमके आकलन झाले होते. समाजातील सर्व संपत्ती आणि संस्कृतीची संबंध इमारत श्रमिक वर्ग निर्माण करतात, परंतु त्यांच्या श्रमाच्या फळापासून त्यांनाच वंचित केले जाते हाच त्या समस्येचा गाभा आहे. भारतातल्या मजूरवर्गासमोर बोलताना विवेकानंदांनी उद्‌गार काढले :

' भारतातल्या कष्टकरी लोकांनो, तुम्ही मूकपणे अन अविश्रांत कष्ट करता त्याचे फळ म्हणून बॅबिलॉन, पर्शिया, अलेक्झाड्रिया, ग्रीस, रोम, व्हेनिस, जिनोआ, बगदाद, समरकंद, स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, डेन्मार्क, हॉलंड आणि इंग्लंड यांनी यशस्वीरित्या श्रेष्ठत्व आणि प्रतिष्ठा मिळवली. आणि तुम्ही ? तुमचा विचार करण्याची कुणाला गरज आहे ? प्रिय स्वामीजी, तुमच्या पूर्वजांनी तत्वज्ञानवर काही लिखाण केले, डझनभर महाकाव्ये लिहिली, बरीच देवळे बाधली – बस्स! आणि तुम्ही विजयोन्मादाने आकाश फाटेपर्यंत आरोळ्या ठोकता. परंतु जगाच्या प्रगतीला ज्यांनी आपल्या रक्ताचे खतपाणी घातले त्यांची प्रशंसा करण्याची गरज कुणाला आहे ? ' [५०]

या संदर्भात विवेकानंदांच्या दृष्टीने श्रमाला एक नवीनच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या काळात श्रमाचे सामाजिक महत्त्व ज्या फारच थोड्या भारतीयांनी जाणले होते, त्यांच्यापैकी विवेकानंद एक होते असे आपण निश्चितपणे म्हणू शकतो. वरील प्रवचनात विवेकानंदांनी पुढे लिहिले आहे :

'आपली श्रमजीवी जनता तिचे कर्तव्य पार पाडत आहे...त्यात काहीच पराक्रम नाही ? जेव्हा एखादी महान कामगिरी बजावायची असते तेव्हा बरेचजण नायक बनतात, एखादा भ्याड माणूसदेखील सहजपणे स्वतःचे बलिदान करतो. जेव्हा बहुसंख्य लोक वाहवा करायला असतात तेव्हा एखादा स्वार्थी मनुष्यदेखील निःस्वार्थीपणे वागतो. परंतु कुणीही दखलही घेत नसताना, अगदी छोटचाशा कामातदेखील जो त्याच निस्वार्थीपणे कर्तव्याला वाहून घेतो तो धन्य होय. सदैव तुडवल्या गेलेल्या भारतातल्या श्रमजीवी लोकांनो, प्रत्यक्षात हेच तुम्ही करत असता. मी तुम्हाला वंदन करतो.'[५१]

विवेकानंद राजकारणी नव्हते. त्यामुळे साहजिकच त्यांची निरीक्षणे आणि निष्कर्ष हे एखाद्या राजकीय विचारप्रणालीत व्यवस्थितपणे ग्रथित झाले नाहीत. परंतु त्यांच्यातल्या बद्धिवंताने मानवी संस्कृतीच्या उत्कर्षातील श्रमाच्या भमिकेचे मर्म जाणले आणि त्याचे सार अत्यंत स्वच्छ व झळाळत्या शब्दांत मांडले. त्यांच्या काळातल्या फारच थोडचा लोकांनी हे केले आहे. रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की याने भटक्या उडाणटप्पूंविषयी आणि समाजातील अगदी खालच्या थरांतील कष्टकऱ्यांविषयी कथा लिहून सबंध विचारवंत वर्गाला चकित केले तो हाच काळ होता. अगदी तळागाळाचा खालचा माणूस जागतिक साहित्यामध्ये प्रथमच वाङ्मयाचा नायक बनला. त्याचे दुःख, त्याची स्वप्ने, त्याच्या आत्म्याची महानता आणि विशालता, त्याचे स्वातंत्र्यप्रेम, आणि या सर्वापेक्षाही त्याच्या श्रमातील सौंदर्य आणि पराक्रम या सर्वांचे वर्णन करायला गॉर्कीसारखा प्रतिभावान लेखक मिळाला. मानवी श्रमाची महानता आणि सौंदर्य यांचे स्तुतिस्तोत्र विवेकानंदांनीसुद्धा गायलेले नाही का ? स्वतःच्या देशातल्या गरीबातल्या गरीब माणसाशी जसा गॉर्कीचा वैयक्तिक घनिष्ठ संबंध होता तसाच विवेकानंदांचादेखील नव्हता काय ?

परंतु रशियातील परिस्थिती वेगळी होती. क्रांतीच्या वावटळीला तिथे गती येत होती आणि गॉर्की हा त्या 'तुफानातला एक समुद्रपक्षी,' क्रांतीचा संदेशवाहक कवी बनला. परकीय सत्ताधाऱ्यांपासून मुक्ती मिळवणे आणि न्यायाधिष्ठित समाजाच्या विकासाला रोखण्यामध्ये जे सरंजामशाहीचे अवशेष कारणीभूत होते ते नष्ट करणे, हे त्यावेळी आपले तातडीचे कार्य होते. बहुसंख्य जनतेमध्ये अजून जागृती निर्माण करायची होती, इतिहासातील तिच्या भूमिकेविषयी तिला जाणीव करून द्यायची होती. ही जबाबदारीची कामगिरी स्वतःच्या पद्धतीने बजावण्याचे कार्य या देशभक्त संताने केले.

श्रमाचे सामाजिक महत्त्व ही संकल्पना विवेकानंदांनी आधारभूत मानून ठामपणे म्हटले की संस्कृती, विज्ञान, कला आणि ज्ञानाच्या इतर सर्व शाखा हा संपूर्ण संस्कृतीचा वरचा इमला कष्टकरी वर्गाच्या श्रमावर उभारला गेला आहे.

आणि या कष्टकरी वर्गांचे मात्र शोषण केले जात आहे. संस्कृती व ज्ञान यांच्या क्षेत्रातून त्याला हद्दपार केले आहे. ही नीती राबवल्यामुळे संस्कृती, सभ्यता व ज्ञान यांचे वाहक गणले गेलेले शोषक वर्ग स्वतः बांडगूळ बनले आहेत आणि सभ्यता, संस्कृती व ज्ञान यांच्या मूलभूत स्रोतांपासून अलग पडले आहेत. त्यांचा अधःपात अपरिहार्य आहे. यावरून विवेकानंद दोन निष्कर्ष काढतात. एकीकडे ते असा विचार करतात : 'बहुसंख्य जनता हीच भारताची एकमेव आशा आहे. उच्चवर्ग हे शारिरिकदृष्टचा आणि नैतिकदृष्टचा मृत बनले आहेत.'[५२] दुसरीकडे त्यांची अशी खात्री झाली आहे की श्रमिकांना जर योग्य वातावरण आणि संधी दिली तर उच्चतर बौद्धिक कार्य करण्याची त्यांच्यात क्षमता आहे : 'खात्रीने त्यांच्यातून अनेक प्रतिभावंत निपजतील.'[५३]

सुशिक्षित तरुणांना उद्देशून बोलताना विवेकानंद म्हणतात :

'म्हणून मी म्हणतो, सर्वसामान्य जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कार्यासाठी तुम्ही पुढे व्हा. 'तुम्ही आमचे बांधव आहात, आमच्या शरीराचा अविभाज्य भाग आहात, आम्ही तुमच्यावर प्रेम करतो, तुमचा द्वेष आम्ही कधीच करत नाही,' हे त्यांना समजू द्या, त्यांना सांगा. तुमच्याकडून अशी सहानुभूती त्यांना मिळाली की काम करण्याचा त्यांचा उत्साह शतपटीने वाढेल. आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने त्यांचे ज्ञान चेतवा. त्यांना इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य, शिकवा, आणि धर्मातील सखोल सत्येही शिकवा. त्या शिकवणीच्या बदल्यात, शिकवणाऱ्यांचे दारिद्रचही नष्ट होईल. एकमेकांना देवाणघेवाण केल्यामुळे दोन्ही पक्षांचे एकमेकांशी सख्य होईल...

'शिष्य : स्वामीजी, तुम्ही म्हणता ते खरे आहे, परंतु वरचे वर्ग आणि खालचे वर्ग यांच्यात अजूनही फार मोठी दरी आहे. वरच्या वर्गांना खालच्या वर्गांबद्दल सहानुभूती बाळगण्यास प्रवृत्त करणे हे भारतात तरी महाकठीण काम आहे.

'स्वामीजी : पण ते न झाल्यास वरच्या वर्गांचेही कल्याण होणार नाही. परस्परविघातक अशा भांडणात आणि झगडचात तुमचा नाश होईल—यापूर्वी अनेक वर्षे तुम्ही तेच करत आला आहात. बहुसंख्य जनता जेव्हा जागृत होईल आणि तुम्ही त्यांच्यावर जो जुलुम करत आहात तो जेव्हा त्यांना कळेल तेव्हा त्याच्या नुसत्या फुंकरीने तुम्ही संपूर्णपणे उखडले जाल ! त्यांनीच तुमची संस्कृतीशी ओळख करून दिली आहे, आणि तेच तिला खाली खेचतील. रानटी गॉल टोळचांच्या हल्ल्यांमुळे सामर्थ्यवान प्राचीन रोमन संस्कृती कशी धूळीला मिळाली त्याचा विचार करा. म्हणून मी म्हणतो की या खालच्या वर्गांना शिक्षण आणि संस्कृती देऊन त्यांच्या गाढ निद्रेतून त्यांना जागृत करा. जेव्हा ते जागृत होतील – एक दिवस त्यांना जागृत व्हावेच लागेल – तेव्हा ते तुम्ही केलेली त्यांची ही सेवा कधीच विसरणार नाहीत. ते तुमच्याशी कृतज्ञ राहातील.'[५४]

आतापर्यंत विवेकानंदांनी सुचवलेला कार्यक्रम अगदी साधा आहे. सुशिक्षित लोकांनी बहुजन समाजामध्ये जायचे, त्यांना शिक्षण द्यायचे, त्यांच्या सामर्थ्याची त्यांना जाणीव करून द्यायची, आणि त्यांचे इतिहासदत्त महत्त्वाचे कार्य जाणीवपूर्वक त्यांनी समजून घ्यावे म्हणून त्यांना मदत करायची. त्यानंतर जागृत आणि सुशिक्षित बहुजनसमाज पुढे सरसावेल आणि समाजाचे सुकाणू आपल्या बलदंड हाती घेईल. कालचे मालक एकतर नष्ट तरी होतील किंवा नव्या समाजात विलीन होतील. विवेकानंद असेही यात सुचवतात की सर्व संपत्ती आणि संस्कृतीची समृद्धता निर्माण करणाऱ्या श्रमिक लोकांना त्यांच्या श्रमाच्या फळापासून वंचित केले आहे त्यामुळे हे सत्य त्यांच्या नजरेस आणणे एवढे पुरेसे आहे, त्यानंतरचे सर्व आपोआप घडेल. विवेकानंदांच्या मते हेच सुशिक्षित युवकांसमोरचे कार्य आहे. जागृत झालेला बहुजनसमाज या युवकांनी केलेली सेवा विसरणार नाही आणि स्वतः आगेकूच करत असताना त्यांना आपल्याबरोबर घेईल असे आश्वासनही विवेकानंद त्या युवकांना देतात.

याच संदर्भात, डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताबाबत विवेकानंद जी भूमिका घेतात ती लक्षात घेणे मनोरंजक ठरेल. रामब्रह्म बाबू नावाच्या एका माणसाने स्वामीजींना प्रश्न विचारला – डार्विनने उत्क्रांतीचा जो सिद्धांत मांडला आहे आणि त्यासाठी जी कारणे दाखवली आहेत त्याबद्दल तुमचे मत काय आहे ? स्वामींनी उत्तर दिले :

'डार्विनचे बरोबर आहे असे गृहित धरले तरी उत्क्रांतीच्या कारणांबद्दल हाच अखेरचा शब्द आहे असे मी अजून कबूल करू शकत नाही... खालच्या प्राणी-जातींतून वरच्या जातींची उत्क्रांती होण्याची पाश्चिमात्य विद्वानांनी काही कारणे सांगितली आहेत. जीवनकलह, सगळ्यात लायक जातींचा टिकाव, नैसर्गिक निवड, वगैरे वगैरे नियम तुम्हाला खचितच माहीत असतील... पण सतत अडथळ्यांविरुद्ध संघर्ष करून हे होते असे नाही. माझ्या मते संघर्ष आणि स्पर्धा ही कधीकधी प्राणिमात्राने परिपूर्ण अवस्था प्राप्त करून घेण्याच्या मार्गात आडसुद्धा येते... निसर्गात उत्क्रांतीच्या खालच्या पायऱ्यांवर काहीही होत असो, परंतु अडथळ्यांविरुद्ध सतत झगडत राहूनच केवळ एखाद्याला स्वतःचा विकास करून घेता येतो हे उत्क्रांतीच्या वरच्या स्तरांच्या बाबतीत तरी खरे नाही. उलट असे दिसून येते की अशा वेळी अडथळे नाहीसे होतात आणि शिक्षण, संस्कार, एकाग्र वृत्ती व ध्यानधारणा, आणि याहून अधिक म्हणजे त्याग यांच्यामार्फत आत्म्याची अधिकाधिक उच्चतर अभिव्यक्ती होत रहाते... प्राणीजगतात जीव जगवण्यासाठी कलह, सर्वात लायक असणाऱ्याचाच टिकाव लागणे वगैरे नियम लागू पडतात हे आपण प्रत्यक्षपणे पहातो; परंतु मानवी जगतात, जेथे विवेकबुद्धी अस्तित्वात असते तेथे, या नियमांच्या अगदी विरुद्ध नियम आपल्याला आढळतात... माणसाचा संघर्ष मनोविश्वात

घडत असतो ... प्राणिजगतात आपापली स्थूल शरीरे टिकवण्यासाठी केला जाणारा जो संघर्ष आढळतो, तशा प्रकारचा संघर्ष मानवी अस्तित्वाच्या पातळीवर आढळतो तो मनावर विजय मिळवण्यासाठी किंवा चित्ताची समतोल स्थिती प्राप्त करण्यासाठी असतो. एखादे खरेखुरे झाड आणि तळ्याच्या पाण्यातील त्याचे प्रतिबिंब यांच्याप्रमाणे प्राणिजगत आणि मानवी जगत यात दोन विरुद्ध प्रकारचे संघर्ष आपल्याला आढळतात.[५५]

प्राणिजगत आणि मानवी जगत यांच्यात फरक करताना विवेकानंद दोहोंतल्या मूलभूत फरकाची अचूक जाण दाखवतात. उदाहरणार्थ, विचार करण्याची, सामान्यीकरण करण्याची आणि विवेकनिष्ठ निष्कर्ष काढण्याची मानसिक क्षमता माणसांमध्ये आहे परंतु जनावरांमध्ये नाही. येथे त्या दोघांमध्ये गुणात्मक फरक आहे याबद्दल शंकाच नाही. यावरून विवेकानंद असा निष्कर्ष काढतात की प्राण्यांमधील–खालच्या अवस्थेमधील–अस्तित्वासाठी चालणारा संघर्ष हा मानवी समाजात अगदी उलटे रुप घेतो; आत्म्याच्या सतत शुद्धीकरणातून मनाचा समतोल प्राप्त करून घेण्यासाठी संघर्ष चालतो, तो मनोविश्वात चालतो. सामाजिक प्रगतीविषयी विवेकानंदांचा जो दृष्टिकोन आहे त्यातील अंतर्विरोध आपल्यासमोर यथे स्पष्टपणे होतो. एकीकडे देशाभिमानी भारतीय म्हणून सामाजिक अन्याय त्यांना तीव्रतेने जाणवतो. भारतातल्या दडपलेल्या, शोषित लोकांचे शोषण करणाऱ्या स्वकीय आणि परकीय शक्तीविरुद्ध ते शोषितांची बाजू घेतात. शोषक वर्गाचे शासन आणि श्रेष्ठत्व अपरिहार्यपणे नाश पावेल आणि शोषित बहुजनसमाज त्याची जागा घेईल असे ते सांगतात. पण त्याचवेळी ही सर्व प्रक्रिया त्यांच्या मते फक्त मनोविश्व आणि विवेकबुद्धीचे जग यांच्यामध्ये घडत असते. प्रत्यक्ष समाजशरीराच्या पातळीवरही ती घडते असे ते मानत नाहीत.

हा विरोधाभास किंवा दुहेरीपणा विवेकानंदांच्या दृष्टिकोनाची जी तात्त्विक बैठक आहे तिच्यातच अंतर्भूत आहे. त्याच्या तत्त्वज्ञानानुसार शरीर हे जड अस्तित्व आहे आणि निसर्गाच्या नियमांनी नियत आहे. परंतु आत्मा मात्र या जडविश्वाच्या नियमांपलिकडे आहे. स्वातंत्र्य आणि पूर्णत्व यांची आत्म्याला ओढ असते. मेंदू हा मानवी शरीराचा सर्वात अधिक विकसित भाग आहे. आणि मन, विचार, मानवप्राण्यांची मूलभूत विवेकशीलता हे सर्व त्या मेंदूचे कार्य म्हणून जन्माला आले असे मानले तरच या दुहेरीपणावर मात करता येते. दुसरे म्हणजे माणसे ही काही केवळ एकएकटी व्यक्ती म्हणून जगत नसतात. शरीराने आणि मनाने एकत्र जगणाऱ्या समाजाचा प्रत्येक माणूस हा फक्त घटक असतो व त्याचे विचार आणि आचार हे सामाजिक परिस्थितीवरून ठरतात. पण ही सामाजिक विकासाची जडवादी संकल्पना आहे. विवेकानंद जडवादी नव्हते.

वर उल्लेखिलेला अंतर्विरोध आणि दुहेरीपणा असला तरीही विवेकानंदांची

भारतातल्या सामाजिक परिस्थितीविषयीची सखोल अंतर्भेदी दृष्टी, त्यांचे परकीय सत्तेच्या भारतावर होणाऱ्या परिणामांचे मापन यांना इतिहासात फारच महत्त्व आहे. मिस मेरी हेल यांना ३० ऑक्टोबर १८९९ रोजी विवेकानंदांनी जे पत्र लिहिले त्यात ते लिहितात :

'आधुनिक भारतावर ब्रिटिश सत्तेचा अनवधानाने का होईना फक्त एक उपकारक पैलू आहे; त्या सत्तेमुळे भारत पुन्हा एकदा जगाच्या रंगभूमीवर आणला गेला आहे; बाहेरच्या जगाशी त्याचा संपर्क आला आहे. हे जर येथल्या लोकांचे कल्याण दृष्टीसमोर ठेवून केले गेले असते तर ज्याप्रमाणे परिस्थिती जपानला अनुकूल झाली त्याप्रमाणे भारतासाठीही अधिक चांगली फलश्रुती झाली असती. रक्त शोषणे हीच जेव्हा मुख्य कल्पना असते तेव्हा कल्याण होणे शक्य नाही.... आधुनिक बनलेले, अर्धवट शिक्षण घेतलेले आणि राष्ट्रीयत्व गमावलेले मूठभर लोक एवढेच फक्त ब्रिटिश भारताचे आजचे दृश्य आहे, दुसरे काही नाही...

'ब्रिटिशांना विजय संपादन करण्यासाठी संघर्ष करावा लागला त्या काळी अनेक शतके भारतात अराजकाचे साम्राज्य होते. १८५७ व १८५८ मध्ये इंग्रजांनी भयंकर कत्तली केल्या आणि त्याहून भयानक असे दुष्काळ ही ब्रिटिश कारकिर्दीची अपरिहार्य निष्पत्ती होती. (एतद्देशीय राज्यांमधे कधीही दुष्काळ नव्हते.) या सर्वांमुळे लाखो माणसे मरण पावली. तरीही लोकसंख्येत चांगली वाढ झाली होती; पण देश जेव्हा संपूर्णपणे स्वतंत्र होता त्यावेळी जितकी होती तितकी ती लोकसंख्यावाढ नव्हती. भारतातील श्रम आणि उत्पादन, सध्या भारतात जेवढी लोकसंख्या आहे त्याच्या पाचपट लोकांना चांगल्या प्रकारे सहज पोसू शकेल–अर्थात येथील सर्व उत्पादन त्यांच्यापासून हिरावून घेतले नाही तरच.

'परिस्थिती ही अशी आहे. शिक्षणाचासुद्धा यापुढे अधिक प्रसार होऊ दिला जाणार नाही; वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य आधीच नष्ट केले गेले आहे, (अर्थात आमचे निःशस्त्रीकरण तर बऱ्याच पूर्वी झाले आहे). काही वर्षांसाठी थोडेफार स्वयंशासन करू दिले गेले होते ते अधिकारसुद्धा तत्परतेने काढून घेतले जात आहेत. आता पुढे काय येत आहे याची आम्ही वाट पहात आहोत ! अगदी थोडीशीच साधी टीका केली तरीही माणसांना त्वरेने कायमचे हद्दपार केले जाते, सुनावणी न होताच त्यांना तुरुंगात डांबले जाते, आणि आपले डोके केव्हा उडवले जाईल हे कुणालाच सांगता येत नाही.

'गेली काही वर्षे भारतात दहशतीची राजवट होती. इंग्रज शिपाई आमच्या पुरुषांना ठार मारत आहेत व आमच्या स्त्रियांवर अत्याचार करत आहेत, आमच्याच जिवावर निवृत्तिवेतन आणि प्रवासखर्च यांच्यासह मायदेशी पाठवले जात आहेत. आम्ही एका भयानक दुर्दशेत आहोत. समजा फक्त हे पत्र तुम्ही प्रकाशित

केलेत तर भारतात नुकत्याच मंजूर झालेल्या कायद्यानुसार, मला येथून भारतात खेचून नेऊन सुनावणीशिवाय ठार करण्याची परवानगी भारतातील इंग्रज शासनाला आहे. आणि मला ठाऊक आहे की तुमच्या सगळ्या खिश्चन सरकारांना याचा आनंदच होईल. कारण आम्ही पाखंडी आहोत. तुमचे धर्मोपदेशक देवाचा संदेश द्यायला भारतात जातात, पण इंग्रजांच्या भीतीमुळे सत्याचा एक शब्दही बोलायला धजावत नाहीत; कारण दुसऱ्याच दिवशी इंग्रज त्यांना देशाबाहेर हाकलतील.

'मेरी, सर्वांचा पिता असणारा, दुर्बलांचे संरक्षण करण्यासाठी सबलांना न भिणारा, संपत्तीची लाच न घेणारा असा खराखुरा देव अस्तित्वात नसेल तर आमची स्थिती निराशाजनक आहे. असा देव आहे का ? काळच याचे उत्तर देईल.'[५६]

हे पत्र मी जवळजवळ संपूर्ण उद्धृत केले आहे कारण भारतातील ब्रिटिश वसाहतवादी सत्तेच्या लोकसंख्यावाढीबाबत व आर्थिक, राजकीय, शैक्षणिक वगैरे क्षेत्रांतील परिणामांबद्दल विवेकानंदांचा दृष्टिकोन काय होता हे आपल्याला त्या पत्रात दिसते. पाश्चिमात्य साम्राज्यसत्ता, भारतातील परकीय धर्मोपदेकांची भूमिका याबद्दलचा त्यांचा दृष्टिकोनही हे पत्र स्पष्टपणे सांगते. कदाचित स्वत: देवसुद्धा सबलांना भीत असेल आणि साम्राज्यवाद्यांनी गैरमार्गाने मिळवलेल्या संपत्तीची लाच घेत असेल, अशा उपरोधिक सुरात हे पत्र संपते. ब्रिटिश वसाहतवादी सत्तेच्या भारतावर होणाऱ्या परिणामांबद्दल ही अतिशय चांगली टीका आहे. भारतातल्या ब्रिटिश वसाहतवादी सत्तेच्या समस्येचा किती खोलवर विचार विवेकानंदांनी केला होता हे त्यांनी पत्रात परामर्श घेतलेल्या काही मुद्यांवरून कळते.

त्यांच्या मते देशातील संपत्तीची लूट एवढाच ब्रिटिश वसाहतवादी सत्तेचा अर्थ नव्हता, तर त्या सत्तेमुळे संबंध देशाच्या उत्पादनक्षमतेवरच परिणाम झाला. याचा परिणाम असा झाला की जो देश गतकाळात त्याच्या साधनसामग्रीविषयी, संपत्तीविषयी आणि मुबलक अन्नधान्याविषयी जगभर प्रसिद्ध होता त्याचे आता एका गरीब देशात रूपांतर झाले आहे, तीव्र दुष्काळांमुळे तो देश नियमितपणे गांजला जात आहे. वसाहतवादी सत्तेच्या बेडयांमधून हा देश जर मुक्त झाला असता, उत्पादनशक्ती मुक्त असत्या आणि परिणामकारकरित्या आपली भूमिका बजावू शकल्या असत्या, तर आतापेक्षा कितीतरी अधिक लोकांना भारत पोसू शकला असता, लोकसंख्या जलद गतीने वाढली असती तरीही हे शक्य झाले असते.

अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर व वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावर दडपण येणे ही तर वसाहतवादी सत्ताधाऱ्यांची स्वाभाविक देणगीच आहे. त्यांनी वासाहतिक देशांकडून भरमसाट नफा जमवून त्यांच्या राज्यांना साम्राज्यांचे रूप दिले. वसाहतवादी सत्तांचे साम्राज्यवादी सत्तांमधे रूपांतर घडण्याची ही प्रक्रिया याच काळात, म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, संबंध जगभर घडत होती. आणि

भारतातील ब्रिटिश सत्ताधारी लुटारूंच्या या नव्या टोळीच्या आघाडीला होते. साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांनी केलेल्या पराकोटीच्या पिळवणुकीमुळे काबाडकष्ट करणाऱ्या जनतेतच खोलवर असमाधान निर्माण झाले असे नाही, तर बोलका असा जो बुद्धिजीवींचा वर्ग त्याच्यातही तीव्र असमाधान निर्माण झाले. त्यामुळे जास्तच जुलूम, दहशत, मोठ्या प्रमाणात कत्तली होऊ लागल्या. कायद्याच्या राज्याचा भ्रामक झिरझिरीत पडदा टाकून दिला गेला; वसाहतवादी शासनकर्त्यांनी पूर्वी मान्य केलेल्या स्थानिक स्वराज्यसंस्था चालवण्याच्या सवलती काढून घेतल्या गेल्या आणि उघडीनागडी, निर्लज्ज दहशत सुरू झाली.

वसाहतवादी सत्तेच्या परिणामांच्या या सर्व पैलूंचे वर्णन करताना विवेकानंद कोणत्याही राष्ट्रातील ज्वलंत राष्ट्रभक्तांच्या, क्रांतिकारक राष्ट्रभक्तांच्याही तुलनेत कमी ठरत नाहीत. जागतिक पातळीवरच्या या प्रक्रियेचे आकलन करण्याइतकी त्यांची दृष्टी पुरेशी विशाल होती. आणि त्यांच्या असंख्य व्याख्यानांतून, चर्चांमधून व लेखनातून त्यांनी तिचा स्पष्ट शब्दांत धिक्कार केला. त्यांच्या समकालीन साम्राज्यवाद्यांना 'वैश्य' किंवा 'व्यापारी' संबोधून एक सत्य त्यांनी प्रस्थापित केले, ते म्हणजे हे व्यापारी पृथ्वीवर जेथे कोठे, ज्या कोणत्या कोपऱ्यात गेले तेथे त्यांनी स्थानिक लोकांना जिंकण्याचा प्रयत्न केला; त्यांना पद्धतशीरपणे लुबाडून, त्यांची संपत्ती लुटून त्यांना कंगाल कष्टकरी बनवले. अशा प्रकारे एके काळी भरभराटीत असणाऱ्या राष्ट्रांना त्यांनी 'शूद्र' बनवले.

भारतातल्या ब्रिटिश वसाहतवादी सत्तेच्या परिणामांबद्दल विवेकानंद लिहितात :

'ही सत्ता इतकी नवी आहे, तिचे स्वरूप आणि कार्यपद्धती भारतीय मनाला इतकी परकी आहे, त्या सत्तेचा उदय इतका अकल्पित आहे, त्या सत्तेची प्राणशक्ती इतकी जोमदार आहे की जरी आत्तापर्यंत अनेक वर्षे ही सत्ता आपल्यावर चालवली गेली तरी फक्त मूठभर भारतीयांनाच तिचे नीट आकलन झाले आहे.

'इंग्लंडने भारतावर ताबा मिळवला आहे त्याबद्दल आपण बोलत आहोत.

'अगदी प्राचीन काळापासून, भारतातल्या अमाप संपत्तीच्या आणि समृद्ध धान्यकोठारांच्या कीर्तीने अनेक बलाढ्य परकीय राष्ट्रांना भारत जिंकण्याची इच्छा झाली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की परकीय राष्ट्रांकडून भारत वारंवार जिंकला गेला आहे. असे असताना इंग्लंडचा भारतातील राजवट हे भारतीय मनाला काहीतरी नवीन आणि परके आहे असे आपण का म्हणायचे ?

'..... कारण जवळ अपार संपत्ती असूनही पूर्वी मूठभर वैश्य (व्यापारी) त्यांचा राजा किंवा राजघराण्यातील एखादी व्यक्तीदेखील समोर आली की साष्टांग नमस्कार करत होते. ते आता एकत्र जमले, व्यापार करण्याच्या

हेतूने त्यांनी सागर पार केले. आपल्या बुद्धीने आणि संपत्तीने त्यांनी भारतात दीर्घकाळ प्रस्थापित झालेल्या हिंदू आणि मुसलमान राजघराण्यांना हळूहळू कळसूत्री बाहुल्या बनवले. इतकेच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या देशातील शासनकर्त्यांच्या सर्व प्रकारच्या सेवा खरेदी केल्या, स्वतःकडे येणाऱ्या संपत्तीचा ओघ वाढवण्यासाठी त्यांच्या शौर्याचा आणि ज्ञानाचा एक प्रभावी साधन म्हणून त्यांनी वापर केला. हे दृश्य भारतीयांना अगदी अद्‌भुत वाटेल असे होते. प्रतिष्ठित व सामर्थ्यशाली अमीरउमरावांच्या वारसदारांना... ईस्ट इंडिया कंपनी नावाच्या एका व्यापाऱ्यांच्या कंपूचे नम्र सेवक म्हणून भारतात पाठवले जाणे हा मानवी महत्त्वाकांक्षेच्या कळस वाटावा हे दृश्य म्हणजे भारताने यापूर्वी कधीही न पाहिलेला चमत्कारच होता!' ५७

'प्राचीन काळात ट्रॉय आणि कार्थेज, आणि तुलनेने आधुनिक काळात व्हेनिस आणि तशीच इतर छोटी व्यापारी राज्ये अतिशय समर्थ बनली. तरीही खऱ्या अर्थाने वैश्य शक्तीचा उदय तेथे झाला नव्हता.' ५८

'कशी आहे ही सामर्थ्यशाली नवोदित वैश्य सत्ता? या सत्तेच्या आदेशावरून वीज एका खांबावरून दुसऱ्या खांबावर तत्पर संदेश घेऊन जाते आणि पर्वतप्राय लाटा उसळणारा अथांग महासागर हा हमरस्ता बनतो. त्या सत्तेच्या आज्ञेवरून विकाऊ वस्तू पृथ्वीच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्याकडे अतिशय सुलभतेने नेल्या जातात. आणि या सत्तेच्या हुकुमांनी मोठमोठ्या राजांचाही थरकाप होतो. या सत्तेच्या रौद्र लाटेच्या शुभ्र फेसाच्छादित शिखरावर, त्या दिग्विजयी वैश्य सामर्थ्यावर, इंग्लंडचे सिंहासन त्याच्या सर्व भव्यतेसहित स्थापन झालेले आहे.

'म्हणूनच इंग्लंडकडून भारत जिंकला गेला तो आम्हाला नेहमी ज्यावर विश्वास ठेवणे भाग पाडले जाते त्याप्रमाणे येशूने किंवा बायबलने भारतावर मिळवलेला विजय नाही. मोगल आणि पठाण लोकांनी भारतावर जसा विजय मिळवला त्यातलाही तो विजय नव्हे. भगवान येशू किंवा बायबल यांच्या नावामागे, आलिशान महालांमागे, हत्ती, रथ, घोडदळ, पायदळ, तोफखाना यांनी सज्ज असलेल्या सैन्याचा पृथ्वी हादरवणारा पदरव, युद्धतुताऱ्या, बिगुल, नगारे यांचा निनाद आणि राजेशाही सिंहासनाचे भव्य प्रदर्शन या सर्वांमागे, एक वेगळेच इंग्लंड सतत उभे असते– ते इंग्लंड, ज्याचे युद्धाचे निशाण म्हणजे कारखान्याचे धुराडे आहे, व्यापारी लोक म्हणजे त्याची सेना आहे, जगाची बाजारपेठ हे त्याचे युद्धक्षेत्र आहे आणि झळाळती लक्ष्मीदेवी ही स्वतःच त्याची महाराणी आहे! या सर्व कारणांमुळेच मी आधी म्हटले की इंग्लंडने भारतावर मिळवलेला विजय ही अपूर्व अशी नवलाईची गोष्ट आहे. या नव्या राक्षसी सत्तेशी टक्कर

देण्यासाठी भारतात कोणती नवी क्रांती परिणामकारक ठरेल, आणि ती क्रांती घडून आल्यावर भावी भारतासाठी कोणता बदल वाढून ठेवला आहे ह भारताच्या गतकालीन इतिहासावरून सांगता येणार नाही.' [५९]

वैश्य सत्तेविषयी आणखी पुढे विवेकानंद लिहितात :

'ज्या काळात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे वर्चस्व होते त्यावेळी शिक्षण आणि सांस्कृतिक प्रगती यांचे केंद्रिकरण झाले होते. त्याचप्रमाणे वैश्यांचे वर्चस्व म्हणजे संपत्तीचा संचय. वैश्यांचे सामर्थ्य आहे ते नाणे कबजात घेण्यामध्ये-ज्या नाण्याच्या खणखणाटाने चारही जातींच्या (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शद्र-विनय रॉय) लोकांच्या मनावर विलक्षण भुरळ पडते. वैश्याला नेहमी भीती वाटते की कदाचित आपल्याकडे असणारी ही एकमेव वस्तू ब्राह्मण फसवून आपल्याकडून हिरावून घेईल आणि कदाचित क्षत्रिय आपल्या श्रेष्ठ शस्त्रसामर्थ्याने ती गडप करेल. स्वसंरक्षणासाठी वैश्यांचे एक वर्ग म्हणून एकमत असते. वैश्याची पैशावर हुकमत असते; इतरांना त्याचा वापर करायचा असेल तर जणू काही स्वतःच्या हातात चाबूक असल्याप्रमाणे तो त्यांच्याकडून अफाट व्याज वसूल करतो, इतरांच्या मनात दहशत निर्माण करण्याचे त्याचे ते प्रभावी शस्त्र असते. पैशाच्या जोरावर राज्यसत्तेला नेहमी दाबात ठेवण्यात तो व्यग्र असतो. स्वतःकडे जो संपत्तीचा ओघ येत असतो त्यात राज्यसत्तेचा कुठेही अडथळा येऊ नये म्हणून व्यापारी नेहमी डोळचात तेल घालून असतो. पण हे सगळे असले तरी शासनकर्त्या वर्गाकडून सत्ता शूद्र वर्गाकडे जावी असे त्याला कधीही काडीमात्र वाटत नाही.

'व्यापारी कोणत्या देशात जात नाही ? तो स्वत: अज्ञानी असला तरी तो व्यापार करतो, आणि विद्या, ज्ञान, कला, विज्ञान या गोष्टी तो एका देशातून दुसऱ्या देशात नेऊन रुजवतो. ब्राह्मण आणि क्षत्रिय सत्तेच्या काळात समाजजीवनात ज्ञान, संस्कृती आणि कला यांचा जो संचय झाला होता तो व्यापार-उदीमाच्या माध्यमाद्वारे, वैश्यांच्या वेगवेगळचा बाजारपेठांच्या ठिकाणी पसरत गेला. वैश्यांच्या सत्तेचा जर उदय झाला नसता तर आज संस्कृती, शिक्षण, कौशल्य, अन्न आणि चैनीच्या वस्तू या सर्व गोष्टी जगाच्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत कुणी नेल्या असत्या ?

'आणि ज्यांच्या शारिरिक श्रमामुळेच केवळ ब्राह्मणांना नैतिक बळ, क्षत्रियांना शौर्य आणि वैश्यांना संपत्ती मिळते ते लोक कुठे आहेत ? तळागाळाच्या जातीत जन्मलेले असा ज्यांचा सर्व राष्ट्रांमध्ये कोणत्याही काळात उल्लेख केला जातो आणि जे समाजाचे मुख्य अंग आहेत, त्यांचा इतिहास काय आहे ? ज्या ज्ञानाची मक्तेदारी भारतातल्या उच्चवर्गीयांकडे आहे त्याच्यात हिस्सा मागण्याचा कोणताही प्रयत्न शूद्रांनी केला तर त्यांची जीभ छाटा आणि शरीराचे लचके तोडा

अशा आणि अशाच प्रकारच्या इतर मवाळ शिक्षा भारतात फर्मावल्या गेल्या आहेत ! हे शूद्र म्हणजे भारतातील 'हलते फिरते मुडदे' आणि इतर देशांमधले 'ओझी वाहणारे पशू' – यांचे आयुष्य कसे होते ? भारताबद्दल मी काय बोलावे ? या देशातले धर्मग्रंथांतले ज्ञान प्राप्त झालेले ब्राह्मण आता परकीय प्राध्यापक आहेत, येथील क्षत्रिय आता सत्ता गाजवणारे इंग्रज बनले आहेत, आणि ज्यांच्या हाडीमाशी व्यापार भिनला आहे असे इंग्रजच वैश्य झाले आहेत. भारतीयांच्या कपाळी आता फक्त शूद्रत्व – ओझी वाहून नेणारा पशुपणा–उरला आहे.' [६०]

विवेकानंदांच्या मते खुद्द साम्राज्यवादी राष्ट्रांतल्या लोकांचे भवितव्य काय असेल ? वसाहतींना लुबाडून साम्राज्यवाद्यांनी आपल्या देशबांधवांची स्थिती सुधारली या मताला ते मान्यता देत नाहीत. उलट, त्यांच्या मते, पिळवणूक आणि हक्कांची व स्वातंत्र्याची दडपणूक आणखी तीव्र झाली आणि त्यामुळे पाश्चात्य राष्ट्रांतल्या कष्टकरी लोकांचे भवितव्य वासाहतिक राष्ट्रांतल्या लोकांच्या भवितव्याच्या जवळ आले. मद्रास राज्यातल्या परमकुडी गावी जमलेल्या प्रचंड समुदायापुढे भाषण देताना विवेकानंद म्हणाले :

'आणि सध्या भारताकरता ज्या राजकीय व्यवस्थेसाठी आपण झगडत आहोत ती युरोपमध्ये वर्षानुवर्षे अनेक शतकांपासून आहे, आणि तिच्यात उणीवा दिसून आल्या आहेत. राजकीय शासनाशी संबंधित असलेल्या संस्था, व्यवस्था आणि सर्व गोष्टी निरुपयोगी म्हणून एकामागून एक त्यांचा धिक्कार केला जात आहे. युरोप अस्वस्थ आहे आणि आता कुठे वळावे ते त्याला ठाऊक नाही. ऐहिक गोष्टींचे जबरदस्त जुलूमी राज्य आहे. स्वतः काम न करणाऱ्या परंतु कौशल्याने लाखो माणसांचे काम तयार करणाऱ्या मूठभर माणसांच्या हातात देशाची संपत्ती आणि सत्ता आहे. ह्या सामर्थ्याच्या जोरावर ते संबंध पृथ्वीवर रक्ताचा प्रलय माजवू शकतात. धर्म आणि इतर सर्व गोष्टी त्यांच्या पायाखाली असतात. ते सत्ता गाजवतात आणि सर्वश्रेष्ठ म्हणून वावरतात. पाश्चिमात्य जगावर मूठभर चोरांची सत्ता चालते. तुम्ही जे सर्व ऐकता–संसदीय सरकार, स्वायत्तता, स्वातंत्र्य आणि लोकसभा–ही सर्व थट्टा आहे.' [६१]

काही थोडक्या भांडवलशाही राष्ट्रांतील मक्तेदारांनी स्वतःच्या हातात अमाप संपत्ती आणि सत्ता साठवली आहे. एकीकडे आपल्या हातातले बडे उद्योग आणि दुसरीकडे आपापल्या देशातल्या शासनांवर असलेला त्यांचा निर्णायक प्रभाव यांच्या जोरावर सर्व जग या मक्तेदारांनी आपापसात वाटून घेतले आहे. भारतासकट सर्व जग त्यांच्या या लोभी साम्राज्यवादी साहसाचे क्रीडांगण बनले आहे. पाश्चात्य राष्ट्रांतल्या तसेच वासाहतिक देशांतल्या लोकांचे शोषण जसजसे वाढत गेले तसतशी आपली प्रभावक्षेत्रे आणि वसाहती यांच्यातील फेरवाटणीच्या प्रश्नावरून

साम्राज्यवादी गटांतील चुरस वाढत गेली. हे माथेफिरू लोक कोणत्याही क्षणी संबंध जगाला रक्तात बुडवतील, जागतिक युद्ध सुरू करू शकतील, अशी स्थिती निर्माण झाली. ह्या पार्श्वभूमीवर सर्व जुन्या मूल्यांचे महत्त्व संपले, बहुजनसमाजाचे सर्व काही हरपले आणि त्याचबरोबर साम्राज्यशाहीपूर्वीच्या जुन्या उदारमतवादी भांडवली संस्थांवरचा त्यांचा विश्वास संपूर्णपणे उडाला; या संस्थांचे अगोदरच खऱ्या लोकशाहीच्या विडंबनात रूपांतर झाले होते.

पाश्चिमात्य जगाला कुरतडत असणाऱ्या या अंगभूत विसंगतींचे विवेकानंदांना स्पष्टपणे आकलन होऊ शकले. जगातल्या संपत्तीची निर्लज्जपणे उघडउघड लूट करण्यात आणि मागासलेल्या वासाहतिक देशांतील दुर्बळ लोकांना उघडपणे दडपण्यात या समाजाचे नेते गर्क होते आणि गेल्या शतकाच्या अखेरी अखेरीला याला विशेष निर्घृण रूप आले.

विवेकानंद लिहितात,

'एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जितकी लुटालूट, अरेरावी आणि दांडगटांचा दुर्बळांवर जो जुलुम झाला तितका जगाच्या इतिहासात यापूर्वी कधीही झाला नव्हता.' [६२]

वसाहतींचे फार मोठ्या प्रमाणावर जे शोषण झाले त्याचीच दुसरी बाजू म्हणून खुद्द युरोपमध्ये जागतिक पातळीवरच्या निर्णायक मुकाबल्याची तयारी चालली होती, युद्धासाठी तयारी चालली होती. स्वामीजी 'युरोपमधल्या प्रवासाच्या आठवणी' या त्यांच्या पुस्तकात लिहितात :

'एका दुष्ट घटकेला फ्रान्सचा जर्मनीकडून पराभव झाला. क्रोधामुळे आणि भीतीमुळे फ्रान्सने प्रत्येक नागरिकाला सैनिक बनवले...इतर राष्ट्रांमधेही एकमेकांमधल्या भीतीमुळे सैन्यात सक्तीने भरती करण्याची सुरुवात झाली. इंग्लंडव्यतिरिक्त संबंध युरोपमध्य हे घडले. इंग्लंड हे बेट असल्यामुळे ते आपल्या आरमाराचे सामर्थ्य सतत वाढवत आहे. रशियाची लोकसंख्या सर्वांत अधिक असल्यामुळे तो युरोपमध्ये सर्वांत जास्त सैन्य जमवू शकतो. पण शेवटी पैसा कोण पुरवणार? परिणामी शेतकऱ्यांना फाटकी लक्तरे पांघरावी लागली आहेत. त्याचवेळी शहरांमध्ये रूबाबवर गणवेषातले सैनिक तुम्हाला आढळतील. संबंध युरोपमध्ये सैनिकांचे वेड पसरल आहे. सगळीकडे सैनिक...' [६३]

'सबध पाश्चिमात्य जग एका ज्वालामुखीच्या तोंडावर बसले आहे. कदाचित त्या ज्वालामुखीचा उद्या उद्रेक होईल आणि या जगाच्या ठिकऱ्या उडतील.' [६४]

विवेकानंदांनी पूर्वेकडील देशांत पहिले सार्वजनिक भाषण दिले ते 'कोलंबोतील भाषण' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यावेळी संस्कृतीच्या इतिहासाचे, तिच्या काटेरी व रक्तरंजित मार्गक्रमणाचे विश्लेषण करताना ते म्हणाले :

'प्राचीन काळात आणि आधुनिक काळात, सामर्थ्यवान आणि श्रेष्ठ वंश-समूहांकडून महान विचारांची निर्मिती झाली. महान विचार एका वंशानंतर दुसऱ्या वंशाने पुढे नेले. प्राचीन काळात आणि आधुनिक काळात, सर्वोच्च व सामर्थ्यवान सत्याचे बीज राष्ट्रीय जीवनप्रवाहाच्या ओघात परदेशांतही फेकले गेले. पण माझ्या मित्रांनो, एक गोष्ट लक्षात घ्या की हे नेहमी युद्धाच्या नगाऱ्यांच्या आवाजाबरोबर आणि सैन्याच्या आगेकूचीच्या साथीने होते. प्रत्येक कल्पना रक्ताच्या महापुरात भिजावी लागते, प्रत्येक कल्पनेला आपल्या लाखो बांधवांच्या रक्तातून मार्ग काढावा लागतो. सत्तेच्या प्रत्येक शब्दामागे लाखोंचे विव्हळणे, अनाथांचे हुंदके आणि विधवांचे अश्रू होते. इतर राष्ट्रांनी मुख्यत्वे हेच आपल्याला शिकवले आहे' [६५]

त्या काळातल्या युरोपात आणि अमेरिकेत विवेकानंदांना केवळ सैनिकांच्या पावलांचा आवाज ऐकू आला नाही, जगभर नवे रक्तस्नान घडवण्याच्या माथेफिरू तयारीची केवळ दृश्ये दिसली नाहीत, तर जगात आणि मानवी समाजात संपूर्ण बदल घडवण्यासाठी समाजातल्या तळागाळाच्या लोकांमधून जी नवी जाणीव वर येत होती, त्याची ओळख त्यांना पटली होती. विचारवंतांचे सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी उदयोन्मुख प्रवाहाला मदत करत होते. दूरवरच्या युरोपमध्ये महान कल्पना जन्म घेत होत्या. या कल्पनांचा संदेश भारतीय उपखंडातील लोकांपर्यंत घेऊन जाणाऱ्या पहिल्यावाहिल्या मूठभर व्यक्तींमध्ये विवेकानंद होते. कोलंबोच्या त्या भाषणात त्यांनी श्रोत्यांना सांगितले :

'पाश्चिमात्य जगात बदल घडवण्यासाठी जोरदार राजकीय चळवळी आणि समाजवादी चळवळी होतआहेत हे तुमच्यापैकी कितीजणांना ठाऊक आहे? जर असेलच तर ते फारच थोड्यांना ठाऊक असेल.' [६६]

या नव्या कल्पनांना खाद्यावर वाहून नेणारा, आगामी संस्कृतीच्या नव्या व्यवस्थेचा शूर शिपाई असणारा, जगाला केवळ शोषण, दुःख, अज्ञान आणि ठराविक काळानंतर रक्तपात एवढेच ज्या व्यवस्थेने दिले त्या जुन्या व्यवस्थेची कबर खोदणारा, नव्याने उदयाला येणारा युरोप आणि अमेरिकेतील बहुजनसमाज—त्याची चाहूल विवेकानंदांनी ऐकली. पाश्चिमात्य देशांतील तळागाळाची सामान्य जनता हीच त्यांच्या मते या नव्या महान चळवळीची अग्रदूत आणि मशाल पुढे घेऊन जाणारी शक्ती होती.

युरोप आणि अमेरिकेतला बहुजनसमाज साम्राज्यवाद्यांच्या हुकुमापुढे दीनवाणेपणाने शरण जात नव्हता हे विवेकानंदांनी लक्षात घेतले. त्यांनी लिहिले :

'युरोप आणि अमेरिकेतला बहुजनसमाज सर्वात आधी जागृत झाला आहे. अलीकडे भारतात खालच्या वर्गाचे जे अनेक संप होतात त्यावरून या जागृतीच्या

खुणा भारतातही उमटू लागल्या आहेत हे स्पष्ट होते. उच्च वर्गातल्या लोकांनी कितीही प्रयत्न केला तरी फार काळ ते खालच्या वर्गांना दडपू शकणार नाहीत.' [६७]

पाश्चिमात्य आणि भारतीय समाजाचा विकास लक्षात घेऊन, भारताचा इतिहास आणि जगाचा सर्वसामान्य इतिहास यांचे विश्लेषण करताना विवेकानंद असा निष्कर्ष काढतात की मानवी संस्कृतीच्या पुढच्या टप्प्यात श्रमिक वर्गाचे किंवा शूद्रांचे वर्चस्व असेल. साम्राज्यवाद्यांच्या पिळवणुकीमुळे सर्वच लोक वेगाने भिकेला लावले जात आहेत, आपापल्या वर्गापासून दुरावत आहेत आणि त्यांचे शूद्र वर्णात रूपांतर होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घऊन विवेकानंद त्यांच्या 'आधुनिक भारत' (उद्‌बोधन, मार्च १८९९) या लेखात लिहितात :

'ज्या देशात जनता जवळजवळ शूद्रांच्याच पातळीवर आली आहे त्या देशातल्या शूद्र वर्गाबद्दल वेगळे काय बोलावे ? भारताव्यतिरिक्त इतर देशांतील शूद्र लोकांत थोडीशी जागृती झाली आहे असे वाटते; परंतु त्यांच्यात योग्य शिक्षणाचा अभाव आहे आणि स्वत:च्याच वर्गातल्या माणसांचा आपापसात ते द्वेष करतात. शूद्रांमध्ये ही प्रवृत्ती नेहमी आढळते. मग इतर वर्गांपेक्षा शूद्रांची संख्या प्रचंड प्रमाणात जास्त आहे त्याचा काय उपयोग ? दहा माणसांचे ऐक्य झाले तर लाख माणसांचे बळ त्यांच्यात एकवटते. ही एकजूट शूद्रांच्या बाबतीत अजूनही दूर आहे; म्हणूनच निसर्गाच्या नियमानुसार अनिवार्यपणे शूद्र लोकच गुलामांचा वंश बनतात.

'परंतु एक आशा आहे. काळाच्या ओघात ब्राह्मण आणि इतर उच्च जाती खालच्या शूद्राच्या पातळीवर आणल्या जात आहेत आणि शूद्र वरच्या दर्जावर जात आहेत. आपल्या डोळ्यादेखत बलाढ्य चीन झपाटयाने शूद्राच्या पातळीवर जात आहे, आणि त्याचवेळी चिमुकला जपान अग्निबाणासारखा अचानकपणे सुरुवात करून आपला शूद्र स्वभाव झटकून टाकत आहे आणि उच्च जातीच्या हक्कांचे क्रमाक्रमाने उल्लंघन करत आहे.

'अशी एक वेळ येईल की शूद्र आपल्या शूद्रपणासहित वर येतील. याचा अर्थ असा की वैश्य किंवा क्षत्रिय यांचे स्वाभाविक गुणधर्म प्राप्त करून शूद्र मोठे होत आहेत; परंतु अशी एक वेळ येईल की वैश्य किंवा क्षत्रिय न बनता, आपल्या शूद्र वर्गाची जन्मजात स्वभाववैशिष्ट्ये आणि सवयी घेऊनच प्रत्येक राष्ट्रातल्या शूद्रांना प्रत्येक समाजात निर्विवाद श्रेष्ठत्व मिळेल. या नव्या शक्तीच्या सूर्योदयाची प्रभा पाश्चिमात्य जगात आधीच फाकू लागली आहे. या नव्या घडामोडीचा शेवट काय होईल याचा विचार करताना बुद्धिमंतांची मतीसुद्धा कुंठित झाली आहे. समाजवाद, अराज्यवाद, सर्वशून्यवाद (निहिलिझम) इ. पंथ म्हणजे भावी काळात होणाऱ्या सामाजिक क्रांतीचे अग्रदूत आहेत.' [६८]

विवेकानंदांना त्या काळी युरोपच्या अगदी नजिक येऊन ठेपलेल्या समाजवादी क्रांतीची कल्पना आली नाही व तिचे नेमके स्वरूप ते समजू शकले नाहीत हे उघड आहे. त्याचप्रमाणे या क्रांतीमध्ये नेतृत्व जो वर्ग किंवा जे अनेक वर्ग देतील त्यांच्या भूमिकेचे त्यांना स्पष्टपणे आकलन होऊ शकले नाही. आगामी क्रांतीच्या संदर्भात समाजवाद, अराज्यवाद, किंवा सर्वशून्यवाद यासारख्या राजकीय प्रवाहांची भूमिका, उद्दिष्टे आणि कार्य यांच्यात त्यांनी गल्लत केली. परंतु त्या कालखंडाचे सारभूत युगतत्व आणि समाजात बदल घडवून आणण्यात सर्वसाधारणपणे श्रमिकांची भूमिका यांचे स्पष्ट आकलन त्यांना झाले होते. एक खरे आहे की त्या काळी युरोपातील कामगारवर्गाशी किंवा राजकीय चळवळींशी जवळचा संबंध नसल्यामुळे, समाजवादी क्रांतीमध्ये कामगारवर्ग आणि त्याच्या दोस्तशक्ती यांच्या निर्णायक भूमिकेचे स्पष्ट आकलन त्यांना असणे अशक्य होते. भारतातल्या नुकत्याच उदयास आलेल्या कामगारवर्गाची अविकसित स्थिती आणि वर्गीय जाणिवेची सुरुवातीची अवस्था यामुळे नजिकच्या भविष्यात कामगारांची राजकीय भूमिका काय असेल याबद्दल अर्थातच विवेकानंदांना विश्वास वाटला नाही. परंतु भविष्यकाळ शूद्रांचा आहे आणि समाजाचे तेच भावी नेते व राज्यकर्ते असणार आहेत याचे आश्चर्यकारकरित्या स्पष्ट आकलन त्यांना झाले होते आणि हे भविष्य त्यांनी ठामपणे वर्तवले होते.

योग्य आणि अनुकूल परिस्थिती मिळाली तर शूद्रांमधूनही अनेक बुद्धिवंत निपजतील याबद्दल स्वामीजींनी जो युक्तिवाद केला आहे तो आपण आधीच पाहिला आहे. या संदर्भात एक गोष्ट लक्षात घेणे महत्त्वाचे ठरेल की स्वामीजी स्वत:ला समाजवादी म्हणवत आणि क्रांतीमध्ये नेतृत्व करून 'शूद्र राज्य' स्थापन करणाऱ्या कष्टकरी लोकांशी ते एकरुपतेचे नाते सांगत. 'साम्यवादी व्यवस्था परिपूर्ण आहे असे मला वाटते म्हणून मी समाजवादी आहे असे नाही. परंतु भाकरी अजिबात न मिळण्यापेक्षा तिचा चतकोर तुकडाही बरा.' [६९]

ज्या नव्या समाजाचे कष्टकरी किंवा शूद्र नेतृत्व करणार आहेत त्या समाजाबद्दल विवेकानंद स्वत: साशंक होते.

'सर्वात शेवटी श्रमजीवींचे (शूद्रांचे) राज्य येईल. भौतिक सुखसुविधांचे सर्वांना वाटप होईल हा त्याचा फायदा असेल– (कदाचित) संस्कृतीचा दर्जा खालावेल हा त्याचा तोटा.सामान्य शिक्षणाचा खूपच प्रसार होईल, परंतु असामान्य प्रतिभावंतांची संख्या कमी कमी होत जाईल.' [७०]

विवेकानंद ज्या समाजाची कल्पना करत होते तो अजून जन्माला आला नव्हता, त्याची जडणघडण आणि आवाका त्यांना अजून स्पष्ट झालेला नव्हता. त्यांनाच काय पण तसा समाज आणण्यासाठी जे प्रत्यक्ष काम करत होते अशा

अनेक समाजवाद्यांनादेखील ते स्पष्ट झाले नव्हते. तरीही विवेकानंदांनी त्याचे मनापासून स्वागत केले आणि एखाद्या हितचिंतकाप्रमाणे त्या समाजाच्या यशाविषयी त्यांनी कळकळीची आशा व्यक्त केली.

'ब्राह्मण युगातले ज्ञान, क्षत्रिय युगाची संस्कृती, व्यापारी काळातली संपत्ती विस्तार करण्याची प्रेरणा आणि अखेरच्या युगातला समतेचा आदर्श हे सर्व जर, या सर्व युगांमधील दुष्ट प्रवृत्ती उणे करून, एखाद्या राज्यात एकत्र नांदले तर ते राज्य आदर्श होईल. परंतु हे शक्य आहे का ? ... इतर व्यवस्थांचे प्रयोग झाले आहेत आणि त्यांच्यात उणीवा आढळल्या आहेत इतर कशासाठी नाही तरी निदान नाविन्य म्हणून तरी या व्यवस्थेचा प्रयोग करून पहावा. दुःख आणि आनंद नेहमी त्याच त्याच माणसांना मिळण्यापेक्षा दुःख आणि आनंद यांचे वाटप झाले तर ते अधिक चांगले आहे.' [७१]

आणखी पुढे जाण्यापूर्वी ज्या विषयाला आपण आता हात घातला आहे त्याबद्दल थोडेसे अधिक सांगणे मला योग्य वाटते. विवेकानंद ज्याला शूद्र राज्य म्हणतात ते म्हणजे कामगारवर्गाच्या मार्गदर्शनाखाली चालणारे समाजवादी राज्य म्हणून नंतर ओळखले गेले. वर उद्धृत केलेली निरीक्षणे विवेकानंदांनी मांडल्यानंतर वीस वर्षांनी जगात कामगारवर्गाचे नेतृत्व असणारे पहिले समाजवादी राज्य अस्तित्वात आले.कामगार चळवळीचे विवेकानंदांना निश्चित व स्पष्ट असे आकलन झालेले नव्हते, आणि त्या काळात भारतातला कामगारवर्ग बाल्यावस्थेत होता. त्यामुळे शूद्र राज्याचे स्वरुप आणि अधिक चांगल्या समाजाची उभारणी करण्याची त्याची क्षमता याबद्दल विवेकानंदांना शंका होत्या. परंतु परकीय सत्ताधाऱ्यांनी चालवलेली नागवणूक आणि त्यांची ताबेदारी, तसेच स्वकीयांकडून देशांतर्गत होणारे शोषण यांपासून श्रमिकांची मुक्तता झाली तर ते उच्च दर्जाच्या सृजनशील कार्यास पुरे पडू शकतील आणि विकसनशील समाजातील सत्ताधारी वर्गाला आवश्यक असणारे ज्ञान मिळवू शकतील हा गाभा विवेकानंदांना समजला होता हे आपल्याला मान्य करावे लागेल. शूद्र राज्य हे एक आदर्श राज्य म्हणून अवतरलेले पहाण्याची जी सदिच्छा विवेकानंदांनी व्यक्त केली आहे ते राज्य केवळ प्रत्यक्षात आणता येईल, एवढेच नव्हे तर आजवरच्या सर्व समाजव्यवस्थांपेक्षा उच्च प्रकारची समाजव्यवस्था प्रस्थापित करायची ऐतिहासिक जबाबदारी पार पाडायची असेल तर शूद्र राज्य येणे ही एक नैसर्गिक व आवश्यक प्रक्रिया आहे.

साम्यवादाची पहिली खालची पायरी म्हणून समाजवादी राज्य आणि समाजवाद यांचा वैज्ञानिक पाया कार्ल मार्क्सने घातला. मार्क्सचा समाजवाद आणि समाजवादी राज्य यांच्याबद्दलचा सिद्धांत स्वामी विवेकानंदांच्या मृत्यूनंतर लेनिनने पुढे आणखी विकसित केला आणि त्याला मूर्त स्वरुप दिले. मार्क्सच्या ग्रंथांची विवेका-

महालय ठाणे
3050
दि. मा. 2022
निबंध वाचन

नंदांना बहुधा ओळख झाली नसावी. आणि मार्क्सचे लेखन त्यांनी जरी वाचले असले तरी मार्क्सवादी सिद्धांत त्यांनी स्वीकारला असेल असे मानण्याचे कारण नाही. कारण मार्क्सवादी सिद्धांताची मूलभूत बैठक द्वंद्वात्मक जडवादी तत्वज्ञान आहे आणि चिद्वाद हा विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाचा पाया होता. त्यामुळे विवेकानंदांचे शूद्र राज्य आणि मार्क्स व लेनिन याची समाजवादी राज्याची कल्पना यात बाह्यांगी जरी साधर्म्य असले तरी या दोन गोष्टीमधे मूलभूत फरक आहे.

मार्क्स आणि लेनिन यांच्या मतानुसार यशस्वी समाजवादी क्रांतीची निष्पत्ती म्हणूनच कामगारवर्गाचे नेतृत्व असलेले समाजवादी राज्य जन्माला येते. ही क्रांती त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या वास्तव परिस्थितीनुसार रक्तरंजित किंवा रक्तहीन असेल, परंतु ती निश्चितच भांडवलदारवर्गाची सत्ता झुगारून देणारी असेल. विवेकानंदांचे शूद्र राज्यदेखील भांडवलदारवर्गाच्या सत्तेऐवजी शूद्रांचे किंवा कष्टकऱ्यांचे राज्य स्थापन करण्याद्वारा येते.परंतु हे कसे घडेल याबद्दल ते काहीच स्पष्टीकरण देत नाहीत. मानवी संस्कृतीच्या विकासातली ती पुढची अवस्था आहे एवढेच ते सांगतात. ते उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी कामगारवर्गाची, काबाडकष्ट करणाऱ्या जनतेची संघटना बांधण्याचे कार्य ते सांगत नाहीत. उलट देशातल्या तरुण, सुशिक्षित, मध्यमवर्गीय तरुणांची संघटना बांधण्याचे कार्य स्वतःकडे घेतात आणि 'बहुजनसमाजापर्यंत जाऊन पोचण्याचे' काम त्यांच्यापुढे ठेवतात. काय करण्यासाठी ? वसाहतवादी सत्ता उलथवून देण्यासाठी आणि उच्चवर्गीयांकडून होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी श्रमिकांचे संघटन बांधण्यासाठी ? त्याला विवेकानंदाचे उत्तर आहे–नाही !

राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या विवेकानंदांच्या योजनेत 'व्यक्तिमत्त्वाचा विकास' ही मध्यवर्ती कल्पना होती. त्यांच्या स्वतःच्या प्रांतामध्ये, बंगालमध्ये तरुणांना उद्देशून ते म्हणाले :

'बंगालच्या युवकांनो, पैसे असणाऱ्या श्रीमंत आणि प्रतिष्ठित माणसांकडे आदराने पाहू नका. जगातले सर्व महान आणि प्रचंड काम गरिबांनीच केली आहेत ...तुम्ही गरीब आहात म्हणूनच तुम्ही काम कराल. तुमच्याकडे काहीच नाही म्हणून तुम्हीच प्रामाणिक रहाल. [७१]

'माझ्या मुलांनो, गरीब, अज्ञानी आणि पददलितांबद्दल तुम्हाला काही तरी वाटू द्या. हृदयाचे ठोके थांबून जाईपर्यंत, मेंदू चक्रावून जाईपर्यंत आणि आपण आता वेडे होऊ असे तुम्हाला वाटपर्यंत तुम्हाला गरीबांबद्दल सहभावना वाटू द्या. ... संघर्ष करा, संघर्ष करा हेच गेली दहा वर्षे माझे बोधवाक्य होते, आणि आजही मी म्हणतो संघर्ष करा.जेव्हा सगळीकडे अंधार होता तेव्हा मी म्हणत असे संघर्ष करा; आता प्रकाशाची प्रभा फाकू लागली तरीही मी म्हणतो संघर्ष करा. माझ्या बालांनो, कसलीही भीती बाळगू नका...

'वृद्धीसाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य. ज्याप्रमाणे विचार करण्याचे आणि बोलण्याचे स्वातंत्र्य माणसाला लागते त्याप्रमाणे अन्न, वस्त्र, विवाह आणि इतर प्रत्येक बाबतीत माणसाला स्वातंत्र्य असायला हवे...

'ऐहिक संस्कृतीच्या विरुद्ध आपण मूर्खासारखे बोलतो. द्राक्षे आंबट असतात...ऐहिक संस्कृती इतकेच नव्हे तर अगदी श्रीमंती ऐषाराम सुद्धा गरीबांसाठी काम निर्माण करण्याकरता आवश्यक आहे. भाकरी ! भाकरी ! जो ईश्वर मला स्वर्गात चिरंतन सुख देईल पण इथे मात्र भाकरी देऊ शकत नाही अशा देवावर माझा विश्वास नाही. भारताला ऊर्जितावस्था आणली पाहिजे, गरीबांना अन्न दिले पाहिजे, शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे आणि पुरोहितशाहीच्या दुष्ट प्रथेचे उच्चाटन केले पाहिजे....अधिक अन्न, प्रत्येकाला अधिक संधी.

'ही आग सगळीकडे पसरू दे. काम करा, काम करा.' [७१]

'खालच्या वर्गांच्या लोकांना शिक्षण देणे, त्यांच्या हरपलेल्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे एवढीच सेवा आपण त्यांच्यासाठी करायला हवी ... त्यांना विविध विचारांची ओळख करून द्यायला हवी, त्यांच्या भोवताली जगात काय चालले आहे हे त्यांच्या नजरेस आणून दिले पाहिजे; आणि स्वतःच्या मुक्तीचा मार्ग ते स्वतःच शोधून काढतील ... त्यांना विचार द्या–त्यांना फक्त तेवढ्याच मदतीची जरूर आहे; नंतरचे सर्व परिणाम आपोआप घडतील...भारतात करायला हवे ते हेच. बरीच वर्षे माझ्या मनात जी कल्पना आहे ती हीच.' [७४]

'बहुजनसमाजाला त्याचे हक्क मिळवून देणे हा एकच खरा प्रश्न तुमच्या-समोर आहे.' [७५]

'आपल्या देशातला बहुजनसमाज हा झोपी गेलेल्या महाकाय प्राण्यासारखा आहे...सध्याच्या विद्यापीठ व्यवस्थेद्वारा दिले जाणारे शिक्षण फक्त एक किंवा दोन टक्के लोकांपर्यंत पोचते.

'शिष्य : भारताला पुन्हा उच्च अवस्था कशी प्राप्त होईल ?

'स्वामीजी : तुम्हाला दिसत नाही का ? पूर्वेच्या आकाशात पहाट आधीच उगवली आहे आणि सूर्य उगवायला अजून थोडाच अवकाश आहे. रथचक्राला तुम्ही खांदा लावा ! आळशासारखे बसून यापुढे चालणार नाही हे लोकांना समजून सांगण्यासाठी देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत गावोगाव हिंडणे हे आता तुमचे कर्तव्य आहे. त्यांची खरी अवस्था त्यांना समजून दिली पाहिजे आणि म्हटले पाहिजे, 'बंधूंनो, उठा ! जागे व्हा ! आणखी किती काळ तुम्ही झोपून रहाणार आहात ! ' त्यांच्यापर्यंत जा आणि स्वतःची स्थिती कशी सुधारायची हे त्यांना सांगा...आयुष्याच्या साध्यासुध्या गरजा, तसेच उद्योग, व्यापार, शेती

वगैरेंबद्दल त्यांना सोप्या भाषेत शिकवा. तुम्ही जर हे करू शकत नसाल तर तुमच्या शिक्षणाचा आणि संस्कारांचा धिक्कार असो...

'तुम्हाला मरायचे तर आहेच, पण एखाद्या महान आदर्शासाठी जीव ओवाळून टाका. आयुष्यात एखाद्या महान आदर्शासाठी मरण पत्करणे अधिक चांगले. दारोदारी हिंडून या आदर्शाची शिकवण द्या. त्यामुळे तुम्ही देशासाठी काहीतरी चांगले कराल आणि त्याचवेळी तुमचा स्वतःचा फायदाही होईल. आपल्या देशाच्या भावी आशा तुमच्यावर अवलंबून आहेत.'[७६]

'मुक्तीचा, सेवेचा, सामाजिक उत्थापनाचा, समतेचा उपदेश करत शेकडो स्त्री-पुरुषांनी देशभर हिंडले पाहिजे.'[७७]

राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या विवेकानंदांच्या कार्यक्रमात जनसमुदायांच्या शिक्षणाला निर्णायक भूमिका होती हे वरील उताऱ्यांवरून स्पष्ट दिसून येते. या बाबतीतला त्यांचा कार्यक्रम अत्यंत विकसित, नवीन आणि अनेक पैलू असलेला होता. पहिली गोष्ट म्हणजे, शेकडो गरीब पण प्रामाणिक तरुणतरुणींनी देशाच्या कानाकोपऱ्यात हिंडून कष्टकरी लोकांना सैद्धांतिक आणि व्यावहारिक दोन्ही प्रकारचे ज्ञान दिले पाहिजे अशी त्यांची योजना होती. कष्टकरी लोकांच्या आजूबाजूला जे घडते त्याबद्दल त्यांना जाणीव करून देणे ही या शिक्षकांची कामगिरी असेल आणि त्यानंतर कोणती कृती करायची हे कष्टकरी लोक स्वतःच ठरवतील. दुसरी गोष्ट, तरुण पिढीला प्रशिक्षण देण्याची कामगिरी परकीय सत्ताधाऱ्यांच्या आणि कर्मठ धार्मिक संस्थांच्या हातून काढून घेऊन ती सबंध समाजावरच टाकण्याची ते मागणी करत होते. स्वदेशाभिमानी व उपयुक्त शिक्षण दिले जावे अशीही त्यांची मागणी होती. जगातले अगदी अद्ययावत् विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील ज्ञानावर त्यांनी प्रभुत्व मिळवावे. व्यावसायिक प्रशिक्षण आणि शिक्षण याला विवेकानंदांनी अतिशय महत्त्व दिले. शारिरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी, जगातल्या इंग्लंडसहित सर्व राष्ट्रांशी स्पर्धा करू शकेल असे सामर्थ्यशाली आधुनिक राष्ट्र निर्माण करा हे त्यांचे ब्रीदवाक्य होते.

ढाक्यातील एका क्रांतिकारक तरुणांच्या गटासमोर भाषण देताना विवेकानंद म्हणाले :

'इतर देशांच्या चांगल्या गुणांचे अनुकरण करा, त्यांचे तांत्रिक कौशल्य आणि जीवनगुण यांची जोपासना करा... आणि नीतीचा व कार्यक्षमतेचा आधुनिक दर्जा प्राप्त केल्यानंतर राष्ट्र बळकावणाऱ्या परकीयांना आपल्या देशात त्यांच्याच भाषेत उत्तर द्या. महान पौर्वात्य संस्कृतीच्या या बालेकिल्ल्याभोवती पडलेला परकीय आक्टोपसचा विळखा सोडून टाका.'[७८]

स्वामीजींच्या मते, पूर्व आणि पश्चिमेचा संयोग, पाश्चिमात्य जडवादी

संस्कृती आणि पूर्वेकडील वेदांती तत्त्वज्ञान यांचे ऐक्य हेच भावी भारतासमोरचे ध्येय होते. पाश्चिमात्यांकडून आपण काय घेतले पाहिजे ? विवेकानंद म्हणतात :

'जे आपल्याकडे नाही–कदाचित आपल्या पूर्वजांकडेही कधी नव्हते, पण जे यवनांकडे होते, ते आपण मिळवले पाहिजे. आज जीवनाच्या अंतःप्रेरणांमुळे युरोपच्या प्रचंड डायनॅमोतून सतत महापुरासारखा ज्याचा प्रवाह लोंढ्यासारखा वाहात आहे, तो सबंध जगाला प्राणदायी ठरणारा अफाट शक्तीचा विद्युतप्रवाह आपण प्राप्त करून घेतला पाहिजे. आपल्याला त्याची गरज आहे. ती शक्ती, ते स्वातंत्र्यप्रेम, स्वावलंबनाची ती प्रेरणा, ते अढळ मनोधैर्य, कृती करण्यातले ते कौशल्य, ते एकाच ध्येयाचे बंधन, सुधारणेची ती तहान, आपल्याला हवी आहे. भूतकाळाकडे सतत वळून बघणे थोडे कमी करून, अमर्यादपणे पुढे पहाणारी ती विशाल दृष्टी आपल्याला पाहिजे आहे आणि तळपायापासून मस्तकापर्यंत आपल्या नसानसांतून वाहील असे क्रियाशील चैतन्य, ती राजस वृत्ती आपल्याला हवी आहे.'[७९]

वर जे सर्व काही म्हटले आहे त्याच्या संदर्भात स्वामीजी देशभक्ती कशाला म्हणतात हे जाणून घेणे मनोरंजक ठरेल. 'मोहिमेचा माझा आराखडा' या विषयावर मद्रासमध्ये केलेल्या सुप्रसिद्ध भाषणात विवेकानंद म्हणाले :

'ते देशभक्तीबद्दल पुष्कळ बोलतात.देशभक्तीवर माझा विश्वास आहे आणि देशभक्तीचा माझा स्वतःचा असा आदर्शदेखील आहे. महान साध्यासाठी तीन गोष्टी आवश्यक असतात. अंतःकरणापासून उत्कट जाणीव होणे ही पहिली गोष्ट. तुम्हाला उत्कट जाणीव होते का ? देवांचे आणि ऋषींचे लाखो–करोडो वंशज पशूंच्या पातळीवर आले आहेत याची तुम्हाला जाणीव आहे का ? लाखो लोकांची आज उपासमार होत आहे आणि युगानुयुगे लाखो लोक भूकेने तडफडत आले आहेत हे तुम्हाला जाणवते आहे का? आपल्या देशावर काळचा ढगाप्रमाणे अज्ञान पसरले आहे याची तुम्हाला जाणीव आहे का ? ते तुम्हाला अस्वस्थ करते का ? ते तुमचा निद्रानाश करते का ? ते तुमच्या रक्तात मिसळले आहे का, तुमच्या धमन्यातून जलदगतीने धावून तुमच्या नाडीच्या ठोक्याबरोबर ही जाणीव एकरूप झाली आहे का ? तिने तुम्हाला जवळजवळ भ्रमिष्ट केले आहे का ? या सर्व विनाशाच्या, दुःखाच्या एकाच कल्पनेने तुम्ही झपाटले गेले आहात का ? त्यामुळे तुम्ही तुमचे नाव, सन्मान, बायका-मुले, तुमची मालमत्ता, इतकेच काय तर तुमचे शरीरदेखील विसरून गेला आहात का ? तुम्ही हे केले आहे का ? देशभक्त होण्याची ती पहिली, सर्वात पहिली पायरी आहे. तुमची सर्वांची कल्पना आहे त्याप्रमाणे मी सर्व धर्म संसदेसाठी अमेरिकेत गेलो नव्हतो, परंतु हा उत्कट अनुभूतीचा समंध माझ्यात, अगदी माझ्या आत्म्यात शिरला होता. बारा वर्षे मी भारतात सर्वत्र

हिंडलो. माझ्या बांधवांसाठी काही तरी करण्याचा मार्ग मला येथे सापडला नाही म्हणून मी अमेरिकेला गेलो. त्यावेळी मला तुमच्यापैकी जे ओळखत होते त्यांना हे ठाऊक आहे. त्या सर्व धर्मांच्या संसदेची कुणाला पर्वा होती ? इकडे प्रत्येक दिवशी माझ्या रक्तामांसाचे देशबांधव मरणाऱ्या वाटेकडे जात, आणि कोण त्यांची परवा करत होते ? हे माझे पहिले पाऊल होते.

' तुम्हाला हे उत्कटपणे जाणवले असेल; पण मग वायफळ बडबड करण्यात तुमची शक्ती खर्च करण्याऐवजी, प्रत्यक्ष काही उपाय तुम्ही शोधून काढला आहे काय ? नुसत्या नापसंतीऐवजी काही मदत करण्याचा, त्यांची दुःखे हलकी करण्यासाठी दोन गोड शब्द बोलण्याचा, या जिवंत मरणातून त्यांना बाहेर काढण्याचा काही व्यवहार्य मार्ग तुम्हाला सापडला आहे का ?

' तरीही एवढेच म्हणजे सर्व काही नव्हे. पर्वताएवढे उंच अडथळे पार करण्याइतकी तुमची इच्छाशक्ती आहे का ? सबंध जग जरी हातात तलवार घेऊन तुमच्याविरुद्ध उभे ठाकले तरी तुम्हाला जे बरोबर वाटते ते करण्याचे धैर्य तुमच्यात आहे का ? तुमची बायका-मुले तुमच्याविरुद्ध असली, तुमचा सर्व पैसाअडका गेला, तुमचे नाव धुळीस मिळाले, तुमची संपत्ती नष्ट झाली तरीही तुम्ही त्या निर्णयाला चिकटून रहाल का ? तरीही पाठपुरावा करून धीमेपणाने तुम्ही स्वतःच्या ध्येयाकडे जात रहाल का ? तुमच्याकडे तो खंबीरपणा आहे ? तुमच्याकडे जर या तीन गोष्टी असतील तर तुमच्यातला प्रत्येकजण चमत्कार करून दाखवील...

' माझ्या देशबांधवांनो, माझ्या मित्रांनो, माझ्या मुलांनो, ही राष्ट्रनौका करोडो आत्म्यांना जीवनरूपी भवसागर तरून नेत आली आहे. अनेक प्रकाशमान शतके ती या सागरात ये–जा करत आहे आणि तिच्यातून लक्षावधी आत्मे पैलतीराला गेले आहेत, मोक्षाकडे गेले आहेत. पण आज, कदाचित तुमच्या स्वतःच्याच चुकीमुळे, या नौकेची थोडीशी हानी झाली आहे, तिला गळती लागली आहे, म्हणून तुम्ही तिला दोष द्याल का ?...जरी तळाला भोके पडली असली तरी ही राष्ट्रनौका, हा समाज आपला आहे आणि आपण त्याची लेकरे आहोत. चला, आपण जाऊन ती छिद्रे बुजवून टाकू या. आपण ते अगदी अंतःकरणापासून, आनंदाने करू या. आणि जर आपण हे करू शकत नसलो तर आपण मरून जाऊ या. आपण आपल्या मेंदूची खुंटी बनवून ती त्या भोकांमध्ये घातली पाहिजे. पण या नौकेचा आपण कधीही धिक्कार करता कामा नये, या समाजाविरुद्ध एकही कठोर शब्द उच्चारू नका. या समाजाच्या गतकाळातल्या महानतेमुळे माझे त्यावर प्रेम आहे. माझे तुम्हा सर्वांवर प्रेम आहे. कारण तुम्ही देवांची लेकरे आहात आणि तुमच्या तेजस्वी पूर्वजांचे वंशज आहात. माझ्या मुलांनो, माझ्या सर्व योजना तुम्हाला सांगण्यासाठी मी तुमच्याकडे आलो आहे. तुम्ही जर त्या ऐकून घेतल्यात

तर मी तुमच्याबरोबर काम करायला तयार आहे. परंतु तुम्ही जरी त्या ऐकून घेतल्या नाहीत आणि मला भारताबाहेर हाकलून दिलेत, तरीही मी परत येईन आणि आपण सर्व बुडत आहोत हे तुम्हाला सांगेन. आता मी तुमच्यामध्ये येऊन बसण्यासाठी आलो आहे आणि जर बुडायचेच असेल तर आपण सर्वजण मिळून एकत्र बुडू या. पण आपल्या ओठांवर कधीही शिव्याशाप येता कामा नयेत.'[८०]

मानवी संस्कृतीच्या संबंध इतिहासात भारताचे जे शांततामय धोरण होते त्याचे विवेकानंदांनी जे मूल्यमापन केले आहे त्यावर आपण जर प्रकाश टाकला नाही तर स्वामी विवेकानंदांच्या सामाजिक–राजकीय दृष्टिकोनाचा अभ्यास अपूर्ण राहील. पाश्चिमात्य देशांतून परतल्यावर पूर्वेकडील देशांत (कोलंबोमधे) त्यांनी जे पहिले जाहीर भाषण केले त्यात विवेकानंदांनी म्हटले :

'हजारो वर्षे भारत शांततेने जगला आहे. जेव्हा ग्रीस अस्तित्वात नव्हते, रोमचा विचारही शक्य नव्हता, आधुनिक युरोपियन लोकांचे वाडवडिल जंगलात रहात होते आणि अंगावर रंग फासत होते, त्यावेळी देखील भारताचे कार्य चालू होते. ज्या काळातल्या इतिहासाची नोंददेखील नाही, भूतकाळाच्या ज्या गाढ अंधारात डोकावण्याचे धैर्य कोणी करत नाही.त्या काळापासून आतापर्यंत भारतामधून कल्पनांमागून कल्पना प्रसृत झाल्या आहेत आणि त्यातला प्रत्येक शब्द मागे शुभाशिर्वादाचे पाठबळ आणि पुढे शांततेचे भविष्य घेऊन उच्चारला गेला आहे. जगातल्या सर्व राष्ट्रांमध्ये, आम्ही कधीच शांततेची कास सोडली नाही. जगातल्या सर्व राष्ट्रांमध्ये आम्हीच कधीही जेते नव्हतो. हे पुण्य आपल्या शिरावर आहे, म्हणूनच आम्ही जगलो आहोत.'[८१]

कॅलिफोर्नियातील पॅसाडेना येथील शेक्सपियर क्लबच्या सभासदांपुढे २७ जानेवारी १९०० रोजी बोलताना विवेकानंद म्हणाले:

'आपल्या स्वतःच्या सीमांमध्ये अगदी समाधानी राहून त्यांनी (भारतीयांनी·विनय रॉय) कुणाशीच कधी युद्ध केले नाही. साम्राज्यशाही वैभवाची भारतीय राष्ट्राने कधीच तरफदारी केली नाही ... भारतीय राष्ट्र हे कधीच बलवान, आक्रमक जेते राष्ट्र बनणार नाही, कधीच नाही.'[८२]

विवेकानंदांचा ज्वलंत देशाभिमान, कष्टकरी लोकांबद्दलची सखोल सहानुभूती, भविष्यकाळ शूद्रांचा आहे आणि शूद्रांचे डोळे उघडा म्हणजे ते आपले हक्क मांडतील असे भविष्यसूचक भाकित हे सर्व जरी खरे असले तरी विवेकानंदांचा राष्ट्रीय पुनरुत्थानाचा कार्यक्रम हा एक अर्धवट तडजोडच होती. तो मध्यात जाऊन थांबतो. कष्टकऱ्यांचे डोळे उघडले म्हणजे ते त्यांच्या गरीबीची आणि पिळवणुकीची कारणे समजू शकतील, आणि एखाद्या महाकाय शक्तीप्रमाणे जागृत होतील हे सर्व ठीक आहे आणि आवश्यकही आहे. पण पुढे काय ? त्यांचे मुक्ती मिळवण्याचे साधन

कोणते असेल आणि त्यांच्यापुढचा मार्ग कोणता असेल ? विवेकानंद म्हणतात की जागृत झालेला बहुजनसमाजच ते ठरवील, त्यांच्या स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव त्यांच्यात जागृत करणे हीच माझी जबाबदारी. आणि ते तेथेच थांबले. देशाला परकीय सत्तेच्या जोखडातून स्वतंत्र करण्यासाठी आणि पिळवणुकीच्या विळख्यातून कष्टकऱ्यांना मुक्ती मिळवून देण्यासाठी मोठ्या संख्येने समुदायांनी कोणती कृती करावी याचा काही ठोस कार्यक्रम त्यांनी पुढे सांगितला नाही. साहजिकच कोणत्याही ठोस कृतीच्या मार्गदर्शनाभावी राजकीय दृष्टिकोनातून हा कार्यक्रम उपयुक्त व स्वीकारार्ह नव्हता. या कार्यक्रमाचा परोपकार आणि प्रबोधन करणारा भाग रामकृष्ण मिशनने आपल्या असंख्य शाखा, इस्पितळे, वाचनालये, शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत पुढे चालवला आहे.

विवेकानंद हे काही राजकीय पुढारी नव्हते. ते मूलतः धार्मिक जगातले होते. चिद्वादी विचारप्रवाहातले ते एक तत्त्ववेत्ते होते आणि त्यांना आत्म्याचे शुद्धीकरण व पददलितांचे, झोपी गेलेल्या लाखो मूक जीवांचे जागरण हे सर्वांत अधिक महत्त्वाचे वाटत होते सामाजिक बदल, परकीय सत्ता व पिळवणूक नष्ट करणे, आणि शूद्रांचे राज्य प्रस्थापित करणे हे नंतरचे होते. तो आत्म्याच्या शुद्धिकरणाचा आणि ज्ञानप्राप्तीचा परिणाम होता. विवेकानंदांच्या या अपूर्ण कार्यक्रमासाठी इतर वस्तुनिष्ठ घटकसुद्धा जबाबदार होते. ज्या अल्पकाळात विवेकानंदांनी आपले सार्वजनिक जीवन घालवले त्या काळावर अनेक वस्तुनिष्ठ सामाजिक–राजकीय घटकांनी आपले ठसे उमटवले होते. भारतीय भांडवलदारवर्ग अजूनही दुर्बल आणि प्राथमिक अवस्थेत होता. देशातली प्रमुख राजकीय संघटना, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-ही अजूनही विकासाच्या अगदी प्राथमिक अवस्थेत होती. परकीय सत्ताधाऱ्यांकडून काही फुटकळ सवलती मिळवणे हे तिचे मुख्य कार्य होते. जनसमुदायांपासून ती अजून दूरच होती. तिची धोरणे आणि कार्यक्रम यांचा श्रमिक जनतेवर काही परिणाम झाला नव्हता किंवा त्यांना स्फूर्तीही मिळाली नव्हती. ती संघटना अजूनही सुशिक्षित आणि मालमत्तादार वर्गांचे एक व्यासपीठ होते. विवेकानंदांना काँग्रेसबद्दल फारसा आदर नव्हता आणि भिक्षा मागण्याच्या तिच्या मोहिमांचा ते नेहमी उपहासाने उल्लेख करत. लाखो कष्टकरी लोक, मुख्यतः कामगारवर्ग, अजूनही एक असंघटित, मागासलेली, ऐतिहासिक–सामाजिक शक्ती होता, स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव नसलेला होता औद्योगिक भांडवलदारवर्गाप्रमाणे औद्योगिक कामगारवर्ग अजूनही विकासाच्या, संघटितपणाच्या आणि जागरूकतेच्या प्राथमिक अवस्थेत होता. सामाजिक–राजकीय क्षेत्रातली एक स्वतंत्र शक्ती म्हणून अजूनही त्याला स्थान नव्हते.

भांडवलदारवर्ग आणि कामगारवर्ग हे दोन भिन्न वर्ग आहेत आणि स्वतंत्र-

पणे किंवा एकत्रपणें (काही काळ तरी) भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करायला समर्थ आहेत हे विवेकानंदांना पूर्णपणें उमगले नाही.

विवेकानंदांच्या सर्व आशा ज्यांच्यावर एकत्रित झाल्या होत्या असे सुशिक्षित, गरीब मध्यमवर्ग आणि शेतकरी हे अनेक कारणांमुळे राष्ट्रीय मुक्तिलढ्याचे नेतृत्व करायला असमर्थ होते. भारतीय सामाजिक विकास पुढे रेटणारी मुख्य शक्ती ठरू शकेल अशा उत्पादनप्रकाराशी यापैकी एकही वर्ग निगडित नव्हता; आणि अशी उत्पादनपद्धती भारतीय भूमीवर आधीच विकसित व्हायला लागलेली होती. समाजाचे हे दोन्ही थर, राष्ट्रीय मुक्तिलढ्यामध्ये भांडवलदारवर्ग किंवा कामगारवर्ग यांचे फार तर चांगले साथीदार होऊ शकले असते.

□

निष्कर्ष

युगप्रवर्तक बदल घडवून आणणाऱ्या दोन शतकांच्या सीमेवर, एकीकडे आपली प्रभावक्षेत्रे, वसाहती, बाजारपेठा यांची फेरवाटणी करण्यासाठी सबंध जगाला रक्ताच्या महापुरात ओढण्याचा गुप्तपणे कट करणाऱ्या लोभी, निर्लज्ज साम्राज्यवाद्यांच्या दूरवर पसरलेल्या जाळ्यात अस्वस्थ युरोप आचके देत होता. दुसरीकडे, साम्राज्यवाद्यांच्या दुष्ट कटाची निष्पत्ती म्हणून पुरोगामी लोक, बुद्धिजीवी, कामगारवर्ग आणि त्याचे साथीदार समाजाच्या तत्कालिन सत्ताधीशांशी निर्णायक मुकाबला करण्याची तयारी करत होते. त्याचवेळी भारतातले विचारी लोक सामाजिक, राजकीय आणि इतर बाबतीत देशाने कोणता योग्य मार्ग अनुसरावा याचा शोध घेत होते. अशा वेळी विवेकानंद एखाद्या उल्केप्रमाणे अवतरले. एका दशकापेक्षाही कमी कालावधीच्या त्यांच्या सार्वजनिक जीवनात, लाखो देशबांधवांतच नव्हे तर युरोप आणि अमेरिकेतले हजारो चाहते आणि अनुयायी यांच्यात ते प्रिय बनले. साम्राज्यवादी आणि विविध प्रकारचे त्यांचे हस्तक यांनी काळजीपूर्वक सातत्याने भारत आणि भारतीय यांच्याविषयी शेकडो वर्षांपासून ज्या निंद्य कल्पना पसरवल्या होत्या त्या विवेकानंदांनी दूर केल्या. इतकेच नव्हे, तर मानवी ज्ञानाच्या अनेक क्षेत्रात त्यांनी दूरगामी परिणाम करणारे असे योगदान केले.

यापैकी विवेकानंदांच्या शिकवणीतील तात्त्विक, धार्मिक, भूतदयावादी आणि गूढवादी पैलूंवर अत्यंत लायक अभ्यासकांनी यापूर्वी बरीच चर्चा केली आहे आणि लेखनदेखील केलेले आहे. विवेकानंदांच्या सामाजिक–राजकीय दृष्टिकोनाविषयी तुलनेने फारच कमी लिहिले गेले आहे. त्यामध्ये देखील एकदोन अपवाद सोडले तर बऱ्याचशा लेखकांनी विवेकानंदांचा समाजशास्त्रविषयक दृष्टिकोन, राष्ट्रीय पुनरु-

स्थानाचा त्यांचा कार्यक्रम ते ज्या संघटनेचे पाईक होते त्या रामकृष्ण मिशन या संघटनेने बहुतांशी प्रत्यक्षात आणला आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. विवेकानंदांचे ग्रंथ हे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातल्या क्रांतिकारकांच्या मार्गदर्शिका होत्या या गोष्टीवरच काहींनी स्वतःचे समाधान करून घेतले आहे. अरविंद घोष आणि त्यांचे बंधू बरीन घोष यांच्यासारख्या प्रमुख क्रांतिकारकाना विवेकानंदांपासून आणि सुरुवातीच्या त्यांच्या एका सभेतून प्रत्यक्ष स्फूर्ती मिळाली होती. त्या सभेत क्रांतिकारक पक्ष स्थापण्याचा प्रश्न, पक्षाचा कार्यक्रम आणि त्याचे व्यासपीठ यांचा आराखडा मांडण्याविषयी चर्चा झाली होती. आणि त्या सभेला स्वामीजींची जवळची शिष्या भगिनी निवेदिता अर्थातच स्वामीजींच्या आशिर्वादाने हजर होती हे सर्व सिद्ध करण्यातच या मंडळींनी समाधान मानले आहे.

विवेकानंदांचा ज्वलंत देशाभिमान; भारतातल्याच नव्हे तर युरोप–अमेरिकेतल्या लक्षावधी (विशेषतः निग्रो) कष्टकऱ्यांविषयीचे त्यांचे प्रेम आणि सहानुभूती; ज्यांना विवेकानंद समाजाचे अनावश्यक कालबाह्य अलंकार, मृतात्मे 'जिवंत मुडदे' समजत त्या बांडगुळाप्रमाणे शोषण करणाऱ्या भारतातल्या उच्चवर्णीय (मुख्यत: सरंजामीवर्ग) लोकांबद्दलचा त्यांना वाटणारा तिरस्कार आणि द्वेष; मानवी संस्कृतीची इमारत उभारण्यातली श्रमाची भूमिका, श्रमाची महानता; देशभक्ती आणि समाजपरिवर्तन घडवण्याची भूमिका व सामर्थ्य याविषयीची विवेकानंदांची जाण; मानवी समाजातल्या पुढच्या अवस्थेचे कष्टकऱ्यांकडून, म्हणजेच शूद्रांकडून त्यांच्या सर्व शूद्रपणासकट मार्गदर्शन आणि नेतृत्व केले जाईल असा त्यांचा दृढ विश्वास; वसाहतवादी पिळवणुकीविषयीचा आणि जग बळकावणाऱ्या साम्राज्यवाद्यांविषयीचा त्यांचा तिरस्कार; वेदांतप्रणित आत्म्याचे स्वातंत्र्य; सर्व माणसांची व राष्ट्रांची समता व विश्वबंधुत्व या त्यांच्या वेदांतवादी कल्पना या सर्वांमुळे एक सामान्य धार्मिक सुधारक, रामकृष्णांचा एक शिष्य या स्थानापासून त्या काळातल्या एक अग्रगण्य विचारवंतांपर्यंत विवेकानंदांचा प्रवास होण्यास मदत झाली. साम्राज्यवादाचे गुंतागुंतीचे कारस्थान त्यांना स्पष्टपणे दिसत होते, त्याचा अपरिहार्य पराभव त्यांना दिसू शकत होता, आगामी सामाजिक क्रांतीची चाहूल त्यांना ऐकू येत होती, ती क्रांती साम्राज्यवादाच्या उदरात परिपक्व होत होती आणि द्रष्ट्या विचारवंताच्या दूरदर्शीपणाने नव्या समाजाच्या नव्या शासकांचे आगमन ते ओळखू शकले. हे सर्व या छोट्या पुस्तिकेत दाखवण्याचा मी प्रयत्न केला आहे. इतिहासाच्या आपल्या अनुभवावरून आपणा सर्वांना आज ठाऊक आहे की शूद्र राज्याविषयीचे विवेकानंदांचे भाकित हा काही एखाद्या भविष्य वर्तवणाऱ्याचा पोकळ, गूढ तर्क नव्हता; सामाजिक संबंधांत खोलवर नांदणारा भक्कम पाया त्यांना लाभलेला होता.

विवेकानंद जर युरोपात, रशियात जन्मले असते, लेनिनचे आणि त्या

देशाच्या कामगारवर्गाच्या शक्तिशाली चळवळीचे समकालिन म्हणून जगले असते तर त्यांच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या योजनेवर त्यांनी स्वत: घालून दिलेल्या मर्यादा आणि त्या योजनेच्या स्वत:च्या मर्यादा केव्हाच ओलांडल्या गेल्या असत्या यात शंका नाही.

आपल्याला माहीत आहे की त्या काळात भारतातले राष्ट्रीय मुक्ती आंदोलन अजूनही प्राथमिक अवस्थेत होते. भांडवलदारी विचारवंतांचे नेतृत्वदेखील अजून आकाराला आले नव्हते. बहुजनसमाज, शेतकरी जनता बहुसख्येने असूनही संघटित नव्हती. कामगारवर्ग संघटना बांधण्याच्या प्राथमिक अवस्थेत होता आणि त्याच्यातली वर्गजाणिवेची पातळीसुद्धा अगदी कमी होती. सुरुवातीच्या काळात त्यांनी केलेले संप हे मुख्यत: स्थानिक आणि आर्थिक स्वरूपाचे होते. असे असूनही कामगारवर्गासहित सर्वच कष्टकरी बहुजनसमाजाचे संभाव्य सामर्थ्य, त्यांच्यातली सुप्त शक्ती ओळखायला विवेकानंद चुकले नाहीत. या जनसमुदायांना शिक्षण देणे, त्यांची जाणीव जागृत करणे ही विवेकानंदांची मुख्य कामगिरी होती. ही कामगिरी सुशिक्षित वर्गातल्या गरीब थरांवर, विशेषत : युवक-युवतींवर सोपवण्याची त्यांची कल्पना होती.कारण हे तरुण स्त्रीपुरुषही देशातल्या मालमत्ताधारी वर्गाच्या आणि परकीय सत्ताधाऱ्यांच्या पिळवणुकीचे बळी होते. ज्या परिस्थितीत विवेकानंद कार्य व विचार करत होते त्यात हे स्वाभाविकच होते. विवेकानंद ज्याला ' निद्राधीन महाकाय शक्ती ' हे अचूक संबोधन वापरत त्या निष्क्रीय जनसमुदायाला कृतीत ओढण्याची कामगिरी संपूर्ण इतिहासात पुरोगामी विचारवंत करतच आले आहेत, ही गोष्ट लक्षात घेणे मनोरंजक ठरेल. कामगारांमध्ये शिक्षण आणि सामाजिक जाणीवा निर्माण करण्यात गुंतलेल्या रशियाच्या सर्वोत्तम तरुण पिढीचे चित्रण गॉर्कीने आपल्या जगप्रसिद्ध ' आई ' कादंबरीत केले आहे. लेनिनवर लिहिलेल्या आपल्या सुप्रसिद्ध लेखात गॉर्की लिहितो, ' रशियन बुद्धिजीवी हे फार दीर्घकाळपर्यंत रशियन इतिहासाला ओझे वाहणारे घोडे म्हणून जुंपले गेले होते, आहेत आणि रहाणार आहेत.' इतर देशांच्या इतिहासावरून अशी आणखी उदाहरणे घेता येतील.

निद्रावस्थेतील बहुजनसमाजाची जाणीव जागृत करण्याची कामगिरी इतिहासात जर पुरोगामी विचारवंत पार पाडत आले आहेत, आणि जर स्वत:च्या ज्वलंतपणासहित आणि दृढ विश्वासासहित विवेकानंदांनीसुद्धा तीच कामगिरी भारतीय विचारवंतांपुढे ठेवली असेल तर त्यांचा तो कार्यक्रम योग्यच होता. मग तो हाती का घेतला गेला नाही आणि पूर्ण झाला नाही ? आणि विवेकानंदांना याबद्दल आपण दोष देऊ शकतो काय ? असे कदाचित वाचक विचारतील. येथे आपण स्वामीजींनी विचारवंतांवर जी कामगिरी सोपवली त्याच्या अगदी समोरसमोर येतो. विवेकानंदांनी त्यांना दारोदार हिंडून बहुजनसमुदायांना शिक्षण देण्यास,

स्वतःच्या सामर्थ्याबद्दल व हक्कांबद्दल त्यांच्यात जाणीवजागृती करण्यास सांगितले. पण जनसमुदायाना याप्रमाणे शिक्षण मिळाल्यावर आणि स्वतःचे सामर्थ्य व हक्क याबाबत त्यांना जागृत केल्यानंतर, या विचारवंतांनी पुढे काय करायचे हे विवेकानंदांनी त्यांना सांगितले का ? त्यावेळी तरूण बुद्धिवंतांचो कामगिरी संपेल एवढेच फक्त त्यांनी सांगितले. कारण काय करायचे हे जनता स्वतःच ठरवेल; नंतर बहुजनसमाजाच्या एखाद्या फुंकरीने शोषकवर्ग आणि परकीय लुटारू नष्ट होतील एवढेच ते म्हणाले. खुद्द या तरुण बुद्धिजीवींनी काय करावे ? शरीर बळकट आणि मन कणखर बनवा, पाश्चिमात्य जगात शोध लावले गेलेले सर्व प्रकारचे विज्ञान शिका, आणि नंतर पाश्चिमात्य साम्राज्यवादी मालकांना त्यांच्याच पद्धतीने प्रतिटोला द्या, एवढेच या तरुण बुद्धिमंतांना विवेकानंदांनी दिलेले मार्गदर्शन आहे.

विवेकानंदांचा राष्ट्रीय पुनरुत्थानाचा कार्यक्रम हा काही राजकीय कार्यक्रम नव्हता असे आपल्याला दिसते. अशा अर्थी की परकीय वसाहतवादी सत्ताधारी आणि त्यांचे स्वदेशातील हस्तक यांच्यापासून मुक्ती करून घेऊन अखेरीस शूद्रांचे राज्य येण्यात चळवळीची परिणती व्हावी, हे राजकीय उद्दिष्ट गाठण्यासाठी विचारवंतांनी आणि जनसमुदायांनी कोणती राजकीय कृती अनुसरावी असे निश्चित धोरण त्यात सुसंगतपणे मांडलेले नव्हते. परंतु सुटेसुटे, विस्कळितपणे या राजकीय कार्यक्रमाचे सर्व घटक त्यांनी साधारणपणे लोकांपुढे ठेवले. या कार्यक्रमाच्या घटकांबरोबरच त्यांच्या बोलण्यात आणि चिंतनात इतर भरपूर सूचक गोष्टी होत्या. त्या सूचनांतून त्यांना असे म्हणायचे होते की आत्म्याची शुद्धी, आंतरिक आणि बाह्य बंधनांमधून त्याची मुक्ती या त्यांच्या मनातल्या सर्वात महत्त्वाच्या गोष्टी होत्या.

आपण हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की उत्क्रांतिवादाच्या सिद्धांताचे अभ्यासक म्हणून त्यांनी समाजात सावकाश, क्रमशः बदल होईल असेही मानले असावे. जनतेच्या जाणिवेत भर घालून समाजात ही बदलाची क्रिया 'संख्यात्मक' दृष्टचा वाढेल असे त्यांना वाटले असावे. पण जाणीव जागृत झालेली कष्टकरी जनता इतिहासाच्या ओघात क्रांतिकारक उडी घेऊ शकते आणि घेईल हे 'गुणात्मक' वळण त्यांनी डोळ्यासमोर आणले नसेल. ही कामगिरी जाणीव जागृत झालेल्या श्रमिकांवर किंवा शूद्रांवर त्यांनी सोपविली. त्यांचे स्वतःचे कार्य श्रमिकांना जागे करणे हे होते. बस्स इतकेच. म्हणूनच त्यांचा राष्ट्रीय पुनरूत्थानाचा कार्यक्रम हा एक अपूर्ण कार्यक्रमच राहिला.

अन्यत्र, बुद्धिवंतांनी बहुजन समुदायांना केवळ जागे करून ते थांबले नाहीत तर त्यांना संघटित होण्यास त्यांनी मदत केली, त्यांच्या संघर्षात सहाय्य केले. अशा रीतीने ते जागृत जनसमुदायांशी सर्वस्वी एकरुप झाले.

बहुजन समाजातील लोकांना शिक्षण देणाऱ्या, त्यांच्या जाणिवा जागृत करणाऱ्या शेकडो-हजारो सुशिक्षित तरुण-तरुणींचे सैन्य संघटित करण्याचे स्वप्न विवेकानंदांनी पाहिले. वस्तुतः रामकृष्ण मिशनने केलेल्या लोककल्याणकारी आणि बोधप्रद कार्याच्या रुपात कार्यक्रमाचा हा भाग प्रत्यक्षात अवतरला. भारतातल्या क्रांतिकारकांच्या तरुण पिढ्यांनी विवेकानंदांच्या शिकवणुकीपासून स्फूर्ती घेतली हे खरे आहे; परंतु त्यांनी जनसमदायांपर्यंत जाऊन त्यांना उठवण्याचे कार्य केले नाही हे आश्चर्यकारक आहे. त्याऐवजी त्यानी छोट्या छोट्या संघटित गटांनी करण्याच्या सशस्त्र बंडाचा मार्ग पत्करला.

भारतातील विसाव्या शतकातील विचारांमधे, विशेषत: या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, विवेकानंदांचा प्रभाव सखोल आणि विस्तृत होता. शरीरापेक्षा आत्म्याचे असलेले श्रेष्ठत्व, किंवा भौतिक जगापेक्षा आध्यात्मिक जगाचे असलेले श्रेष्ठत्व समजून सांगणारी त्यांची वेदांतवादी दृष्टी; सर्व देशांच्या व स्त्री-पुरुषांच्या समानतेची त्यांची शिकवण; प्राचीन भारताकडून वारशाने आपल्याला जी आध्यात्मिक संपदा मिळाली आहे तिचा त्यांनी केलेले गौरव; भारताच्या आध्यात्मिक, सामाजिक आणि राजकीय उत्कर्षाचा भारतीय मार्ग धुंडाळण्याचा त्यांचा प्रयत्न; भारतीय समाजात पाश्चात्य आणि पौर्वात्य तत्वांचा संकर करण्याचा त्यांचा विचार; अस्पृश्यता आणि इतर अनेक सामाजिक बाबींविषयीचा त्यांचा दृष्टिकोन – या सर्वांचे देशाच्या नामवंत विचारवंतांच्या, सामाजिक आणि राजकीय नेत्यांच्या लेखनात प्रतिबिंब पडले होते आणि त्यांनी या सर्वांचा पुढे आणखी विकास केला.

सामाजिक, आत्मिक आणि राजकीय क्षेत्रात भारतीय समाजाने कोणता मार्ग अनुसरावा याचा शोध आजही चालू आहे. सर्व तऱ्हेचे कष्ट, यातना, निराशा, वैफल्य, आशा आणि भीती यांच्यासहित अजूनही शोध चालू आहे. आपण विवेकानंदांकडे मागे वळून पाहू या, त्यांच्यातल्या पेटत्या आगीचा थोडा तरी अंश, उद्दिष्टांबद्दलचा प्रामाणिकपणा, पददलित दरिद्री जनतेबद्दलचे त्यांचे प्रेम, या जनतेच्या भविष्यावरचा दृढ विश्वास आणि अज्ञात अशा नव्या गोष्टी निर्भयपणे स्वीकारण्यातली सहजता हे सर्व आपण आत्मसात करू या. आज आपण जो शोध घेत आहोत त्या संदर्भात ही नम्र सूचना केली तर ती अगदीच अनाठायी ठरणार नाही.

विवेकानंदांच्या लिखाणातल्या आजच्या काळाच्या संदर्भात कालबाह्य ठरणाऱ्या गोष्टी बाजूला ठेवून, चिकित्सक वृत्तीने त्यांचे लिखाण आपण पुन्हा एकदा वाचू या. मला खात्री आहे की चिंतनशील जागरूक वाचकाला विवेकानंदांच्या लिखाणात अजूनही पुरेसे खाद्य आणि दारूगोळा सापडेल. अधिक समृद्ध

आणि बलवान भारताच्या निर्मितीसाठी करावयाच्या त्याच्या कार्यात या वाचनाने त्याला खूप मदत होईल आणि बऱ्याच भ्रामक समजुती व कल्पना फेकून देण्यास त्याला ते वाचन मदत करील.

विवेकानंदांचे स्वतःच्या देशावर, स्वतःच्या गरीब देशबांधवांवर अंतःकरणापासून प्रेम होते. या देशापुढे असलेले असंख्य प्रश्न सोडवण्यासाठी अंशतः सुधारणा पुऱ्या पडणार नाहीत तर मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सर्वंकष क्रांती करण्याची नितांत आवश्यकता आहे असे मानणारे ते पहिले भारतीय विचारवंत होते. विवेकानंद थोर आहेत ते यासाठी. स्वतःला समाजवादी म्हणून उघडपणे जाहीर करणारे आणि श्रमिक जनता, शूद्र, हे सत्ताधारी असतील अशा नव्या युगाच्या आगमनाचे धैर्याने भाकीत करणारे ते पहिले भारतीय होते.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०५०
दा. क्र. २२८८
निषेधार्थ
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

टीपा

१. निवेदिता (नोबल एम. इ.), द मास्टर अॅज आय सॉ हीम, लंडन, १९१०, पृ. १९५
२. विवेकानंद, समग्र वाङ्मय, खंड १, मायावती, १९५०, पृ.३३४–३५
३. कित्ता, पृ. ३३५–३६
४. ,, , पृ. ३७३
५. ,, , पृ. ३७३
६. ,, , पृ. ३७३
७. ,, , पृ. ३७३
८. ,, , पृ. ३७४
९. ,, , पृ. ४१९
१०. ,, , पृ. ४१९
११. ,, , पृ. ४२३
१२. ,, , पृ. ४३०
१३. ,, , पृ. ४३३
१४. ,, , पृ. ४३३
१५. ,, , पृ. ४३२
१६. ,, , पृ. ४३६
१७. ,, , पृ. ४३४–३५
१८. पूर्वोक्त, खंड ४, पृ. ३७८–७९ (जाड ठसा माझा– विनय रॉय)
१९. कित्ता, पृ. ३७९ (जाड ठसा माझा–विनय रॉय)
२०. ,, पृ. ३७९–८० (जाड ठसा माझा– विनय रॉय)

२१. कित्ता, पृ. ३८०–८१ (जाड ठसा माझा– विनय रॉय)
२२. ,, ,पृ. ३८२ (जाड ठसा माझा– विनय रॉय)
२३ ,, ,पृ. ३८२–८३
२४. पूर्वोक्त, खंड ३, पृ. १९४
२५. कित्ता, खंड १, पृ. ३
२६. ,, ,पृ. २०
२७. ,, ,खंड ३, पृ. २१४
२८. ,,
२९. ,, ,पृ. २१०
३०. ,, ,पृ. २१२–१३
३१. ,, ,पृ. २१३
३२. पूर्वोक्त, खंड ५, पृ. १५०
३३. ,, ,खंड ३, पृ. ३१६–१८
३४. ,, ,खंड ४, पृ. ३५८
३५. ,, ,खंड ३, पृ. १६३–६४
३६. कित्ता, पृ. १६६–६८
३७. ,, पृ. १९६
३८. ,, ,पृ. १९२
३९. पूर्वोक्त, खंड ५, पृ. १०९–१०
४०. कित्ता, पृ. ११०
४१. ,,
४२. ,, ,पृ. १५२
४२. पूर्वोक्त, खंड ५, पृ. ४५
४३. ,, ,खंड ७, पृ. ३०८–९
४४. ,, ,खंड ५, पृ. ८१
४५. कित्ता, पृ. ३५४
४६. पूर्वोक्त, खंड ३, पृ. १९३
४७. ,, ,खंड ७, पृ. ३०९–१०
४८. कित्ता,
४९. ,, ,पृ. १४६–४७
५०. ,, ,पृ. ३४०–४१
५१. ,, ,पृ. ३४१
५२. पूर्वोक्त, खंड ५, पृ. ८१
५३. ,, ,खंड ७, पृ. १४६

५४. कित्ता, पृ. १४७–४८
५५. ,, , पृ. १५०–५३
५६. पूर्वोक्त, खंड ८, पृ. ४५७–७७
५७. ,, , खंड ४, पृ. ४४८–४९
५८. कित्ता, पृ. ४५०
५९. ,, , पृ. ४५१–५२
६०. ,, , पृ. ४६६–६७
६१. पूर्वोक्त, खंड ३, पृ. १५८
६२. कित्ता, पृ. १३८–३९
६३. पूर्वोक्त, खंड ७, पृ. ३७४
६३. ,, , खंड ३, पृ. २७७
६५. कित्ता, पृ. १०५–६
६६. ,, , पृ. १०७
६७. पूर्वोक्त, खंड ७, पृ. १४७
६८. ,, , खंड ४, पृ. ४६७–६८
६९. ,, , खंड ६, पृ. ३८१–८२
७०. कित्ता
७२. ,, ,
७३. पूर्वोक्त, खंड ४, पृ. ३६७–६९
७४. कित्ता, पृ. ३६२
७५. पूर्वोक्त, खंड ५, पृ. १५३
७६. कित्ता, खंड ५, पृ. २९६–९९
७७. पूर्वोक्त, खंड ४, पृ. १८०
७८. दत्त बी., स्वामी विवेकानंद, पॅट्रिअट–प्रोफेट, पृ.३३३
७९. पूर्वोक्त, खंड ४, पृ. ४०४
८०. ,, , खंड ३, पृ. २२५–२७
८१. कित्ता, पृ. १०६
८२. पूर्वोक्त, खंड ८, पृ. ७४–७५

REFBK-0024288
मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
3040
दा. क्र. 27.2.07
निबंधावली
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

आमची संग्राह्य प्रकाशने

भारतीय तत्त्वज्ञान
वैचारिक आणि सामाजिक संघर्ष
आवृत्ती दुसरी
एस. जी. सरदेसाई

प्राचीन व मध्ययुगीन
धर्मविचार आणि मराठी संत
स. रा. गाडगीळ

अमेरिकन नीग्रो :
साहित्य आणि संस्कृती
जनार्दन वाघमारे

सृष्टी'सौंदर्य' आणि साहित्यमूल्य
शरच्चंद्र मुक्तिबोध

महात्मा फुले आणि त्यांची परंपरा
(सुधारित दुसरी आवृत्ती)
प्रभाकर वैद्य

वंदे मातरम्
जन गण मन
प्रभाकर वैद्य

समाज आणि साहित्य
अविनाश सहस्रबुद्धे

आधुनिक मराठी काव्य : उद्गम,
विकास आणि भवितव्य
दि. के. बेडेकर

विचारयात्रा
दि. के. बेडेकर

पुराणकथा आणि व
डी. डी. [illegible]

आ. पु. क. देशपां
प्रकाश बुरटे

राजा बदल
विमल मित्र

(कथासंग्रह)
विद्रोह
शांताराम पारपिल्लेवार

जांभळदऱ्ह
भास्कर चंदनशीव

डॉ. आंबेडकर : वि
(सुधारित दुसरी आवृत्ती)
वा. ना. कुबेर

नारायण सुर्वे यांची
(समीक्षा)
दिगंबर पाध्ये

मराठी साहित्याचे
उषा देशमुख

अश्विनी (कादंबरी
मिखाईल अलेक्झेव्ह
अनु : वामन पात्रीकर

मनुस्मृती : काही वि
नरहर कुरुंदकर

अर्नेस्टो चे गुएवार
अनु. । दि. वा. फडणी

लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई ४०० ०२५.